इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - १४ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

### व्ही.डी.सतीशन केरळचे नवे मुख्यमंत्री

**तिरुवनंतपुरम,ता.१४–**

केरळमधील अनेक दिवसांच्या राजकीय गदारोळ, बैठका आणि अंतर्गत कलहानंतर, काँग्रेस पक्षाने अखेर मोठा निर्णय घेतला आहे. काँग्रेस नेतृत्वाने व्ही. डी. सतीशन यांची केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून निवड केली आहे. राज्याच्या राजकारणातील नेतृत्वाच्या नव्या पिढीची ही सुरुवात मानली जात आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दीपदास मुन्शी, मुकुल वासनिक आणि अजय माकन यांनी दिल्लीत अधिकृतपणे त्यांच्या नावाची घोषणा केली. काँग्रेस नेत्यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले की, व्ही. डी. सतीशन हे राज्याचे नवे मुख्यमंत्री असतील. केरळ विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर दहा दिवसांनी काँग्रेसने मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा केली.

शुक्रवार, ता. १५ मे २०२६ | वैशाख कृष्ण १३/१४ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२+४=१६ | किंमत ₹ ५.००

## अमेरिका-चीन संबंध सर्वात महत्त्वाचे-ट्रम्प

**बीजिंग,ता.१४–**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन दौऱ्यादरम्यान अमेरिका आणि चीन यांच्यातील संबंधांना जागतिक इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या संबंधांपैकी एक असे संबोधले. त्यांनी म्हटले की, दोन्ही देशांतील जनतेमध्ये परस्पर आदर आणि सहकार्याची भावना अमेरिकेच्या स्थापनेपासूनच अस्तित्वात आहे.



(पान २ वर)

## दिल्लीत कर्मचाऱ्यांना "वर्क फ्रॉम होम"

**नवी दिल्ली,ता.१४–**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या पेट्रोल बचतीच्या आवाहनानंतर दिल्ली सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना आठवड्यातून २ दिवस 'वर्क फ्रॉम होम' दिले आहे. तसेच ऊर्जा बचत, इंधन वापरात कपात आणि सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात



(पान २ वर)

## बांगलादेशात गोवरचा कहर; ४३२ दगावले

**ढाका,ता.१४–**

बांगलादेश मध्ये गोवरच्या साथीने गंभीर स्वरूप धारण केले असून, या आजारामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ४३२ वर पोहोचली आहे. स्थानिक माध्यमांच्या वृत्तानुसार, गेल्या २४ तासांत आणखी किमान आठ जणांचा मृत्यू झाला आहे. देशात गोवरच्या पुष्टी झालेल्या आणि संशयित रुग्णांची (पान २ वर)

## दोन जहाजांनी होर्मुझ केली पार

**नवी दिल्ली,ता.१४–**

अमेरिका-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताकडे येणाऱ्या आणखी दोन एलपीजी जहाजांनी होर्मुझ सामुद्रधुनी यशस्वीरित्या पार केली आहे. याबाबतची माहिती विविध वृत्तांत देण्यात आली आहे. 'सिमी' हे एलपीजी जहाज होर्मुझ सामुद्रधुनीतून जात असताना काही काळासाठी आपला ट्रान्सपाँडर बंद ठेवण्यात आला होता. त्यानंतर गुरुवारी हे जहाज ओमानच्या आखातात दिसून आले. दुसरे एलपीजी जहाज (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
| --- | --- |
| १६०७०० रु. | २८८००० रु. |

अंडी ५८० रुपये शेकडा

### हास्यतुषार




# नोकरीतील आरक्षणावर सरकारचा मोठा निर्णय

## राखीव प्रवर्गाची सवलत घेणाऱ्यांना खुल्या प्रवर्गाचे दरवाजे बंद

**मुंबई,ता.१४–**

**स्पर्धा परीक्षांमध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परिक्षेस बसण्याची संधी या आधारे सवलत घेतलेल्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्तीबाबतचे धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गात निवड होणाऱ्या उमेदवारांबाबत स्पष्टता निर्माण होणार असून आरक्षणाच्या अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता आणि सुसंगती येणार आहे.**



राखीव प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) या पात्रतेच्या निकषांमध्ये कोणतीही सवलत घेतलेली नाही, अशा उमेदवारांची निवड गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातूनही करण्यात येणार आहे.

तथापि, ज्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, परीक्षेस बसण्याची संधी (परीक्षा शुल्क ही बाब वगळून) संधीमध्ये शासनाने दिलेली सवलत घेतलेली असेल, अशा उमेदवारांची गणना संबंधित राखीव प्रवर्गातच करण्यात येईल. अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील पदांवर दावा करता येणार नाही, असेही या धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण धोरण हे उभे आरक्षण आणि आडवे आरक्षण अशा दोन स्तरांवर लागू होते. २०२४ मध्ये (पान २ वर)

महाराष्ट्रातील प्रमुख (उभे) आरक्षण (सरकारी नोकऱ्या)- अनुसूचित जाती १३ टक्के, अनुसूचित जमाती ७,विमुक्त जाती ३, भटक्या जमाती २.५,भटक्या जमाती (धनगर)३.५,भटक्या जमाती (वंजारी) २, विशेष मागास प्रवर्ग २, इतर मागासवर्गीय १९, (मराठा समाज) १०,

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक १० हे स्वतंत्र आर्थिक निकषांवर आधारित आरक्षण असून, ते गैर-आरक्षित पात्र उमेदवारांसाठी लागू होते.

## 'नीट'चे लातूर कनेक्शन; तपासाला वेग

**पुणे,ता.१४–**

**देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे पुणे तसेच लातूरपर्यंत पोहोचले आहेत. पुण्यात मनीषा वाघमारे (वय ४७, रा. सुखसागर, बिबवेवाडी) या महिलेस तर लातूरमधून एकास अटक करण्यात आली असून एका निवृत्त प्राध्यापकाच्या घरी धाड टाकून चौकशी करण्यात आली.**

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणानंतर केंद्र सरकारने या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सीबीआयने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून मुख्य संशयित धनंजय लोखंडे याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या संपर्कात असलेल्या पुण्यातील एका महिलेला तसेच अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या शेषराव सोळंकी या विद्यार्थ्यालाही पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले.

विद्यार्थी शोधणे, त्यांच्याकडून पैसे गोळा करणे आणि ते संशयितांपर्यंत पोहोचवणे, अशी भूमिका या दोघांची असल्याचा संशय तपासातून व्यक्त करण्यात आला आहे. मनीषा वाघमारे या महिलेचे नाव असून ती ब्युटी पार्लर व्यवसायिक आहे. तिचे पती दंतचिकित्सक असल्याची माहिती समोर आली आहे. तर शेषराव सोळंकी हा पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयात अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे.




दरम्यान, नीट पेपर फुटल्यापासून त्याचे कनेक्शन लातुरशी असल्याची चर्चा सुरू असतानाच सीबीआयचे पथक लातुरात दाखल झाले. या प्रकरणात एका व्यक्तीस ताब्यात घेतले आहे. संबंधित व्यक्तीची चौकशी सुरू आहे. मात्र, ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नाव, चौकशीचे ठिकाण आणि तपासाची दिशा याबाबत अधिकृत माहिती गुप्त ठेवण्यात आली आहे. याशिवाय एका निवृत्त प्राध्यापकाच्या घरी धाड टाकून कागदपत्रांची तसेच मोबाईल कॉलची चौकशी करण्यात येत आहे.

या प्रकरणाची पाळेमुळे लातूरपर्यंत पोहोचल्याची चर्चा सुरू असून, खासगी शिकवणी क्षेत्रातील काही व्यक्तींचीही चौकशी (पान २ वर)

## मुख्यमंत्री फडणवीस दुचाकीने विधानभवनात

**मुंबई,ता.१४ –**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहन प्रतिसाद देताना अनेक मंत्र्यांनी आपल्या ताफ्याचा आकार कमी केला आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवारी विधानभवनात मोटारसायकलवरून पोहोचले. ते नव्या विधानपरिषद सदस्यांच्या शपथविधी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आले होते. पंतप्रधान मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनानंतर उचलण्यात आलेल्या उपाययोजनांचा हा एक भाग मानला जात आहे.**

फडणवीस आपल्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानावरून दक्षिण मुंबईतील विधानभवनात मोटारसायकलवरून आले. त्यांच्यासोबत भाजप नेते (पान २ वर)



## वडिलार्जीत मिळकतीच्या वादातून मारहाण

**तिघेजण जखमी; चौघांवर गुन्हा**

**इचलकरंजी,ता.१४ –**

**वडिलार्जीत मिळकतीच्या वादातून चौघांनी लाथाबुक्क्यांनी व काठीने केलेल्या मारहाणीत दोन महिलांसह तिघेजण जखमी झाले. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात चौघांवर गुन्हा नोंद करण्यात आला असून मुस्ताक ताजुद्दीन पैलवान (वय ५३ रा. कलानगर) यांनी फिर्याद दिली आहे.**

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, कलानगर येथे राहणारे मुस्ताक पैलवान व निस्सार पैलवान हे दोघे सख्खे भाऊ आहेत. या दोघांमध्ये वडिलार्जीत मिळकतीवरुन वाद असून हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. गुरुवारी रात्री मुस्ताक हे खाली येत असताना निस्सार यांनी त्यांना पाहून शिवीगाळ करणेस (पान २ वर)

## कोल्हापुरात टोळ्यांचा थरार; खंडणीच्या कारणावरून हाणामारी

**दोन गटांतील १३ जणांवर गुन्हे ; तिघेजण जखमी,वाहनांचे नुकसान**

**कोल्हापूर,ता.१४ (प्रतिनिधी)–**

**राजारामपुरी परिसरात खंडणीच्या वादातून बुधवारी रात्री दोन सराईत टोळ्यांमध्ये जोरदार संघर्ष उडाला. आईचा पुतळा चौकाजवळ रात्री साडेआठच्या सुमारास झालेल्या या घटनेत दोन्ही बाजूंकडील तिघेजण जखमी झाले, तर एका कारची तोडफोड करण्यात आल्याने सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले. भररस्त्यात झालेल्या या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. राजारामपुरी पोलिस ठाण्यात या प्रकरणी परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजारामपुरी १४ वी गल्ली येथील योगेश नागोजी नलवडे यांच्या नातेवाइकांनी परिसरात कापड दुकान तसेच वडापावची गाडी सुरू केली आहे. हा व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी दरमहा पाच हजार रुपयांची खंडणी मागण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मागणीबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या योगेश नलवडे यांना सहाजणांनी काठ्या आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची तक्रार त्यांनी पोलिसांकडे दिली. दरम्यान, दुसऱ्या गटाकडूनही पोलिसांत फिर्याद दाखल (पान २ वर)

## विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित दहा सदस्यांना दिली शपथ

**मुंबई,ता.१४–**

**विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांनी विधानपरिषदेच्या १० जागांसाठी निवडून आलेल्या सर्व सदस्यांना विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ दिली.**

यामध्ये डॉ. नीलम गोऱ्हे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू, अंबादास एकनाथराव दानवे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, प्रमोद शांताराम जठार, झीशान झिआउद्दीन सिध्दीकी, माधवी संजय नाईक, सुनिल विनायक कर्जतकर, विवेक बिपिनदादा कोल्हे आणि संजय नथ्थुजी भेंडे या १० सदस्यांनी शपथ घेतली.

नीलम गोऱ्हे यांनी सलग पाचव्यांदा विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. दरम्यान शपथविधी सुरू (पान २ वर)

## बसमधून उतरताना शिक्षिकेचे १३ तोळे दागिने लांबविले

**सांगली,ता.१४(प्रतिनिधी)–**

**बसमधून उतरताना गर्दीचा फायदा घेत एका शिक्षिकेच्या पिशवीतील बॉक्समध्ये ठेवलेले तेरा तोळ्याचे सोन्याचे दागिने चोरट्याने शिताफीने लंपास केले. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास सांगलीत मध्यवर्ती बसस्थानक आवारात घडली. याप्रकरणी नूतन बाबासाहेब आळतेकर (वय ४४,रा.मिरज) यांनी सांगली शहर पोलीसात फिर्याद दिली आहे.**




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी नूतन आळतेकर या मिरज हायस्कूल मिरज येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे पती बाबासाहेब आळतेकर यांच्यावर भाजपचे जिल्हा सरचिटणीस (पान २ वर)

## जीवघेणा हल्ल्याप्रकरणी एकास ३ वर्षे सक्तमजुरी

**ईश्वरपूर,ता.१४(प्रतिनिधी)–**

**सैफ फैजान दिवाण (रा.ईश्वरपूर) यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी आरोपी सुहेल रियाज बारस्कर यास न्यायालयाने तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच जखमी फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून २५ हजार रुपयांचा दंड देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.**

दि. ९ जून २०२४ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास ईश्वरपूर येथे ही घटना घडली होती. पैशांच्या कारणावरून झालेल्या वादातून (पान २ वर)

## जुलैपासून वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक अनिवार्य

**नियमभंग केल्यास दंड परिवहन मंत्री**

**मुंबई,ता.१४(प्रतिनिधी)–**



राज्यातील वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्याबरोबरच वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना १ जुलै २०२६ पासून उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) प्लेट बसविणे अनिवार्य केले आहे. यासाठी यापूर्वी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र राज्यातील उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) बसविण्याच्या कामाचा (पान २ वर)

## जांभळे काढताना झाडावरून पडलेल्या मुलाचा मृत्यू

**इचलकरंजीतील घटना**

**कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–**

**झाडावरून जांभळे काढताना तोल जाऊन पडल्याने गंभीर जखमी झालेल्या शालेय मुलाचा उपचारादरम्यान गुरुवारी सकाळी सीपीआर रुग्णालयात मृत्यू झाला. राज राजेश जुवे (वय १४, रा.गोसावी गल्ली,इचलकरंजी) असे मृत मुलाचे नाव आहे.**

सीपीआर पोलिस चौकीतून मिळालेल्या माहितीनुसार, राज हा नुकताच नववीच्या वर्गात गेला होता. बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास तो मित्रांसोबत घराजवळ खेळत होता.त्यावेळी घरासमोर असलेल्या जांभळाच्या झाडावरील जांभळे काढण्यासाठी (पान २ वर)

## मध्यरात्री डीजे ट्रायल

- सात जणांवर गुन्हा दाखल
- नोटीसीकडे दुर्लक्ष; शाहूपुरी पोलिसांची कारवाई

**कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–**

**छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या सूचना आणि लेखी नोटीस धुडकावून मध्यरात्री उशिरापर्यंत डीजे (ध्वनीक्षेपक) यंत्रणेची ट्रायल घेतल्याप्रकरणी विचारेमाळ येथील 'हिंदवी ग्रुप'च्या सात कार्यकर्त्यांवर शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

अभिषेक किशोर दाभाडे (रा. सदरबाजार), प्रेम कैलास सूर्यवंशी (रा. कदमवाडी रोड, विचारेमाळ), स्वराज महादेव खोंद्रे (रा. विचारेमाळ), करण राजू मोरे (रा. विचारेमाळ झोपडपट्टी), श्रेयस अशोक कलढोणे (रा. लिशा हॉटेल रोड, विचारेमाळ), प्रणव रमेश मुळीक आणि आदित्य मिलींद येडगे (पान २ वर)

महेंद्र Since 1905

MAHENDRA JEWELLERS Ichalkaranji.

We Are HIRING..!

1. Floor Supervisor 02
2. Sales Person 10
3. Accounts 02
4. Back Office 04
5. Office Boy 02
6. Telephone Operator 01

Computer knowledge is must.
Qualification : 12th Pass.
Attractive Salary with P.F. & ESIC.

Interview: Date Friday 15 May to 17 May 2026
Time : 11 am to 4 pm..

Mahendra Jewellers.. Date Mala, Ichalkaranji.
Contact No : 0230-2422551,7588326651

(पान १ वरून)

## अमेरिका-चीन संबंध सर्वात महत्त्वाचे-ट्रम्प

बीजिंगमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना ट्रम्प म्हणाले की, अमेरिका आणि चीनच्या नागरिकांमध्ये सुरुवातीपासूनच परस्पर सन्मानाचे दृढ नाते राहिले आहे. अमेरिकेच्या संस्थापक नेत्यांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, बेंजामिन फ्रँकलिन यांनी आपल्या वसाहतीकालीन वृत्तपत्रात चिनी तत्त्वज्ञ कन्फ्यूशियस यांचे विचार प्रकाशित केले होते. तसेच आजही अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीवर प्राचीन चिनी विद्वानांच्या मूर्ती अभिमानाने उभ्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

## दिल्लीत कर्मचाऱ्यांना "वर्क फ्रॉम होम"

आले आहेत. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी उच्चस्तरीय बैठकीत याबाबत निर्णय घेतले आहे.मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी जाहीर केले की दिल्लीतील सर्व सरकारी कार्यालयांमध्ये आठवड्यात २ दिवस वर्क फ्रॉम होम लागू करण्यात येणार आहे. तसेच खासगी कंपन्यांनाही आठवड्यात २ दिवस कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमची सुविधा देण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.सरकारने व्हीआयपी संस्कृती आणि इंधन खर्च कमी करण्याच्या दिशेनेही मोठे पाऊल उचलले आहे.

मुख्यमंत्री यांनी पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार आपल्या ताफ्यात ६० टक्के कपात केली आहे. आता त्यांच्या ताफ्यात फक्त चार वाहने असतील, त्यापैकी दोन इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही) आहेत. दरम्यान, बैठकीत मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या वाहन वापरावरही मर्यादा घालण्याचा निर्णय घेण्यात आला.

## बांगलादेशात गोवरचा कहर; ४३२ दगावले

एकूण संख्या ६० हजारांहून अधिक झाली असून, आरोग्य तज्ज्ञांनी याला अलीकडच्या वर्षांतील सर्वात मोठा उद्रेक म्हटले आहे. आरोग्य सेवा महा संचालनालयाच्या माहितीनुसार, सकाळपर्यंतच्या २४ तासांत या मृत्यूंची नोंद करण्यात आली. याच कालावधीत १,४८९ संशयित रुग्ण आढळले असून, संशयित संसर्गितांची एकूण संख्या ५३,०५६ झाली आहे. याशिवाय, १२६ पुष्टी झालेली प्रकरणे समोर आली असून, एकूण पुष्टी झालेल्या रुग्णांची संख्या ७,१५० वर पोहोचली आहे.

## जहाजांनी होर्मुझ केली पार

'एनव्ही सनशाइन'नेही होर्मुझ सामुद्रधुनी पार करताना अशीच पद्धत अवलंबली. पश्चिम आशियात अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कायम असताना आणि होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्याच्या परिस्थितीत ही घटना समोर आली आहे. वृत्तांनुसार, संयुक्त अरब अमिरातीतील (यूएई) रुवैस रिफायनरीमधून एलपीजी घेऊन निघालेले 'एनव्ही सनशाइन' हे जहाज भारतातील मंगलोरकडे जाताना शेवटचे दिसले होते.

दरम्यान, 'सिमी' हे जहाज कतारमधील रस लाफान बंदरातून गुजरातमधील कांडला येथे इंधन घेऊन जात आहे. या महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा युद्धविराम 'लाइफ सपोर्ट'वर असल्याचे म्हटले होते. यावरून दोन्ही देशांमधील संघर्ष अद्याप कायम असल्याचे संकेत मिळाले होते. इराणचा अणुकार्यक्रम थांबवणे आणि होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण यांसारख्या मुद्द्यांवरून दोन्ही देशांमध्ये वाद सुरू असल्याचे मानले जाते.

## जांभळे काढताना झाडावरून पडलेल्या मुलाचा मृत्यू

तो झाडावर चढला होता. मात्र, सुमारे १५ ते २० फूट उंचीवरून त्याचा तोल जाऊन तो खाली पडला. या दुर्घटनेत त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. नातेवाईकांनी तातडीने त्याला उपचारासाठी सीपीआर रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असताना गुरुवारी सकाळी सातच्या सुमारास त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या घटनेची नोंद सीपीआर पोलिस चौकीत करण्यात आली आहे. मृत राज याच्या पश्चात आई, वडील आणि विवाहित बहीण असा परिवार आहे.

## 'नीट'चे लातूर कनेक्शन

होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यापूर्वी लातूरमधील एका पालकाने नीट परीक्षा पेपर संदर्भात पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दिली होती. त्यानंतर तत्कालीन पोलीस उपअधीक्षक समीरसिंह साळवे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. या प्रकरणात आणखी काही जणांची चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## वडिलार्जीत मिळकतीच्या वादातून मारहाण

सुरुवात केली. त्यातून वाद वाढत गेला आणि निस्सार यांच्यासह त्यांची दोन मुले निहाल व नदीम तसेच पत्नी शबाना यांनी मुस्ताक यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करु लागले. हा वाद मिटविण्यासाठी मुस्ताक यांचा मुलगा अमन व पत्नी शहनाज हे आले असता त्यांनाही काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी निस्सार ताजुद्दीन पैलवान, सौ. शबाना निस्सार पैलवान, निहाल निस्सार पैलवान व नदीम निस्सार पैलवान या चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस दुचाकीने विधानभवनात

आणि मंत्री आशीष शेलार हेही उपस्थित होते. इंधन बचतीच्या उद्देशाने राज्याचे मंत्री नितेश राणे यांनीही मंत्रालयातील मंत्रिमंडळ बैठकीसाठी पायी जाण्याचा निर्णय घेतला. बुधवारी मुख्यमंत्री फडणवीस यांनी अनेक काटकसरीच्या उपाययोजनांची घोषणा केली होती. यामध्ये मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या निम्मी करणे तसेच मंत्री आणि अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करणे यांचा समावेश आहे.

# सत्ताधारी-विरोधकांच्या साठमारीत मूळ प्रश्न बाजूला

## आरोप-प्रत्यारोप बाजूला ठेऊन पाणी प्रश्न सोडविण्याची मागणी

**इचलकरंजी, ता.१४–**

**शहराचा पाणीप्रश्न महत्वाचा असताना सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुरू आरोप-प्रत्यारोपामुळे मूळ प्रश्न बाजूला पडताना दिसत आहे. चमकोगिरीला उताविळ झालेल्या लोकप्रतिनिधींच्या प्रवृत्तीमुळे नागरिकांतून संताप व्यक्त केला जात असून एकमेकांची उणीदुणी काढण्यापेक्षा पाणी प्रश्न कसा सुटेल याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकातून होत आहे. शिवाय सत्तारूढ आणि विरोधकांच्या या प्रकारामुळे अधिकारी वर्गाची पुरती कोंडी होताना दिसत आहे.**

इचलकरंजी शहराला सध्या ५४ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. मात्र पाण्याची ही गरज आजही पूर्ण होत नसल्याने कधी दोन तर कधी चार दिवसातून एकदा पाणी पुरवठा होत आहे. कृष्णा योजनेला वारंवार लागणारी गळती आणि कालबाह्य झालेली पंचगंगा योजनेमुळे शहर कायम तहानलेले असल्याचे दिसते.

दरम्यान, महिनाभरापूर्वी विरोधी शिव शाहू विकास आघाडीच्या सदस्यांनी अचानक मजरेवाडी येथील कृष्णा नळपाणी पुरवठा योजनेच्या जॅकवेलचा दौरा केला. त्यांनी तेथील वस्तूस्थिती समोर आणली.

पाठोपाठ महापौर देखील काही पदाधिकाऱ्यांना घेऊन मजरेवाडीला गेले. त्यानंतर महापौर यांनी विरोधकांचे आरोप खोडण्याचा प्रयत्न केला. मात्र हा प्रश्न इथेच न संपता विरोधी पक्षाने पाणीप्रश्नावर विशेष सभा घेण्याची मागणी केली. त्यानुसार दोन दिवसांपूर्वी महापालिकेची विशेष सभा पार पडली.

शहराला स्वच्छ व मुबलक पाणी मिळावे, सुळकूड योजना राबवावी यावर सभेत दोन्ही गटांचे एकमत होते. तरीही पाणी प्रश्नासंबधीची सभा तब्बल चार तास चालली. कृष्णा नळपाणी योजनेवर झालेला अवाढव्य खर्च पहाता वॉटर ऑडीट आणि एनर्जी ऑडीट करण्याची मागणी विरोधकांनी सभेत केली. पण आरोप-प्रत्यारोपाच्या साठमारीत मूळ विषय मात्र बाजूलाच राहिला. दरम्यान, महासभेत पाणीपुरवठा खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरानंतर विरोधी पक्षनेते उदयसिंग पाटील यांनी थेट अधिकाऱ्यांना घेऊन जलशुद्धिकरण केंद्रातील पंपांची मोजणी केली आणि एक निवेदन जाहीर केले. त्याला महापौर उदय धातुंडे यांनी काल उत्तर दिले तसेच गुरूवारी येऊन पंपांची मोजणी करीत समाजमाध्यमांवर निवेदन प्रसिद्ध केले. या दोन्ही वेळेला अधिकारीच अडचणीत सापडले.

याबाबत नागरिकांतून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. तुमचे आरोप-प्रत्यारोप थांबवा, आम्हाला शुद्ध आणि मुबलक पाणी द्या, अशी भावना नागरिकांतून व्यक्त केली जाताना दिसत आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांच्या या साठमारीत मात्र नागरिक आणि अधिकारी भरडले जात आहेत.

**तोडगा काढण्याऐवजी कोंडीत पकडण्याचा प्रकार**

पाणी वितरण पंपाची संख्या किती आहे, याबाबत सभेत चर्चा झाली. त्याला अधिकाऱ्यांनी उत्तर दिले. पण विरोधकांनी पुन्हा प्रश्न उपस्थित केल्याने आरोप-प्रत्यारोपाचा प्रकार वाढत गेला. तेव्हा सत्ताधारी व विरोधकांनी एकत्र बसून सामोपचाराने जलशुद्धिकरण केंद्रातील प्रश्न सोडविण्याची गरज असताना अधिकाऱ्यांनाच कोडीत पकडण्याचा प्रकार सुरू झाला त्यामुळे मूळ पाणीप्रश्न बाजूलाच पडला असल्याचे दिसत आहे.

# गोळीबार करून शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी

**कराड,ता.१४(प्रतिनिधी)–**

**धोंडेवाडी (ता.कराड) येथे शेतातील शेतीपंपाच्या वायरच्या किरकोळ वादातून तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणात छऱ्याच्या बंदुकीतून गोळीबार करून शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सहाजणांविरुद्ध कराड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोघांना शस्त्रासह ताब्यात घेतले आहे.**

याप्रकरणी धनाजी पोपट पाटील (वय ३६,रा.धोंडेवाडी यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार जगन्नाथ रामचंद्र पाटील, भिमराव आबा खबाले, छाया जगन्नाथ पाटील, सुनंदा जालींदर पाटील, रघुनाथ रामचंद्र पाटील आणि जयश्री रघुनाथ पाटील (सर्व रा.धोंडेवाडी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### छऱ्याच्या बंदुकीचा वापर ; सहाजणांवर गुन्हा

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, धनाजी पाटील यांच्या शेतातील शेतीपंपाच्या मोटारीची वायर तोडण्यात आली होती. ती जोडण्यासाठी ते शेतात गेले असता जगन्नाथ पाटील यांनी वायर जोडली तर जीवे मारून टाकीन, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर धनाजी पाटील यांनी आपल्या वडिलांना याची माहिती दिली. वडील घटनास्थळी आल्यानंतर त्यांनी मोटारीची वायर पुन्हा जोडली.

दुपारच्या सुमारास धनाजी पाटील हे शेतात पाणी देत असताना जगन्नाथ पाटील हे बंदूक घेऊन तेथे आले. त्यांनी काही अंतरावर बंदुकीतून गोळीबार केला आणि तेथून निघून गेले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, काही वेळानंतर पुन्हा संबंधितांनी शेतात जाऊन धनाजी पाटील यांना धमकावल्याचा आरोप आहे. यावेळी भिमराव खबाले हेही तेथे उपस्थित होते. पोलिस घटनास्थळी पोहोचल्यानंतर छाया पाटील, सुनंदा पाटील, रघुनाथ पाटील आणि जयश्री पाटील यांनी एकत्र येऊन शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणात पोलिसांनी जगन्नाथ पाटील आणि भिमराव खबाले यांना शस्त्रासह ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे.

# १३ तोळे दागिने लांबविले

(पान १ वरून)

म्हणून जबाबदारी आहे. सोमवार दि. ११ रोजी फिर्यादी नूतन यांच्या परिचयातील शिक्षकाच्या मुलाचे लग्न असल्याने त्या पतीसह चारचाकीने ईश्वरपूरला गेल्या होत्या. जाताना त्यांनी पिशवीमध्ये तेरा तोळे सोन्याचे दागिने नेले होते. यामध्ये ८० ग्रॅमचे सोन्याचे गंठन, ३० ग्रॅमचा राणीहार आणि २० ग्रॅमचे सोन्याची कानातील डुल असा ऐवज होता.

दरम्यान बुधवारी लग्नाचा कार्यक्रम संपल्यावर नूतन या त्यांचे वडिल रघुनाथ माळी आणि मुलगा अर्णव यांच्यासमवेत ईश्वरपूर बसस्थानकावर आल्या. तेथून त्या सांगलीकडे येणाऱ्या बसमध्ये (क्र.एमएच १४ बीटी ३०६९) बसल्या. सायंकाळी ७.३० च्या सुमारास बस सांगली बसस्थानकावर आली असता बसमधील प्रवाशी खाली उतरत असताना नूतन यांच्या खांद्याला अडकवलेली पिशवी कोणीतरी ओढली. त्यानंतर लागलीच त्यांनी पिशवी पाहिली असता ती एका बाजूने फाटलेली दिसली तसेच आतील दागिन्याचा बॉक्स लंपास करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यांनी बसमध्ये आणि परिसरात शोधाशोध केली असता चोरटा मिळून आला नाही. पोलिसांनी चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# जीवघेणा हल्ल्याप्रकरणी एकास ३ वर्षे सक्तमजुरी

(पान १ वरून)

आरोपी सुहेल बारस्कर याने फिर्यादी सैफ दिवाण यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने हल्ला केला होता. याप्रकरणी इस्लामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सागर गायकवाड यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी मा. तदर्थ अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश अव्वल काशीकर यांच्या न्यायालयात झाली.

न्यायालयाने साक्षीपुरावे व तपासाअंती आरोपी सुहेल रियाज बारस्कर यास भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२६ नुसार तीन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा व २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला. दंड न भरल्यास सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी सैफ दिवाण, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय राम देशपांडे यांनी महत्त्वाची साक्ष दिली.

# उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक अनिवार्य

(पान १ वरून)

आढावा घेतल्यानंतर वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी आता ही मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट्स आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये वाहनांचा गैरवापर रोखण्यासाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) ही अत्यंत महत्त्वाची यंत्रणा आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात जुन्या वाहनांनाही उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी मुदतवाढीचा लाभ घेत वेळेत एचएसआरपी बसवून घ्यावी. वाहन मालकांनी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन बसविण्यासाठी आगाऊ वेळ निश्चित करावी. संबंधित वाहनधारकांनी ३० जून २०२६ पूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. मंत्री सरनाईक पुढे म्हणाले की, ज्या वाहनधारकांनी मुदतीत एचएसआरपी बसवून घेतले नाही किंवा अपॉइंटमेंट नोंदवली नाही, अशा वाहनांची १ जुलै २०२६ पासून रस्त्यावर विशेष तपासणी मोहीम राबवून पडताळणी करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल तसेच १ हजार रुपयांपर्यंत तडजोड शुल्क आकारण्यात येईल.

वाहनधारकांनी केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच एचएसआरपी साठी नोंदणी करावी आणि कोणत्याही अनधिकृत व्यक्ती अथवा एजंटच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहनही परिवहन मंत्र्यांनी केले आहे.

# विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित दहा सदस्यांना दिली शपथ

(पान १ वरून)

असताना काही नवनिर्वाचित सदस्यांच्या उपस्थितीवरून, विशेषतः बच्चू कडू आणि अंबादास दानवे यांच्या उपस्थितीमुळे राजकीय चर्चांना उधाण आले होते. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे झिशान सिध्दीकी यांनी सदस्यत्वाची शपथ इंग्रजी भाषेतून घेतली. त्यामुळे देखील शिवसेना शिंदे गटाने आक्षेप घेतला. विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात हा शपथविधीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सभापती प्रा.राम शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित विधानपरिषद सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोड, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, आमदार रविंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

# भोंदू खरातशी कोणताही आर्थिक व्यवहार नाही

### रूपाली चाकणकर

**मुंबई,ता.१४–**

**महिला लैंगिक अत्याचार प्रकरणातील भोंदूबाबा अशोक खरातसोबत कोणतेही आर्थिक संबंध नसल्याची माहिती रूपाली चाकणकर यांची दिली.**

एसआयटीने महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची तब्बल ६ तास चौकशी केली होती. त्यानंतर, खरातच्या मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने रुपाली चाकणकर यांना चौकशीसाठी बोलवले होते. त्यासाठी, रूपाली चाकणकर सकाळी १०.३० वाजतात वरळी ऑफिसमध्ये दाखल झाल्या होत्या. ईडीकडून आजही जवळपास त्यांची ६ तास चौकशी करण्यात आली. चौकशीनंतर बाहेर आल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना, अशोक खरातसोबतच्या गुवाहटी दौऱ्यासंदर्भाने भाष्य केले.

चाकणकर यांनी सांगितले कि, ईडीने चौकशिला बोलवले तेव्हा मी आले आहे, अनेक बातम्यामधून विपर्यास केला गेला आहे. आज जबाब नोंदवून घेण्यासाठी खूप वेळ लागला.

खरात प्रकरणात माझा कोणताही संबंध नव्हता आणि नाही, असे रुपाली चाकणकर यांनी म्हटले. ईडीने मला आज काय प्रश्न विचारले होते ते लवकरच अहवालातून समोर येईल, तेव्हा सर्व गोष्टी बाहेर येतील. इथून पुढेही मी तपासाला सहकार्य करेन. अशोक खरातकडून जी खाती बनवली गेली ती बनावट होती, समता पतसंस्थेशी माझ्या बहिणीचा संबंध नाही, असेही चाकणकर यांनी यावेळी सांगितले.

## ई.पी.एस.९५ च्या पेन्शनरांना नऊ हजार रूपये पेन्शन द्यावी

**इचलकरंजी,ता.१४–**

**पेन्शनरांचे बदलते जीवनमान, वाढलेल्या गरजा, महागाई, औषधोपचार खर्च लक्षात घेता पेन्शनरांना नऊ हजार पेन्शन व त्यात महागाई भत्त्याची जोड द्यावी अशी मागणी दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सहकारी साखर कारखाना निवृत्त संघाचे अध्यक्ष आण्णासाहेब शहापुरे यांनी केली आहे.**

गेल्या चार दिवसांत सोशल मिडियावर ई.पी.एस. पेन्शन ७५०० रूपये झाल्याबद्दल पत्र व या पत्रावर भारत सरकारची सिंहमुद्रा, श्रम मंत्रालयाचा पत्ता व अवर सचिवाची खोटी स्वाक्षरी असल्याचे अध्यादेश फिरत असून ती खोटी व बनावट असल्याचे व आम्ही नऊ हजार रूपये पेन्शन मागणीवर ठाम असल्याचे आण्णासाहेब शहापुरे यांनी शेवटी सांगितले.

या बैठकीस संघाचे उपाध्यक्ष पंडीत खाडे, वसंतराव टोणे, बाळासाहेब कुंभार, किसन कुंभार, हिंदुराव बागल, बाबगोंडा पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मध्यरात्री डीजे ट्रायल

(पान १ वरून)

(दोघेही रा. शाहू कॉलेजसमोर, विचारेमाळ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

शाहुपुरी पोलीसांनी दिलेली माहिती अशी, छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त विविध मंडळांनी मिरवणुकांचे आयोजन केले होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच ध्वनीप्रदूषण नियमांचे उल्लंघन होऊ नये

यासाठी शाहूपुरी पोलिसांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन मध्यरात्री डीजे ट्रायल न घेण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. यासंदर्भात मंडळांना लेखी नोटिसाही बजावण्यात आल्या होत्या. असे असतानाही बुधवार (दि.१३) रोजी मध्यरात्री विचारेमाळ परिसरात 'हिंदवी ग्रुप'च्या वतीने डीजे यंत्रणेची ट्रायल घेण्यात आली. पोलिसांच्या सूचनांचे उल्लंघन झाल्याने शाहूपुरी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला.

## नोकरीतील आरक्षणावर सरकारचा मोठा निर्णय

(पान १ वरून)

मराठा समाजासाठी स्वतंत्र प्रवर्गांतर्गत १० टक्के आरक्षणाचा कायदा करण्यात आला असून, त्यानुसार राज्यातील एकूण उभे आरक्षण वाढले आहे.

पारंपरिक सामाजिक आरक्षण मिळून सुमारे ५२ टक्के, (मराठा) जोडल्यास उभे आरक्षण सुमारे ६२ टक्के, स्वतंत्र १० टक्के. त्यामुळे प्रत्यक्ष भरतीमध्ये लागू रचना ही संबंधित कायदे, रोस्टर आणि न्यायालयीन स्थितीवर अवलंबून असते.

# कोल्हापुरात टोळ्यांचा थरार; खंडणीच्या कारणावरून हाणामारी

(पान १ वरून)

करण्यात आली आहे. स्नेहल संजय चौगले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चिकन सेंटरजवळ थांबलेल्या त्यांच्या गटावर विरोधी टोळीतील सात जणांनी बांबूने हल्ला केला. या मारहाणीत स्नेहल चौगले आणि ऋषिकेश चौगले जखमी झाले.


योगेश नलवडे यांच्या तक्रारीवरून ऋषिकेश चौगले, अक्षय चौगले, विशाल लातूर, अजय लातूर, अमित दिंडे आणि रामा कुलकुटकी यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तर स्नेहल चौगले यांच्या फिर्यादीनुसार योगेश चौगले, महेश नलवडे, सूरज दिंडे, रोहित कुऱ्हाडे, ऋषिकेश नलवडे, रुतेश कुऱ्हाडे आणि रुणांश कुऱ्हाडे यांच्यावर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

या प्रकरणातील अनेक आरोपींवर यापूर्वीही विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

खंडणी हे तात्काळ कारण असले तरी परिसरातील वर्चस्वाच्या संघर्षातून हा राडा झाल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे. वारंवार पोलिस कारवाया होऊनही या टोळ्या पुन्हा सक्रिय होत असल्याने त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी नागरिकांतून होत आहे.


|| दुःखद निधन ||



स्व.श्री. बसवराज सिध्दलिंगया चडचणकर-स्वामी

आमचे वडिल श्री. बसवराज सिध्दलिंगया चडचणकर-स्वामी यांचे गुरूवार, दि. १४ मे २०२६ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृधापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

- शांतेश बसवराज चडचणकर-स्वामी
- राजेश बसवराज चडचणकर-स्वामी

* माती सावडणे कार्यक्रम : आज शुक्रवारी, सकाळी ८ वा. लिंगायत रूद्रभुमी येथे आहे.

भावपुर्ण श्रध्दांजली!



कै. शेषाप्पा अनिगोळ (आप्पाजी)

आमच्या संस्थेचे ऑडीटर व मार्गदर्शक श्री. संजय अनिगोळ साहेब (चार्टर्ड अकौंटंट) यांचे वडिल श्री. शेषाप्पा अनिगोळ यांचे रविवार, दि.१०/५/२०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

श्री संत ज्ञानेश्वर माऊली नागरी सहकारी पतसंस्था, मर्या., इचलकरंजी

* संचालक व सेवकवर्ग *

# जलशुध्दीकरण केंद्रातील १७ पंप कार्यान्वित

## शहराचा पाणी पुरवठा सुरळीत : महापौर धातुंडे

**इचलकरंजी,ता.१४–**

**इचलकरंजी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलशुध्दीकरण केंद्रातील १७ पंप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून पर्यायी व्यवस्था म्हणून चालू स्थितीत ७ पंप उपलब्ध आहेत. त्यामुळे शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होणार नाही, अशी ग्वाही महापौर उदय धातुंडे, सभागृह नेते विठ्ठल चोपडे यांनी दिली. यावेळी शहरातील पाणी पुरवठा नियोजनाची पूर्णत: जबाबदारी विठ्ठल चोपडे यांच्यावर सोपविण्यात आल्याचे महापौर यांनी सांगितले.**



**जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी करताना महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या, गटनेते विठ्ठल चोपडे, रवि रजपुते, सुशांत कलागते, रुबेन आवळे, अभिषेक वाळवेकर (छाया : मयूर चिंदे)**

विरोधकांनी केलेल्या आरोपांवर वस्तु:स्थितीची माहिती घेण्यासाठी गुरुवारी महापौरांसह सत्तारुढ गटातील नगरसेवकांनी जलशुध्दीकरण केंद्रास भेट देऊन पाहणी केली. पाहणीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना महापौर धातुंडे यांनी, नुकत्याच झालेल्या विशेष सभेत विरोधकांकडून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचे आरोप करण्यात आले होते. जनतेला प्रत्यक्ष वस्तु:स्थिती समजावी यासाठी आज येथे भेट दिली आहे. विरोधी पक्ष नेते उदयसिंग पाटील यांनी पूर्ण माहिती घेऊनच आरोप करावेत, असे सांगताना सभागृहात चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. विरोधी पक्षनेत्यांनी कविता करत देवाभाऊंवर विश्वास दाखविला असून तो सार्थ ठरविण्याचे काम आम्ही करणार आहोत.

सभागृह नेते विठ्ठल चोपडे यांनी, जलशुध्दीकरण केंद्रात एकूण १७ पंप पूर्ण क्षमतेचे कार्यान्वित असून त्यातील १० पंपाद्वारे शहराला पाणी पुरवठा केला जातो. ७ पंप पर्यायी व्यवस्था म्हणून ठेवले आहेत. शहरातील ३ ते ४ ठिकाणी दोन जलकुंभ असल्याने त्याठिकाणी एकच रायझिंग पाइपमुळे एकाच पंपाद्वारे पाणी दिले जाते. ही वस्तु:स्थिती असताना विरोधकांकडून दिशाभूल केली जात असल्याचे आरोप केले जात आहेत. सत्तारुढ गटाकडून माझ्यावर पाणी पुरवठ्याच्या नियोजनाची जबाबदारी दिली आहे. सध्या दोन दिवसआड पाणी दिले जात असले तरी तांत्रिक बाबी पूर्ण केल्यानंतर एकदिवसआड पाणी देण्याचा आमचा प्रयत्न राहिल, असे सांगितले.

यावेळी उपमहापौर अनिल डाळ्या, स्थायी सभापती सतिश मुळीक,जलअभियंता अभय शिरोलीकर रुबन आवळे, सुशांत कलागते, नितेश पोवार, रवी रजपुते, अभिषेक वाळवेकर, प्रमोद बचाटे, सदानंद दळवाई आदी उपस्थित होते.

# मजुरीवाढ प्रश्नी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे

## जिल्हाधिकाऱ्यांकडे आज बैठक

**इचलकरंजी,ता.१४–**

**इचलकरंजीतील खर्चीवाल्या यंत्रमागधारकांना मजुरी वाढ मिळावी या मागणीसाठी कोल्हापूर जिल्हा पॉवरलूम असोसिएशनचे संस्थापक पुंडलिकराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळाने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन यात लक्ष घालावे अशी मागणी केली.**

यानुसार त्यांनी कोल्हापूर जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क सादर तातडीने बैठक घेऊन योग्य तोडगा काढावा अशा सूचना केल्या असून त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी उद्या शुक्रवार, ता. १५ रोजी सकाळी ११ वाजता खर्चीवाल्या यंत्रमागधारकांची बैठक बोलवली आहे.

सन २०१३ पासून खर्चीवाल्या यंत्रमागधारकांना ट्रेडिंग असोसिएशनकडून एक नया पैसा मुजरीवाढ मिळाली नाही. पर्यायाने विजेचे वाढते दर, यंत्रमागाला लागणारा खर्च व इतर अनुषंगिक प्रचंड खर्च वाढल्याने हा उद्योग बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या मागणीसाठी गेल्या आठ दिवसापासून इचलकरंजी व परिसरातील यंत्रमाग बंद असल्याने शहराची औद्योगिक शांतता धोक्यात आल्याचे शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधला व तातडीने बैठक बोलावण्याचे निर्देश दिले.

यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचेशी मजूरी वाढी संदर्भात चर्चा करुन मार्ग काढण्याची मागणी केली. यावेळी यंत्रमागधारकांच्यावतीने पुंडलिक जाधव, विश्वनाथ मेटे, विनय महाजन, शहाजी भोसले, नंदकुमार लोखंडे यांचा सहभाग होता.

**※ सांगली,ता.१४(प्रतिनिधी)–** कवलापूर येथील सिद्धेश्वर मंगल कार्यालयाजवळ असलेल्या एका घरातील दागिन्यावर चोरट्याने डल्ला मारला. सुमारे १ लाख २ हजार रुपयांचा ऐवज चोरून चोरटा पसार झाला आहे. याप्रकरणी सविता विश्वास माळी यांनी सांगली ग्रामीण पोलीसात फिर्याद दिली आहे.




# वाहतूक शाखेच्या पोलीसाशी वाद

## अल्पवयीन मुलासह तिघांवर गुन्हा


**इचलकरंजी,ता.१४–**

**अल्पवयीन मुलाच्या ताब्यात वाहन दिल्याप्रकरणी कारवाई करत असताना वाहतूक नियंत्रण शाखेच्या कर्मचाऱ्याशी वाद घातल्याच्या कारणावरुन अल्पवयीन मुलासह तिघांवर शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

गणेश मारुती कुंभार (वय २६ रा. तांबेमाळ) व प्रकाशभाई (रा. रणछोडनगर राजकोट) अशी त्यांची नांवे आहेत. या प्रकरणी पोलिस अंमलदार विशाल महेश बाटुंगे यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, येथील शहर वाहतूक नियंत्रण कार्यालयासमोरुन (जीजे ०३ केक्यु ७३७२) या दुचाकीवरुन अल्पवयीन मुलासह गणेश कुंभार, प्रकाशभाई तिघेजण निघाले होते. दुचाकी अल्पवयीन मुलगा चालवत असलेने पोलिस अंमलदार बाटुंगे यांनी त्यांना थांबविले. परवाना नसताना अल्पवयीन मुलास वाहन चालविणेस दिलेप्रकरणी कारवाई करत असताना कुंभार व प्रकाशभाई यांनी त्यांच्याशी वाद घालत कामात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तिघांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



महासत्ता

सुविचार :- ध्येयावर लक्ष ठेवा, लोकांवर नाही. लोक बदलतात, ध्येय नाही.



▪ संपादकीय ▪

# ब्रिटनमधील नवे संकट

ब्रिटनचे विद्यमान पंतप्रधान आणि लेबर पार्टीचे नेते कीर स्टार्मर यांच्या विरोधात पक्षांतर्गत मोठ्या प्रमाणात वातावरण निर्मिती झाल्याने त्यांच्यावर पंतप्रधानपद सोडण्याचा दबावही वाढत चालला आहे. या निमित्ताने ब्रिटनमध्ये गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या अस्थिरतेची प्रक्रिया अधिकच गडद होताना दिसत आहे. खरेतर गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर काँजर्व्हेटीव्ह पक्षाचा पराभव करून कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीने दीर्घकाळानंतर पुन्हा एकदा सत्ता मिळवली होती व सर्वसामान्य ब्रिटिश नागरिकांच्या मनातही काही आशा आकांक्षा प्रज्वलित झाल्या होत्या. मात्र, आज दोन वर्षांनंतर पंतप्रधान स्टार्मर यांच्या निष्क्रिय कारकिर्दीची अनेक उदाहरणे समोर येत असल्याने ब्रिटनमध्ये अस्वस्थता आणि अस्थिरता वाढत चालली आहे. भारतीय लोकशाहीपेक्षा वेगळे राजकारण करणाऱ्या ब्रिटनमध्ये कदाचित क्वचितच अशा प्रकारची अस्वस्थता पाहायला मिळते. गेल्या ५ ते ६ वर्षांच्या कालावधीमध्ये ब्रिटनने तेवढ्याच संख्येचे पंतप्रधान बघितले. बोरीस जॉन्सन यांच्यासारख्या कॅज्युअल ॲप्रोच असणाऱ्या पंतप्रधानानंतर कोणत्याही पंतप्रधानाला पाच वर्षे पूर्ण करता आले नाहीत. लिझ ट्रस, टेरेसा मे किंवा ऋषी सुनक यांनीसुद्धा अल्पकाळच आपली कारकीर्द गाजवली. ऋषी सुनक पंतप्रधान असतानाच ब्रिटनमध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली. पण सुनक यांच्या नेतृत्वाखाली काँजर्व्हेटीव्ह पक्षाला निवडणूक जिंकता आली नाही आणि ब्रिटिश जनतेने पुन्हा लेबर पार्टीकडे सत्ता सोपवली. पण कीर स्टार्मर यांना गेल्या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये कोणताही प्रभाव दाखवता आलेला नाही. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लेबर पार्टीचा झालेला दारुण पराभव हा अखेरचा घाव ठरला आणि लेबर पार्टीमधीलच अनेक संसद सदस्य आणि स्टार्मर यांच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्र्यांनी स्टार्मर यांनी राजीनामा द्यायला हवा अशी मते व्यक्त केली आहेत. स्टार्मरबाबत निश्चितच अविश्वासाची भावना तयार झाली आहे. जरी त्यांनी थेट राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली नसली तरी स्टार्मर यांनी आपण पदावरून कधी उतरणार आहोत याचे वेळापत्रक जाहीर करावे अशी मागणी मात्र जोर धरत आहे. ब्रिटिश लोकशाहीतील नियमाप्रमाणे २०% पेक्षा जास्त संसद सदस्यांनी जर मागणी केली तर पंतप्रधान पदावरील व्यक्तीला आपल्या नेतृत्वाचा फेरविचार करावा लागतो. या परिस्थितीमध्ये संबंधित नेत्याने राजीनामा दिला नाही तर पर्याय उभा करून निवडणूक घेतली जाते आणि जी व्यक्ती निवडून येईल त्याला पंतप्रधानपद दिले जाते. स्टार्मर यांनी अद्यापही आपल्या राजीनाम्याचे वेळापत्रक जाहीर केले नसल्याने आगामी कालावधीमध्ये लेबर पार्टीमध्ये अधिकच अस्वस्थता वाढू शकते. सर्वात महत्त्वाची गोष्ट ही आहे की अनेक वर्षांनंतर प्रथमच ब्रिटनमध्ये दोनपेक्षा जास्त पक्षांचे राजकारण सुरू झाले आहे. खरे तर ब्रिटनमध्ये पूर्वापार लेबर पार्टी विरुद्ध काँजर्व्हेटीव्ह पार्टी अशीच लढत असायची. लिबरल पार्टीसारखे एक-दोन छोटे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात असायचे. पण त्यांचा कोणताही प्रभाव निवडणुकीच्या राजकारणावर नसायचा. पण गेल्या काही दिवसांपासून यूके रिफॉर्म आणि ग्रीन या नावाच्या दोन राजकीय पक्षांनी ब्रिटनमध्ये आपला प्रभाव वाढायला सुरुवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये यूके रिफॉर्म या राजकीय पक्षाने अत्यंत चांगली कामगिरी केल्यामुळेच लेबर पार्टीमध्ये अस्वस्थता वाढली आहे. वृत्तवाहिन्यांनी आणि माध्यमांनी केलेले सर्वेक्षण पाहता पंतप्रधान स्टार्मर यांची लोकप्रियता झपाट्याने कमी होत आहे आणि त्याचा परिणाम लेबर पार्टीच्या लोकप्रियतेवरही होऊ लागला आहे. आतापर्यंत फक्त काँजर्व्हेटीव्ह पक्षासोबत लढत देऊन निवडणुकीच्या मैदानात उतरणाऱ्या लेबर पार्टीसाठी आता यूके रिफॉर्म आणि ग्रीन यासारख्या नवीन राजकीय पक्षांचा प्रभावही आव्हानात्मक वाटू लागला आहे. त्यातूनच पक्षाची प्रतिमा सुधारण्यासाठी स्टार्मर यांना बाजूला करण्याची मोहीम सुरू झाली आहे. इतर जागतिक अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत असताना ब्रिटिश अर्थव्यवस्था संकटात सापडली आहे. विद्यमान सरकारने अर्थव्यवस्थेची परिस्थिती सुधारण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. बेरोजगारी वाढत आहे, महागाईवर नियंत्रण नाही. सर्वसाधारण नागरिकांच्या मनात विद्यमान सरकारबद्दल प्रचंड रोष आहे. आता जर मध्यावधी निवडणूक झाली तर लेबर पार्टीला यश मिळणार नाही असेच सर्व कल आणि कौल सांगतात. साहजिकच ह्या परिस्थितीमध्ये पंतप्रधान स्टार्मर यांना बाजूला करून त्यांच्या जागी अन्य एखाद्या प्रभावशाली नेत्याची नियुक्ती करण्याचा विचार लेबर पार्टीमध्ये सुरू आहे. अनेक इच्छुकांनी आपली फिल्डिंग लावली असली तरी जोपर्यंत स्टार्मर स्वतःहून राजीनामा देत नाहीत किंवा आपण पदावरून कधी उतरणार आहोत याचे वेळापत्रक जाहीर करत नाहीत तोपर्यंत ब्रिटनमधील ही अस्थिरता आणि अस्वस्थता कायमच राहणार आहे.

# लोकसंख्या संकटात युरोप

**एकेकाळी औद्योगिक प्रगती, आधुनिक जीवनशैली आणि आर्थिक स्थैर्याचे प्रतीक मानला जाणारा युरोप आज एका वेगळ्याच संकटाशी सामना करत आहे. हे संकट युद्धाचे अथवा आर्थिक मंदीचेही नाही; तर ते आहे वेगाने बदलणाऱ्या लोकसंख्यात्मक वास्तवाचे. युरोपसमोर उभा राहिलेला प्रश्न केवळ किती लोक राहतील यापुरता मर्यादित नाही, तर भविष्यात समाजाची रचना कशी असेल, अर्थव्यवस्थेचे चक्र कोण फिरवेल आणि सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा भार कोण उचलेल, या मूलभूत प्रश्नांशी तो जोडलेला आहे.**

अलीकडील अंदाजानुसार, या शतकाच्या अखेरीस युरोपीय संघाच्या लोकसंख्येत सुमारे १२ टक्के घट होण्याची शक्यता आहे. सध्याच्या घडीला युरोपची लोकसंख्या स्थिर दिसत असली तरी २०२९ नंतर घसरणीचा वेग अधिक स्पष्ट होऊ शकतो. २१०० पर्यंत युरोपची लोकसंख्या ४० कोटींच्या खाली जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र हा बदल लोकसंख्येच्या रचनेत आमूलाग्र परिवर्तन घडवणारा आहे. तरुण आणि कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या कमी होत असताना ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. परिणामी, युरोप एका 'वृद्ध समाजा'कडे वाटचाल करताना दिसत आहे. या संकटामागील सर्वात मोठे कारण म्हणजे घटता जन्मदर. कोणत्याही समाजाची लोकसंख्या स्थिर राहण्यासाठी प्रति महिले मागे सरासरी २.१ अपत्ये जन्माला येणे आवश्यक मानले जाते. मात्र युरोपातील अनेक देशांमध्ये हे प्रमाण १.३ च्या आसपास घसरले आहे. म्हणजेच जुन्या पिढीची जागा घेण्याइतकी मुले नव्या पिढीत जन्माला येत नाहीयेत. यामागे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांची मोठी पार्श्वभूमी आहे. शिक्षण आणि करिअरला प्राधान्य,उशिरा होणारे विवाह, मातृत्व पुढे ढकलण्याची प्रवृत्ती,महागडी जीवनशैली, घरांच्या वाढत्या किंमती आणि मुलांच्या संगोपनाचा प्रचंड खर्च यामुळे कुटुंबसंस्था बदलत आहे. अनेक तरुण दाम्पत्ये एकच मूल किंवा मूल नको, हा पर्याय स्वीकारताना दिसतात. युरोपमधील बदलत्या जीवनशैलीचा आणखी एक पैलू म्हणजे वैयक्तिक स्वातंत्र्याला दिले



जाणारे प्राधान्य. आधुनिक समाजात करिअर, प्रवास, आर्थिक स्थैर्य आणि वैयक्तिक जीवनमान यांना महत्त्व वाढले आहे. त्यामुळे कुटुंब विस्तार ही अनेकांसाठी प्राथमिकता राहिलेली नाही. परिणामी, लोकसंख्या घट ही केवळ जैविक किंवा आर्थिक समस्या न राहता ती सामाजिक मानसिकतेतील बदलांचे प्रतिबिंब बनली आहे. फ्रान्ससारख्या देशात याचे गंभीर परिणाम दिसू लागले आहेत. चांगला जन्मदर असूनही २०२५ मध्ये प्रथमच मृत्यूंची संख्या जन्मांपेक्षा अधिक नोंदविली गेली. ही बाब युरोपसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इम्यॅन्युअल मॅक्रॉन यांनी लोकसंख्या वाढीसाठी कुटुंबाभिमुख धोरणांची गरज अधोरेखित केली आहे. प्रजनन सेवांचा विस्तार, पालकांना आर्थिक मदत,बालसंगोपन सुविधा आणि तरुणांना लवकर कुटुंब सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र तज्ज्ञांच्या

**दैनंदिनी**

मते, केवळ आर्थिक सवलतींनी हा प्रश्न सुटणार नाही. कारण हा बदल समाजाच्या विचारसरणीत खोलवर रुजलेला आहे. लोकसंख्या घटण्याचा सर्वात मोठा परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार आहे. युरोपची आर्थिक ताकद ही उत्पादनक्षम आणि कुशल कामगारांवर उभी राहिली होती. पण कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या कमी झाली तर उद्योग, आरोग्य सेवा,तंत्रज्ञान आणि सेवा क्षेत्रात मनुष्यबळाची टंचाई निर्माण होऊ शकते. आजच अनेक युरोपीय देशांत रुग्णालये, वृद्धाश्रम आणि देखभाल केंद्रांमध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता जाणवत आहे. दुसरीकडे ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढल्याने पेन्शन आणि आरोग्य सेवांवरील खर्च झपाट्याने वाढणार आहे. सामाजिक सुरक्षा व्यवस्थेवर येणारा हा प्रचंड ताण भविष्यात कर वाढ, निवृत्ती वयोमर्यादा वाढविणे किंवा कल्याणकारी योजनांमध्ये कपात अशा कठोर निर्णयांना जन्म देऊ शकतो. या पार्श्वभूमीवर स्थलांतर हा युरोपसमोरील महत्त्वाचा पर्याय बनला आहे.बाहेरून येणारे स्थलांतरित कामगार उद्योग आणि सेवा क्षेत्रातील रिक्तता भरून काढतात.काही प्रमाणात ते जन्मदर वाढविण्यासही हातभार लावतात. मात्र स्थलांतराचा प्रश्न युरोपमध्ये केवळ आर्थिक नाही,तर सांस्कृतिक आणि राजकीय वादाचाही विषय बनला आहे. स्थलांतरितांमुळे स्थानिक ओळख, रोजगार आणि सुरक्षेवर परिणाम होईल,अशी भावना अनेक देशांत वाढत आहे. त्यामुळे स्थलांतर धोरण अधिक कडक करण्याची मागणी जोर धरत आहे. जर्मनीमध्ये याचे स्पष्ट चित्र दिसते. एकीकडे उद्योगांना कामगारांची गरज आहे, तर दुसरीकडे स्थलांतराविरोधातील जनमतही वाढत आहे. चान्सलर फ्रेंडरिच मर्ज यांनी सीरियन निर्वासितांच्या पुनर्वसनाबाबत घेतलेली भूमिका या द्वंदचे प्रतीक मानली जाते. युरोपची लोकसंख्या कमी होत असताना आफ्रिका आणि आशियातील अनेक देशांत तरुण लोकसंख्या वेगाने वाढत आहे. भविष्यात उत्पादन, ग्राहक बाजारपेठ, नवोन्मेष आणि मनुष्यबळ यांचे केंद्र या प्रदेशांकडे झुकू शकते. म्हणजेच आर्थिक आणि राजनैतिक प्रभावाचे केंद्र पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकण्याची प्रक्रिया आणखी वेगाने घडू शकते. तथापि, कमी लोकसंख्या हा पूर्णपणे नकारात्मक बदल आहे,असेही नाही.कमी लोकसंख्येमुळे पर्यावरणावरील ताण कमी होऊ शकतो, कुटुंबव्यवस्थेला अनुकूल वातावरण, महिलांसाठी अधिक लवचिक कामकाज पद्धती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित तंत्रज्ञानाचा वापर, तसेच वृद्धांसाठी सक्षम आरोग्य व्यवस्था उभारणे ही युरोपसमोरील भविष्यातील प्रमुख आव्हाने असतील.

# जागतिक अनिश्चिततेच्या वातावरणात आर्थिक शिस्तीचे मोल

## अनावश्यक खर्च टाळण्याचे पंतप्रधानांचे आवाहन; जनतेतून संमिश्र प्रतिसाद




**“आज जग एका नव्या आर्थिक आणि भूराजकीय वळणावर उभे आहे. अमेरिका-इराण, इस्त्रायल-हमास, पाकिस्तान-अफगाणिस्तान, रशिया-युक्रेन यांच्यात युद्धाची धग अद्यापही चालूच आहे. छोट्याशा ठिणगीतून तिसऱ्या महायुद्धाला कधीही आरंभ होऊ शकतो इतकी अनिश्चितता आहे. गेल्या काही दशकात जागतीकीकरण, मुक्त व्यापार, तंत्रज्ञान आणि वेगवान अर्थवाढ यांच्या जोरावर जगाने अभूतपूर्व प्रगती अनुभवली आहे परंतु या प्रगतीसह एक मोठे वास्तवही समोर आले आहे ते म्हणजे जगातील प्रत्येक देश आता परस्परांशी इतका जोडला गेला आहे की एखाद्या प्रदेशात निर्माण झालेले संकट सहस्त्र किलोमीटर दूर असलेल्या सामान्य नागरिकाच्या आयुष्यालाही हादरा देऊ शकते मग ते युद्ध असो अथवा एखादी महामारी.”**

अमेरिका-इराण यांच्यातील तणावामुळे होर्मुझ सामुद्रधुनीवर निर्माण झालेले संकट आणि जागतिक तेल बाजारातील अस्थिरता याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. मुत्सद्देगिरीच्या जोरावर थोडीफार इंधनाची आयात चालू असली तरी ती कधीही थांबू शकते आणि त्याचा थेट परिणाम भारतीयांच्या दैनंदिन जीवनावर होऊ शकतो. हे जाणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचत,एक वर्षासाठी सोन्याची खरेदी न करणे, रासायनिक खतांचा वापर कमी करणे, विदेशगमन न करणे आणि वर्क फ्रॉम होम ही पद्धत पुन्हा एकदा स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. हे आवाहन वरकरणी साधे वाटू शकते पण प्रत्यक्षात एका मोठ्या आर्थिक संघर्षाची पूर्व सिद्धता आहे.


पेट्रोल आणि डिझेल यांचा वार्षिक खर्च १३ लाख ३० हजार कोटी रुपये, खाद्य तेल वापराचा खर्च १ लाख ६५ हजार कोटी रुपये, सोने खरेदीवर ४ लाख १० हजार कोटी रुपये, रासायनिक खताचा वापर २ लाख ५० हजार कोटी रुपये, परदेशात पर्यटन आणि परदेशी वस्तूंची खरेदी यावर १ लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपये खर्च होतात. जर जनतेने पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाचे पालन केले तर भारताच्या परकीय चलनाची बचत होईल कारण या सर्व वस्तू परदेशातून आयात कराव्या लागतात. कोरोना महामारी मुळे लागू झालेल्या दळणवळण बंदीच्या काळात भारताने शिस्त आणि संयम बाळगला होता. आज पुन्हा हीच मुल्ये अंगी बाणवायला लागणार आहेत. कोरोना महामारीच्या काळात संकट जीवावर आले होते. आता आजचे संकट खिशावर आले आहे.

गेल्या दोन-तीन दशकात भारतात उपभोगवाद वाढला आहे. आवश्यकता आणि चैन यामधील सीमारेषा आपण ओळखू शकतो का?, भारतातील मध्यमवर्ग गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात कर्जाधारित जीवनशैलीकडे वळला आहे. घरकर्ज, वाहनकर्ज, वैयक्तीक कर्ज आणि क्रेडिट कार्ड संस्कृती यामुळे लोकांचे उत्पन्न आणि खर्च यामधील समतोल बिघडत चालला आहे. अशावेळी इंधनदर आणि महागाई वाढली तर सामान्य नागरिकांवर प्रचंड आर्थिक ताण येऊ शकतो. याच कारणामुळे सरकार नागरिकांना आधीच सावध करत आहे. इंधन बचत म्हणजे केवळ पैसा वाचवणे नाही तर राष्ट्रीय आर्थिक स्थैर्य जपणे आहे. सोन्याची खरेदी टाळणे म्हणजे केवळ व्यक्तिगत त्याग नाही तर परकीय चलन साठा वाचवण्याचा प्रयत्न आहे. वर्क फ्रॉम होम स्वीकारणे म्हणजे केवळ सोय नाही तर राष्ट्रीय ऊर्जाचा वापर कमी करण्याचा मार्ग आहे. महागाई वाढली की तिचा सर्वाधिक फटका गरीब आणि मध्यमवर्गीय यांना बसतो. श्रीमंत वर्ग काही प्रमाणात वाढते खर्च सहन करू शकतो त्यामुळे काटकसरीचा हा मंत्र सामान्याच्या घराप्रमाणे श्रीमंत वर्ग तसेच लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणा,सरकारी कार्यालय अशा सर्व ठिकाणी लागू झाला पाहिजे. राष्ट्रीय शिस्त ही सर्वांसाठी समान असली पाहिजे.

भारतीय समाजाचे एक मोठे बळ, म्हणजे संकटसमयी एकत्र येण्याची क्षमता. युद्धकाळ, नैसर्गिक आपत्ती, महामारी किंवा आर्थिक संकट प्रत्येकवेळी समाजाने संयम दाखवला आहे. पंतप्रधानांचे आवाहन काहींना कठोर वाटेल, काहींना अति सावध वाटेल पण त्यामागील वास्तव नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीत प्रत्येकाने मी देशाची ऊर्जा आणि आर्थिक सुरक्षा त्यांच्यासाठी काय योगदान देऊ शकतो? कदाचित उत्तर मोठे नसेल वाचवलेला एखादा प्रवास किंवा टाळलेला अनावश्यक खर्च एवढेच त्याचे उत्तर असेल पण या संकटात तेवढ्यानेही देशाला आधार मिळू शकतो. अनिश्चिततेच्या जागतिक वातावरणात शिस्त सर्वात मोठी शक्ती ठरणार आहे. आजची आर्थिक शिस्त आणि संयमी जीवनशैली भविष्यातील महागाई आणि आर्थिक संकट यावर प्रभावी उत्तर आहे.

▮ लीना गाडगीळ

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार, ता.१५.५.२०२६,**विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभवनाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो, वैशाख मासे, कृष्ण पक्षे, त्रयोदशी तिथी,०८.३२ नंतर चतुर्दशी तिथी, २९.१२ पर्यंत अश्विनी नक्षत्र,२०.१६ नंतर भरणी नक्षत्र, मेषरास आयुष्मान योग, १४.२२ नंतर सौभाग्य योग, वणिज करण, ०८.३२ नंतर, विष्ठी करण १८.५६ नंतर, शकुनी करण २९.१२ पर्यंत, दिनमान १२.४६, सुर्योदय, ०६.०६, सुर्यास्त १८.५२ (कोल्हापूरचे), राहूकाळ सकाळी १०.३० ते १२ शिवरात्री,चतुर्दशीचा क्षय, रवि वृषभ राशीत ०६.२३ वाजता,भद्रा ०८.३२ ते १८.५६ अगस्ती लोप, क्षयतिथी.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष-** आज तुमच्या कष्टाचे चीज होईल.आज तुम्ही सर्व नातेवाईकांपासून दूर होऊन आपल्या दिवसाला अशा जागेत घालवणे पसंत कराल जिथे जाऊन तुम्हाला मनशांती प्राप्त होईल.

**वृषभ-** आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. आर्थिक व्यवहार आणि वायदे अतिशय काळजीपूर्वक सांभाळा. आजच्या दिवशी चुकूनही कुणाला पैसे उधार देऊ नका.

**मिथून-** आज तुम्हाला ते ऐकू येईल,ज्याने तुम्ही बाकी सगळं विसरून जाणार आहात. कामाच्या ठिकाणी सगळं आलबेल आहे. तुमचा मूड दिवसभर चांगला राहील.

**कर्क-** आज तुम्ही एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे.

**सिंह -** स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस.आजचा दिवस जगण्याचा या भावनेने मनोरंजनावर पैसा आणि वेळ खर्च करण्यावर नियंत्रण ठेवा.

**कन्या-** आपल्या पालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची आणि काळजी घेण्याची गरज भासेल. आजचा दिवस उत्तम असेल.

**तुळ-**तुमचा विश्वास वाढत आहे आणि प्रगती होणे अपरिहार्य ठरेल.प्रकृतीची काळजी घ्या.सर्दीचा त्रास जाणवेल.भावनिक वादळे निर्माण होतील.

**वृश्चिक-** आयुष्यातील उच्च दर्जाची महानता अनुभवण्यासाठी तुमचे आयुष्य उदात्त बनवा.चिंता करणे विसरून जाणे हे त्यादृष्टीने टाकलेले पहिले पाऊल असेल.

**धनु-**आज तुम्हाला पैश्याची किंमत समजू शकते कारण,आज तुम्हाला पैश्याची अत्यंत आवश्यकता असेल परंतु तुमच्याकडे पर्याप्त धन नसेल.

**मकर-** आज तुमच्या कामाची स्तुती होईल. आज तुम्ही सर्व कामांना सोडून त्या कामाला पसंत कराल ज्याला तुम्ही बालपणात करणे पसंत करत होते.

**कुंभ-**आज काम लवकर पूर्ण करून घरी जाणे आज तुमच्यासाठी उत्तम राहील यामुळे तुमच्या कुटुंबातील लोकांना ही आनंद मिळेल आणि तुम्हाला ताजेतवाने वाटेल.

**मीन-** दूरवर राहणारे नातेवाईक आज तुमच्याशी संपर्क साधतील. नवीन ग्राहकांशी वाटाघाटी करण्यासाठी उत्तम दिवस आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### खासदार, आमदार यांची पेन्शन बंद करा

गेल्या आठवड्यात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, सोने खरेदी कमी करा, परदेश दौरे टाळा तसेच शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर कमी करावा, असे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर केवळ पाच वर्षे खासदार किंवा आमदार राहिल्यानंतर त्यांना दिली जाणारी पेन्शन बंद करण्यात यावी. त्याचबरोबर इंधन, प्रवास व इतर विविध भत्ते देखील कमी अथवा बंद करावेत.जर याबाबी मोदीजींनी त्वरित अंमलात आणल्या, तर देशाचे अब्जावधी रुपये वाचू शकतात आणि भारतीय अर्थव्यवस्था अधिक मजबूत होण्यास मोठे योगदान मिळू शकते.

इराणमधील युद्धाला अनेक महिने उलटले असून त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. भारतही त्यातून पूर्णपणे अलिप्त राहू शकणार नाही. अशा परिस्थितीत केवळ जनतेलाच परकीय चलन वाचवण्याचे आवाहन न करता, त्याची सुरुवात केंद्र व राज्यातील मंत्री, आमदार आणि खासदार यांनी स्वतःपासून करायला हवी. त्यांनी मिळणारी पेन्शन, इंधन व इतर भत्ते स्वेच्छेने नाकारून देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावण्याचा आदर्श निर्माण करावा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी स्पष्ट आवाहन करणे आवश्यक आहे. तसेच, या आवाहनाला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यास संसदेत त्वरित कायदा करून या सुविधांमध्ये कपात करावी. देशाची अर्थव्यवस्था भक्कम करण्यासाठी प्रत्येक स्तरावर काटकसरीची सुरुवात होणे गरजेचे आहे.

■ शशिकांत गायकवाड, सांगली

### मेहनतीवर पाणी, व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

'नीट'सारख्या महत्त्वाच्या परीक्षेसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पेपरफुटीच्या बातमीने मानसिक धक्का बसला आहे. १८० पैकी तब्बल १४० प्रश्न फुटल्याची बाब अत्यंत गंभीर आहे. 'एनटीए'कडून पेपर सुरक्षित असल्याचे वारंवार सांगितले जात होते. मात्र प्रत्यक्षात सुरक्षेतील त्रुटी उघड झाल्या आहेत.

आता परीक्षा पुन्हा होणार असल्याने प्रवेश प्रक्रिया लांबणार, शैक्षणिक वर्ष उशिरा सुरू होणार आणि त्याचा थेट फटका विद्यार्थ्यांना बसणार आहे. परीक्षेआधी प्रशासनाकडून कडक आणि पारदर्शक व्यवस्था असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र तरीही पेपरफुटी झाल्याने 'एनटीए'च्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरवर्षी पेपरफुटी होत असेल, तर व्यवस्थेत गंभीर दोष असल्याचे स्पष्ट होते. सन २०२४ मधील 'नीट' परीक्षेवेळीही मोठा गोंधळ निर्माण झाला होता. निकाल जाहीर होताच अनेक विद्यार्थ्यांना असामान्यरित्या अधिक गुण मिळाल्याचे समोर आले होते. काही विद्यार्थ्यांना वाढीव गुण (ग्रेस मार्क्स) देण्यात आल्याचा आरोपही झाला होता. दरवर्षी सुमारे वीस लाख विद्यार्थी 'नीट' परीक्षा देतात. वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक विद्यार्थी दोन-दोन वर्षे तयारी करतात.खासगी शिकवण्या आणि निवासी अभ्यासवर्गांसाठी पालक लाखो रुपये खर्च करतात. अशा परिस्थितीत पेपरफुटी किंवा निकालातील संशयास्पद प्रकार विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर मोठा परिणाम करतो. एनटीएने गलथान कारभार 'नीट' सुधारणे आवश्यक आहे.




■ दत्तप्रसाद शिरोडकर

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# मुरगूडात गडहिंग्लज -कागल रस्त्याचे काम संथगतीने

## ...अन्यथा ठेकेदारावर फौजदारी दाखल करण्याचा मुख्याधिकाऱ्यांचा इशारा

मुरगूड,ता.१४(प्रतिनिधी )

..................

**मुरगूडमध्ये गडहिंग्लज ते कागल मिनी हायवेच्या काँक्रीटीकरणाचे काम अत्यंत संथगतीने चालू आहे. याच्या निषेधार्थ आज मुरगूडच्या नगरसेवकांनी तीव्र संताप व्यक्त करीत निषेध केला तर हे काम करीत असताना वारंवार पाईप फोडली जात असल्याने शहरात पाणी टंचाईचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे, असे पुन्हा झाल्यास प्रसंगी ठेकेदारावर फौजदारी दाखल करू,असा इशारा यावेळी मुख्याधिकारी वाळूंज यांनी दिला तसेच या आंदोलनावेळी ठेकेदार कंपनीचे अभियंता न आल्याने संताप व्यक्त करण्यात आला.**

कामांमध्ये गती न वाढल्यास दोन दिवसात काम बंद पाडण्याचा इशाराही नगरसेवकांनी यावेळी बोलताना दिला.सध्या गडहिंग्लज ते कागल रस्त्याचे रुंदीकरणाचे काम सुरू आहे. गेल्या महिन्याभराहून अधिक काळ मुरगूडमधील या रस्त्याचे



मुरगूड येथे गडहिंग्लज ते कागल रस्ताप्रश्नी आंदोलन करताना मुरगूड नगरसेवक.

काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडत आहेत.

### कामाच्या निषेधार्थ नगरसेवकांचा तीव्र संताप

हे काम याच गतीने चालले तर शहराचा मुख्य रहदारीचा हा रस्ता असल्यामुळे आगामी पावसाळ्यामध्ये नागरिकांचे मोठे हाल होणार आहेत तसेच या रस्त्याच्या कामाच्या वेळी रस्त्यात येणाऱ्या नळ पाणी पुरवठ्याच्या पाईपलाईन गळती होण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. खुदाई केलेला मुरूम, माती व खडे पाईपलाईनमध्ये गेल्यामुळे अनेक ठिकाणी पाणीपुरवठा अनिश्चित काळासाठी थांबत आहे.यामुळे नागरिकांसाठीच्या पिण्याच्या पाण्याचा ऐन उन्हाळ्यात बोजवारा उडत आहे.पाईपलाईन दुरुस्त करण्यासाठी पालिकेच्या कर्मचारी वर्गावर कामाचा बोजा पडत आहे. नागरिकांच्या संतापाला नगरपालिका व नगरसेवकांना सामोरे जावे लागत आहे.त्यामुळे नगरसेवकांनी आज कामाच्या ठेकेदाराविरोधात हुतात्मा तुकाराम चौक येथे एकत्र येत ठेकेदार कंपनीस जाब विचारण्याचा प्रयत्न केला पण आंदोलनस्थळी ठेकेदार कंपनीचे संबंधित अधिकारी न आल्याने नगरसेवकांनी संताप व्यक्त करीत दोन दिवसात यासंदर्भात बैठक बोलावण्याचा इशारा दिला. पिण्याची पाईपलाईन फोडल्यास ठेकेदार कंपनीच्या संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा पालिका मुख्याधिकारी अतिश वाळूंज यांनी दिला . यावेळी माजी नगराध्यक्ष नामदेवराव मेडके, पालिकेचे गटनेते सुहास खराडे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.आंदोलन स्थळी उपनगराध्यक्षा रेखाताई मांगले, नगरसेवक दत्तात्रय मंडलिक, जगन्नाथ पुजारी, सुनील मंडलिक, अनिल राऊत, दीपक शिंदे, रणजीत भारमल, संभाजी आंगज, राजेंद्र कांबळे, सुनील रणवरे, राहुल शिंदे अरुण सावर्डेकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाला ठाम विरोध

## के.पी.पाटील; मुदाळात कार्यकर्त्यांची शक्तीपीठ विरोधी बैठक

मु.तिट्टा,ता.१४(प्रतिनिधी)-

..............................

**शक्तीपीठ मार्ग हा अन्न देणाऱ्या शेतीला व शेतकऱ्यांना उद्‌ध्वस्त करणारा आहे. राधानगरी तालुक्यातील १४ गावातील शेतकऱ्यांच्या पोटावर पाय देऊन शक्तीपीठ मार्ग होणार असेल तर हा अन्यायकारक मार्ग कोणत्याही परिस्थितीत होवू देणार नाही, असा इशारा बिद्री साखर कारखान्याचे अध्यक्ष व माजी आमदार के. पी. पाटील यांनी दिला.**

मुदाळ(ता.भुदरगड)येथे सरकारच्या प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते.या बैठकीला विविध संस्थांचे पदाधिकारी व मान्यवर उत्स्फूर्तपणे जमले होते. यावेळी शक्तीपीठ विरोधाचा एल्गार पुकारण्यात आला.पाटील पुढे



मुदाळ येथे बैठकीत बोलताना बिद्री साखर कारखान्याचे अध्यक्ष व माजी आमदार के. पी.पाटील समोर उपस्थित कार्यकर्ते.

म्हणाले, आमच्या अनेक पिढ्या या काळ्या आईवर जगल्या. शेतकऱ्यांचे जगण्याचे साधन असलेल्या शेतीतून गरज नसलेला रस्ता बांधून सरकार शेतकऱ्यांना देशोधडीला लावत आहे. शक्तीपीठ म्हणजे आमच्या पोटावर लाथ असून हा अन्याय खपवून घेणार नाही.स्वागत प्रा.किसन चौगले व प्रास्ताविक विश्वनाथ कुंभार यांनी केले.यावेळी उमेश भोईटे, भोगावतीचे माजी अध्यक्ष धैर्यशील पाटील कौलवकर, बिद्रीचे संचालक पंडीतराव केणे, मधुकर देसाई, राजेंद्र पाटील, फिरोजखान पाटील, राजेंद्र भाटले,फत्तेसिंग पाटील, दिपक किल्लेदार, के. ना. पाटील, एकनाथ पाटील,भिकाजीराव एकल, संजयसिंह कलिकते, जयसिंग खामकर, नाना पाटील, सुरेशराव चौगले, जयवंत पाटील, संग्राम कलिकते, सागर भावके, विश्वास पाटील, बाळासो पाटील, संतोष पाटील, सर्जेराव पाटील, बापूसो आरडे,विलास कांबळे आदी उपस्थित होते.आभार जिल्हा बँकेचे संचालक रणजितसिंह पाटील यांनी मानले.



**नभ दाटूनी आले,.......**

**मे महिना म्हटले की वळीव पावसाची हजेरी लागणार असली की ढगामध्ये काळोखा निर्माण होऊन वादळ वाऱ्यासह पावसाची हजेरी लागते.असेच दृश्य निपाणीत टिपले आहे,आमचे प्रतिनिधी विठ्ठल केसरकर यांनी.**

# बुदिहाळात सहा फुटी मगरीला पकडण्यात युवकांना यश

यमगर्णी,ता.१४(वार्ताहर)-

...........................

**बुदिहाळ येथे युवकांनी सहा फुटी मगरीला पकडण्यात यश मिळविले.येथील शेतकरी मधुकर कोले हे रात्री दहा ते दोन लाईट असल्याने रात्री दहा वाजता आपल्या ऊस पिकासाठी पाणी पाजण्यासाठी शेताकडे गेले होते.नवनाथ जाधव यांना ही मगर उसाच्या शेतामध्ये दिसली त्यांनी तात्काळ गावामध्ये संपर्क साधून मित्रांना बोलावून घेतले व युवकांनी आपले धाडस दाखवून एक तासाच्या शर्तीच्या प्रयत्नानंतर मगर पकडण्यात यश आले.**



वन अधिकाऱ्यांना संपर्क केला असता मगर आणण्यासाठी सकाळी येतो, असे सांगितले. मगर पकडण्यास किशोर नुल्ले, प्रमोद पाटील, संदीप संकपाळ, प्रदीप खेबुडे, कृष्णात देसाई, रोहित देसाई, राहुल देसाई, जीवन खोत, नितीन पंढरे, संजय पंढरे, रितेश शिरगावे, सुरज खोत यांनी परिश्रम घेतले. ही मगर शंकर शिरगावे यांच्या ट्रॅक्टरट्रॉली मध्ये घालून त्यांच्या फार्म हाऊसवर ठेवून वनखात्याकडे सुपूर्द केली.मगर यमगर्णी येथील ओढ्यातून आली असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी रात्रीचे पाणी पाजताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भोज प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांची वानवा

## सुविधा देण्याची ग्रामस्थांची तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडे मागणी

कारदगा,ता.१४(प्रतिनिधी)

........................

**भोज येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सेवा उपलब्ध नाही त्यामुळे रुग्ण व ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत आहे.या उपकेंद्रात सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामस्थांनी तालुका वैद्यकीय अधिकारी यांना निवेदन दिले.**

साडे चौदा हजार लोकसंख्या असलेले भोज गाव असून या गावाला सरकारी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे पण या उपकेंद्रामध्ये गेल्या अनेक महिन्यापासून कुठलेही वैद्यकीय अधिकारी कार्यरत नसून व कुठलेही औषध उपलब्ध नसल्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याकरिता वारंवार चिकोडी आरोग्य अधिकारी



तालुका वैद्यकीय अधिकारी यांना निवेदन देताना भोज ग्रामस्थ.

यांना पत्रव्यवहारद्वारे निदर्शनास आणून देखील कोणतीही कृती होत नसल्याने तालुका पंचायत सदस्य प्रकाश वडर, माजी ग्रामपंचायत सदस्य सचिन मोहिते, डॉ.बापूसाहेब हंपन्नावर, कुमार नाईक, राजू बुर्जी, विपुल ढेरे आरिफ मकानदार,रावसाहेब संकपाळ, कुशाल खोत, राजू मुगळे यांच्यासह ग्रामस्थांनी तालुका वैद्य अधिकारी चिकोडी यांना लवकरात लवकर भोज आरोग्य उपकेंद्रामध्ये वैद्याधिकारी नेमून औषधे उपलब्ध करावे म्हणून निवेदन दिले. यावेळी तालुका अधिकाऱ्यांनी आश्वासन देत दोनच दिवसात भोज प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला वैद्याधिकाऱ्यांची नेमणूक करून औषधे उपलब्ध करण्याची ग्वाही दिली.

# शनैश्वर अमावस्येनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

निपाणी,ता.१४(प्रतिनिधी)-

..............................

**निपाणी पंचक्रोशीत एकमेव असलेल्या शहराबाहेरील आदर्शनगर येथील शनी मंदिरात शनैश्वरी अमावस्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.ता.१६ रोजी स. ९ ते १२ यावेळेत श्रीमूर्तीस महाअभिषेक व पूजा होणार असून दु. १२ वा. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.**

तरी ज्या भाविकांना महाप्रसादासाठी शिधा व रोख स्वरूपात रक्कम द्यावयाची आहे. अशा भाविकांनी मंदिर कमिटीशी संपर्क साधून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराच्या विश्वस्त प्रमिला रुडगी यांनी केले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा ९७.६१ टक्के निकाल

पट्टणकोडोली,ता.१४(प्रतिनिधी)

..................................

**येथील श्री बिरदेव एज्युकेशन सोसायटी संचलित, न्यू इंग्लिश स्कूल (न्यू राजापूर) पट्टणकोडोली या शाळेने एसएससी बोर्ड परिक्षेत उज्ज्वल यश संपादन केले. या शाळेचा ९७.६१ टक्के निकाल लागला.**

सेमी माध्यमातून आसनिया अझरुद्दीन हेरवाडे हिने ९५.४० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम व केंद्रात द्वितीय क्रमांक पटकाविला. हर्षदा राजेंद्र भातमारे हिने ९४.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविला तर शिवांजली सचिन ऐतवडे हिने ९४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.मराठी माध्यमातून अलोक अतिक्रांत गाट याने ८८.२०टक्के गुण मिळवून प्रथम, समता कुंडलिक दीक्षित हिने ८६ टक्के गुण मिळवून द्वितीय तर स्नेहल संदीप तोडकर हिने ८५.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.या परिक्षेसाठी ८२ विद्यार्थी बसले होते तर दोन विद्यार्थी परिक्षेला बसले नाहीत. विशेष गुणवत्ता यादीमध्ये ५१, प्रथम श्रेणीमध्ये २१ तर पास श्रेणीमध्ये १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष शिरीष देसाई, संचालक मंडळ, मुख्याध्यापक टी.एच.आकुर्डे, एम.एस.पाटील यांच्यासह सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे पट्टणकोडोली पंचक्रोशीतून अभिनंदन होत आहे.



शाहू वाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांकडे ग्रंथ भेट देताना प्रफुल्ल वानखेडे,शेजारी इतर प्रमुख मान्यवर.

# शाहू वाचनालयास प्रफुल्ल वानखेडे यांच्याकडून ग्रंथ भेट

गारगोटी,ता.१४(प्रतिनिधी)-

.................................

**येथील शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी शाहू वाचनालयास देशातील अग्रगण्य उद्योजक आणि ख्यातनाम लेखक प्रफुल्ल वानखेडे यांचेकडून शंभर मौल्यवान ग्रंथांची भेट देण्यात आली.**

अक्षर सागरच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे ग्रंथ शाहू वाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले.याप्रसंगी डॉ.अर्जुन कुंभार यांनी प्रास्ताविक केले तर अध्यक्ष डी.व्ही. कुंभार,जॉईंट कमिशनर कुलदीप राजे,कार्यवाह टी.बी.पाटील यांनी मनोगते व्यक्त केली.वाचनालयाचे कार्यवाह टी.बी. पाटील यांनी या प्रकारची ग्रंथांची भेट ही वाचनालयाच्या इतिहासात नोंद होईल, अशा भावना व्यक्त केल्या.यावेळी उपाध्यक्ष राणी हुजरे, माजी अध्यक्ष डॉ. मा.ग.गुरव,सचिव बा.स.जठार, ग्रंथपाल प्रवीण गुरव इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# लक्ष्मीदेवीची यात्रा उत्साहात

बेडकिहाळ,ता.१४(वार्ताहर)-

...............................

येथील सांगाणे मळा परिसरातील,समस्त भाविकांच्या वतीने लक्ष्मी यात्रा साजरी झाली.सकाळी श्री लक्ष्मी मूर्तीस भाविकांच्या वतीने अभिषेक पूजा आदी कार्यक्रम करण्यात आले. यावेळी शिवानंद स्वामी यांनी मंत्र पठण व पौरोहित्य केले.परिसरातील महिलांच्यावतीने देवीची ओटी भरणी करण्यात आली. या निमित्त महाप्रसादाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला. रात्री श्री हरी सेवा भजनी मंडळाच्यावतीने भजन भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम झाला.

# प्रत्येकाने योगाच्या पद्धतींचे पालन करणे आवश्यक

## संपादना स्वामी

चिकोडी,ता.१४(प्रतिनिधी)-

.................................

**योग साधना ही आरोग्य आणि रोग निवारणासाठी उपयुक्त एक प्राचीन वैद्यकीय प्रणाली आहे आणि प्रत्येकाने योगाच्या पद्धतींचे पालन करणे आवश्यक आहे, असे चिकोडी येथील प.पू.श्री चरमूर्ती मठचे श्री संपादना स्वामीजी सांगितले.**

शहरातील केएलई आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारात, भारत सरकारच्या आयुष मंत्रालय, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेच्या प्रायोजक्ताने आयोजित केलेल्या '१२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६' च्या पार्श्वभूमीवर 'योग महोत्सव २०२६' नावाच्या एका विशेष ३९ व्या दिवसाच्या (१०० दिवसांच्या)



चिकोडी: योग प्रात्यक्षिके व सराव करताना विद्यार्थी व नागरिक.

जनजागृती कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

स्वामीजी पुढे म्हणाले, शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य टिकवण्यासाठी योगाला दैनंदिन जीवनाचा एक भाग बनवण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, राज्य सहकारी महामंडळ बंगळूरचे उपाध्यक्ष जगदीश कवटगीमठ म्हणाले, दररोज योगाभ्यास केल्याने वैयक्तिक आणि सामाजिक परिवर्तन घडून येऊ शकते. समाजात योगाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि तरुण पिढीला निरोगी जीवनशैलीकडे प्रेरित करण्यासाठी केएलई आयुर्वेद महाविद्यालयाने केलेल्या कार्याचीही त्यांनी प्रशंसा केली.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविलेले आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरणकुमार मुतनाळी म्हणाले, जगातील १९५ देशांपैकी १७० देशांनी योगाचा स्वीकार केला आहे. योग ही एक प्राचीन भारतीय पद्धत आहे, जी शरीर, मन आणि श्वास यांचा समतोल साधते. आज जगभरात निरोगी जीवनशैलीचा तो एक भाग बनला आहे. महाविद्यालयाच्या आरोग्य आणि योग विभागाचे प्रमुख डॉ. संतोष शिवणवर यांनी या कार्यक्रमाचे यशस्वीपणे समन्वयन केले.निंगप्पा पुजारी यांनी सूत्रसंचालन केले.प्रास्ताविक भाषण डॉ. सुधींद्र होनवाड यांनी दिले. स्वागतपर भाषण डॉ. रवी मडीवाळर यांनी केले.

यावेळी चिकोडी केएलई संलग्न संस्थांचे प्राचार्य, विद्यार्थी, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राध्यापक, डॉक्टर आणि १५०० हून अधिक विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले होते. या प्रसंगी एका विशेष योग प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचा सराव केला.

# साके येथे छ.संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

साके,ता.१४(वार्ताहर)

........................

**कागल तालुक्यातील साके येथे स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. गावातील विविध तरुण मंडळे आणि शिव-शंभू प्रेमींच्या वतीने आयोजित या सोहळ्याने संपूर्ण गाव भगवेमय झाले होते.**

स्टॅन्ड सर्कल साके (ता.कागल) मुख्य चौकात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष सनी पवार,उपाध्यक्ष निलेश पाटील, सचिव मयूरेश चौगले, खजानिस दिग्विजय पाटील यांच्या हस्ते गावातील ज्येष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. यावेळी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण करण्यात आले.''सायंकाळी गावातून छत्रपती संभाजी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि ''शंभूराजांच्या'' जयघोषाने गाव दुमदुमून गेले होते.मिरवणुकीमध्ये लहान मुलांपासून थोरांपर्यंत अनेकजण सहभागी झाले होते. यावेळी तानाजी पाटील,विशाल चौगले, सुनील कुंभार,धनाजी शेंडे,स्वप्निल चौगले,यश पाटील,यश चौगले, आदर्श चौगले,विराज पाटील,ऋग्वेद पाटील,प्रथमेश पाटील,चेतन पवार,संदेश चौगले,प्रणव चौगले,कुमार मातुगडे,परसू वाईंगडे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# खाजगी शिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांची आर्थिक लूट

## वाढीव फी घेणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याची मागणी

ढोणेवाडी,ता.१४(प्रशांत कांबळे)

..................................

**शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला असून विविध पातळीवरील शिक्षणासाठी प्रवेश विद्यार्थी सह पालकांची एकच धावपळ उडाली आहे .प्रवेश शुल्क व इतर अवाढव्य फी खासगी शिक्षण संस्थांनी वाढवून गोरगरीब कुटुंबे, अल्प भू धारक शेतकरी, मोलमजुरी दार ,दीनदलित कामगार यांच्या मुलांच्या शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला जात आहे .**

अनेक प्रकारचा प्रवेश शुल्क लावून



विद्यार्थ्यांची आर्थिक लूट केली जात आहे. त्यामुळे पालक वर्गामधून संताप व्यक्त होत आहे.याबाबत शिक्षण खाते व राज्य सरकारने याकडे लक्ष देवून वाढीव फी घेणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. शैक्षणिक वर्षाला प्रारंभ झाला असून दहावी बारावीसह इतर कोर्सचा निकाल लागला असल्याने अनेक विद्यार्थी पदवी पूर्व व पदवीधर , उच्च पदवी, व्यावसायिक कोर्स,प्रवेशासाठी शहरी व ग्रामीण भागातील खासगी शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी धावपळ करीत आहेत. सर्वच खासगी शिक्षण संस्था चालकांकडून दर्जेदार शिक्षण देण्याच्या नावाखाली डोनेशन व प्रवेश शुल्क भरमसाठ वाढवून शिक्षणाचे बाजारीकरण करून शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला जात आहे. एलकेजीपासून, प्राथमिक, माध्यमिक शिक्षणही महाग करुन सर्वसामान्य पालकांना वेठीस धरले जात आहे. अकरावीचा खर्च प्रति वर्ष ५० हजार ते एक लाखापर्यंत तर इतर शिक्षणासाठीही लाखो रुपये घेतल्याने गोरगरीब कुटुंबांना आपल्या पाल्यांना शिक्षण देण्यासाठी आता तारेवरची कसरत करावी लागत आहे. डोनेशनचा आकडा वाढत असल्याने गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून पालकांना बचत गट ,पतसंस्था, मायक्रो फायनान्स, बँक व इतर ठिकाणी रक्कम काढून फीचा भरणा भरावा लागत आहे.

'काही संस्थाचालकांचा व्यावसायिक दृष्टिकोन शैक्षणिक गुणवत्तेपेक्षा नफ्याला अधिक महत्त्व देत असल्याने मूळ नैतिक मूल्ये धोक्यात आली आहेत. शिक्षणाचे हे बाजारीकरण थांबवण्यासाठी धोरणात्मक कठोरता आणि पारदर्शकता आणणे आता अनिवार्य झाले आहे.'

**डॉ.कपिल राजहंस,इतिहास अभ्यासक**

### राजकीय पुढाऱ्यांच्या हातात शिक्षण संस्था...

विद्यार्थ्यांना विविध टप्प्यावर शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था आहेत.त्या मधील बहुतांश शिक्षण संस्था या राजकीय पुढारी, उद्योगपती यांच्याच हातात असून त्यांना मनमानी फी व डोनेशन आकारुन आर्थिक फायदा उचलला जात आहे. राजकिय पाठबळ व सरकारचा अंकुश नसल्याने संस्था चालक फीच्या नावाखाली पालकांच्या पैश्याची उधळपट्टी केली जात आहे. बहुतांश शिक्षण संस्था राजकीय नेतेमंडळी यांच्या असल्याने फी व डोनेशनला कोणतेच निर्बंध नसल्याने लाखो रुपये विद्यार्थीकडून उकळले जात आहे. शिक्षण घेण्यासाठी पालक मुकाट्याने मुलांच्या भविष्यासाठी शिक्षण सम्राटांचा आर्थिक जाच सहन करीत आहेत.त्यामुळे फी वाढीवर शासनाने निर्बंध घालणे गरजेचे आहे.

शिक्षण संस्था चालकांनी भरमसाठ फी व डोनेशन वाढवल्यामुळे गोरगरीबांचे शिक्षण महाग होत असून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापर्यंत आर्थिक तजवीज करताना नाकीनऊ येत आहे.विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न करता घेतली जाणारी भरमसाठ रक्कम शिक्षणाचे बाजारीकरण करणारी आहे.यावर शासनाचे निर्बंध असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी ज्ञान देवून कौशल्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. पाच लाखपर्यंत खर्च विविध कोर्सेसचा आहे. पदवी घेवून ही नोकरीची हमी नाही. सरकारनेही शासकीय फी वाढवली आहे.सीईटीतून जागा मिळालेल्या विद्यार्थ्यांनाही डोनेशन व फीच्या आहारी जावावे लागत आहे.शासनाने फी व डोनेशन कमी करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**शितल बागे,कार्याध्यक्ष,जयकिसान शेतकरी संघटना भोज.**

# धान्य दुकानदारांच्या मागण्यांबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन

**इचलकरंजी ता.१४**

**धान्य वाटपचे मार्जीन मनी जानेवारी २०२६ पासून ते मार्च २०२६ पर्यंतचे लवकर मिळावे, एप्रिल ते जून एकत्रीत धान्य वाटप करण्यास सांगितले आहे. एप्रिलची धान्य वाटप मुदतवाढ ३१ मे पर्यंत वाढवून मिळावी यासह इतर मागण्यांचे निवेदन कोल्हापूर जिल्हा रास्त भाव दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघाच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. रवींद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा सहाय्यक पुरवठा अधिकारी लक्ष्मण माने यांची भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनात, सर्वर डाऊनमुळे पॉस मशीनच्या होत असलेल्या तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, लॉगिनमधून शुभ्र व उर्वरीत केशरी कार्ड धारकांचे ऑनलाईन रेशनकार्ड नंबर काढण्यासाठी रेशन दुकानदारांना लॉगिन मिळावे अशा मागण्या करण्यात आल्या.

शिष्टमंडळात शहराध्यक्ष राजेश मंडलिक, गजानन हवालदार, अरुण शिंदे, रोहित सावेकर, श्रीमय शेटे, बुरहान नायकवडी, संजय चौगुले, रवी पाटील, शेवडे, नितीन हुंडेकरी, राहुल शिराळे तसेच शहरातील इतर दुकानदारांचा समावेश होता.




**जिल्हा सहाय्यक पुरवठा अधिकारी लक्ष्मण माने यांना निवेदन देताना संघटनेचे डॉ. रवींद्र मोरे, राजेश मंडलिक, गजानन हवालदार व इतर.**

## जाहीर नोटीस

**मिळकतीचे वर्णन** –ता. शिरोळ पैकी मौजे शिवनाकवाडी येथील क.ग.नं. ४३०/१/१ अ. पैकी क्षेत्र हे.४–१८ आर, आकार रु.१५–०८ पैसे यापैकी क्षेत्र ०–२ आर ची खुली प्लॉट मिळकत सर्व. यांसी चतुः सिमा – पूर्वेस– रस्ता, पश्चिमेस– सतीश ठिगळे यांची मिळकत, दक्षिणेस – श्री. खोत यांची मिळकत, उत्तरेस – रस्ता. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही १. ओमाजी यल्लाप्पा कांबळे, २. काशीनाथ यल्लाप्पा कांबळे,३. महावीर गोपाळ कांबळे, ४. सतीश गोपाळ कांबळे,५.विलास गोपाळ कांबळे रा. इचलकरंजी, यांची असून त्यांनी ती आमचे अशीलांचे लाभात संचकार स्विकारून संचकारपत्र करून दिलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कोणतीही तक्रार अगर हरकत असलेस सात (७) दिवसात खाली दिले पत्त्यावर लेखी तक्रार नोंदवावी म्हणून दिली जाहिर नोटीस ता. १३/०५/२०२६.

**ॲड. सुनिल द.भोसले,**

**नोटरी भारत सरकार, राजाराम स्टेडियम गाळा नं. २६. इचलकरंजी.**
**मो. ९८६०८०७४८०**

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नं. ७३२ पैकी प्लॉट नं. १२ चे क्षेत्र – ९२–२८ चौ. मी खुली जागा मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – गट नं. ७३१ ची मिळकत, पश्चिमेस – प्लॉट नं. १३ ची मिळकत, दक्षिणेस –१५ फुट रस्ता, उत्तरेस – खोत यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही वसंत शंकर लोहार रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस

सही ता. १४/०५/२०२६

**ॲड.अर्जुन माने**

गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफिस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी.
मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

सर्वांचे माहीती करीता या नोटीसीने कळविण्यात येते की मौजे खोतवाडी येथील क.ग. नंबर ९० पैकी भुखंड क्र.२२ क्षेत्र ९५.० चौरस मीटर चे सातबारा प्रमाणे क्षेत्र हे. ०.००९५ आर. म्हणजेच १०२५.० चौरस फुटची खुली मिळकत यात असले आर. सी. सी. क्षेत्र ७८.२१ चौरस मीटर ची घर मिळकत,याचा ग्रामपंचायत मिळकत नंबर २०७५ असा नमुद आहे. यांसी चतुःसिमा पुर्वेस– भुखंड कमांक २३ ची मिळकत, पश्चिमेस– भुखंड क्र. २१ ची मिळकत, दक्षिणेस – भुखंड कमांक ५९ ची मिळकत, उत्तरेस– २० फुट रूंदीचा रस्ता, सदरची मिळकत सुरेश बाबु गस्ते,रा.इचलकरंजी, यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची असुन ती त्यांनी आमचे स्नेही यांचेकडून संचकार रक्कम स्विकारून खरेदीचे करारपत्राने खरेदी देण्याचे कबुल केले आहे सदर मिळकत ही पूर्णतः निर्वेध व निष्कर्जी आहे. सबब वर नमुद केलेल्या मिळकतीवर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क दावा हितसंबंध, बोजा,लागलिगाड असलेस संबंधितांनी आजपासून ७ सात दिवसाचे आत आमची योग्यत्या लेखी कागदोपत्रानिशी समक्ष खात्री करून घ्यावी, अन्यथा मुदतीनंतर माझे स्नेही सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी समजून व्यवहार पुरा करतील व तद्नंतर कोणाच्याही कसल्याही प्रकारच्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.म्हणून दिली जाहीर नोटीस दिनांक १२–५–२०२६

**प्र. कृ. देशपांडे**

स्टॅम्प व्हेंडर, ४/४१, इचलकरंजी.
९८२२८०१११३

## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

१. मिळकतीचे वर्णन– मौ.तारदाळ येथील ग.नं. २५० अ, गट नंबर २५० ब व ग.नं. ३८८ पैकी बेकायदेशीररित्या ७/१२ पत्रकी क्षेत्राची नोंद करुन तसेच ग.नं.३९० पैकी क्षेत्राबाबत सामाईक क्षेत्रासह.

वास्तविक वर नमूद गट नंबर २५० अ व २५० ब च्या मिळकतीमधून आमचे अशिलांची मिळकत ग.नं.३८७ याचे पूर्व दिशेला पूर्व पश्चिम व दक्षिण उत्तर चालीचा आमचे अशिलांचे मालकीचा ग.नं.२४८, २५१ ब व २५१ अ करिता अखंडपणे वाडवडिलार्जित काळापासून पूर्वापार भाऊहिस्सेचा रस्ता अस्तित्वात आहे. असे असतांना सदर मिळकतीपैकी ग.नं. २५० अ व २५० ब पैकीचे मालक श्री. मारुती रामा खोत, महादेव रामा खोत व बाळू रामा खोत सर्व रा. तारदाळ,हे सदरची मिळकत त्रयस्थ इसमास विक्री, कर्जबोजा करत असलेचे आमचे अशिलांस खात्रीशीर रित्या समजून आले आहे.

तसेच ग.नं. ३८८ मधील विहिरीतील आमचे अशिलांचा ८ आणे पैकी ३/४ हिस्सा समाईकात असतांना व गट नंबर ३९० पैकी आमचे अशिलांचा समाईक हक्क असतांना वर नमूद ग.न. २५० अ व २५० ब पैकीचे मालक मारुती रामा खोत, महादेव रामा खोत व बाळू रामा खोत हे सदरचे आमचे अशिलांचा मालकी कब्जा वहिवाटीचा हक्क व हिस्सा डावलून आमचे अशिलांचे अपरोक्ष कोणत्याही सहीसंमतीशिवाय परस्पर ग.नंबर मधील मिळकतीबाबत खरेदी विक्री, कर्ज बोजा करणेचे प्रयत्नात आहेत.

तरी वर नमूद मिळकतीबाबत आमचे अशिलांचे पूर्वपरवानगीशिवाय कोणीही,कोणताही व्यवहार करारमदार, खरेदी विक्री, तारण गहाण खत व अनुषंगि व्यवहार करु नयेत अगर व्यवहार केलेस तो आमचे अशिलांचेवर व मिळकतीमधील अशिलांचे हक्कावर बंधनकारक रहाणार नाही.उलट ज्याचे लाभात तसे व्यवहार होतील त्याना निर्वेध, निष्कर्जी मालकी हक्क प्राप्त होणार नाही उलट त्यांना वेगवेगळ्या दाव्याना तोंड द्यावे लागेल. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून दिली जाहीर इशारा नोटीस.दि.१४/०५/२०२६

**ॲड. दिपक मारुती कदम,**

**वेताळपेठ, तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**
**मो. नंबर ९९२२५८५२८८.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनिय, १९६६ मंजुर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील (UDCPR) नागपूर व पुणे शहरातील मेट्रो प्रकल्पांबाबतच्या TOD संबंधित काही तरतुदींमध्ये सुधारणा करणेसंदर्भात कलम ३७ (१कक) (क) अन्वये सूचना**

## * सूचना *

### महाराष्ट्र शासन
### नगर विकास विभाग,

**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुबई– ४०० ०३२.**

**दिनांक : १६.०४.२०२६**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६

क्र.टिपीएस–१८२४/३५५/प्र.क्र.१५७/२०२५/TOD/नवि–१३:– ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्य काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक क्षेत्राकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (''यापुढे जिचा उल्लेख ''उक्त UDCPR नियमावली'' असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त अधिनियम'' असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र.टिपीएस–१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो.व प्रायो./कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि–१३. दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने दि.०९.०६.२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठी आणि दि.१०.१०.२०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी TOD बाबतचे विनियम मंजूर केलेले असून सदरचे विनियम हे मंजूर उक्त UDCPR नियमावलीमधील पुणे मनपा आणि नागपूर मनपा क्षेत्रासाठी विशिष्ट विनियम म्हणून (City Specific Regulation No.१४.२.१ आणि Regulation No.१४.२.३) समाविष्ट करण्यात आल आहेत. (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त तरतुदी'' असा करण्यात आलेला आहे).

आणि ज्याअर्थी क्रेडाई, मेट्रो आणि महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी उक्त UDCPR नियमावली'धील पुणे आणि नागपूर साठी लागू असणाऱ्या TOD बाबतच्या (City Specific Regulation No.१४.२.१ आणि Regulation No.१४.२.३) या तरतुदीमध्ये काही सुधारणा करण्याची विनंती शासनास केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त तरतूदींच्या अनुषंगाने उक्त UDCPR नियमावलीतील या सूचनेसोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे नव्याने तरतुद समाविष्ट करणे आवश्यक आहे (यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त फेरबदल'' असा करण्यात आलेला आहे), असे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तीचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित **विभागीय सहसंचालक, नगर रचना** यांचेकडे दाखल करता येतील. संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना. सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

**१) विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण/पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/छत्रपती संभाजीनगर विभाग.**
**२) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)**
**३) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.**
**४) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.**
**५) मुख्यकार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे.**
**६) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.**
**७) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.**
**८) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषदा**
**९) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)**

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.
**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

**सही/–**
**(प्रणव कर्पे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**विमाका/ कोल्हापूर/२६/२०२६–२०२७**

## चोरोची येथे ६१ लाखांचा बेदाणा जप्त

**मिरज,ता.१४ (प्रतिनिधी)– कवठेमहांकाळ तालुक्यातील चोरोची येथे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने तब्बल ६१ लाख २७ हजार ५१६ रुपये किमतीचा २६ हजार ६ किलो आयात केलेला बेदाणा जप्त केल्याची माहिती सहाय्यक आयुक्त (अन्न) नि. सु. मसारे यांनी दिली.**

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने चोरोची येथील मे. अजितकुमार पाटील बेदाणा प्रोसेसिंग सेंटरची तपासणी केली. यावेळी पत्र्याच्या शेडमध्ये मशीनरीच्या सहाय्याने बेदाण्याचे निटिंग, ग्रेडिंग, सॉर्टिंग आणि पॅकिंग सुरू असल्याचे आढळून आले.

## जाहीर नोटीस

मौजे रूई येथील गट नंबर ७८५/अ पैकी क्षेत्र हे ०.४४.८८ आर पैकी क्षेत्र हे. ०.०३.५० आर ची शेतजमिन मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस – सुर्यवंशी यांची मिळकत, पश्चिमेस– शिंगे यांची मिळकत दक्षिणेस – सरकारी रस्ता उत्तरेस–गट नंबर ७८६ ची मिळकत. सदरची मिळकत ही १) सखुबाई पुंडलिक शिंगे २) श्रीकांत पुंडलिक शिंगे ३) कै . विकास पुंडलिक शिंगे मयत वारस अथर्व विकास शिंगे रा. रूई ३) मंगल भिमराव कांबळे रा. यड्राव ४) उज्वला श्रीकांत जाधव रा. कोल्हापुर यांचे मालकीची असुन त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र करून आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात व्यतिरिक्त कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी . म्हणुन दिली नोटीस सही ता. १४/०५/२०२६

**ॲड.शिवकुमार लकडे**

३/१५३, देवमोरे वाडा, टाकवडे वेस, राणाप्रताप चौक मो. ९८८१०१४७२५

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

१) ता. हातकणंगले पैकी मौजे खोतवाडी येथील क. ग.नं.८४,याचे क्षेत्र हे.४.८१ आर, पो.ख. क्षेत्र हे.०.१८ आर, आकार रू.१०.९५ पैसे ची मिळकत त्यापैकी समजुतीच्या नकाशा प्रमाणे भुखंड नं.४चे क्षेत्र १९७८.३३ चौ. फुटाची खुली मिळकत यांसी चतुःसिमा पुर्वेस: भुखंड नं.३ची मिळकत, पश्चिमेस :–भुखंड नं.५ची मिळकत, दक्षिणेस:– श्री रावण खोत यांची मिळकत व उत्तरेस :– २० फुटी रस्ता. येणेप्रमाणे चतुःसिमेतील भुखंड मिळकत. २) वरील मिळकत ही १.श्री श्रीवल्लभ चंपालाल तोतला २. श्री दिनेश सत्यनारायण बांगड ३. श्री राजेश सत्यनारायण बांगड ४. श्री सुखदेवराम पुखराज प्रजापत यांचे मालकी वहीवाटीची असून त्यांनी सदर मिळकत कराराने श्री कपिल विजय चौगुले वगैरे ४ यांना दिली असुन त्या कराराआधारे श्री कपिल विजय चौगुले वगैरे ४ यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवुन संचकारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे. ३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबंध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती कागदपत्रासह लेखी कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता. १३.०५.२०२६

**ॲड.पंकज आ.पाटील**

ऑफीस – ''श्री दत्त अपार्टमेंट'', गाळा नं.१, सांगली नाका, इचलकरंजी, मो. न. ९०२११२३७६८७

## सांगलीत युवकास चाकूने भोसकले

**सांगली, ता. १४ (प्रतिनिधी ) –**

**मित्राच्या बहिणीबाबत वाईट टिप्पणी केल्याच्या कारणावरून सटाले मळा परिसरात युवकास चाकूने भोसकले.या हल्ल्यात ऋषिकेश सकाराम इमकर (वय २१, रा. सटाले मळा) गंभीर जखमी झाला आहे. गुरुवारी रात्री उशीरा ही घटना घडली. याप्रकरणी संशयितांस ताब्यात घेतल्याचे समजते. दरम्यान, संजयनगर परिसरात आठवड्यात दुसरी घटना घडल्याने घबराट पसरली आहे.**

ऋषिकेश इमकर हा पेटिंगचे काम करतो. संशयित हल्लेखोराच्या मित्राच्या बहिणीविषयी त्याने वाईट बोलले होते. हा राग मनात होता. यातूनच त्यांच्यात वाद झाला. वाद टोकाला गेल्यानंतर संशयिताने चाकूने भोसकले. वर्मी वार झाल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्यानंतर संशयिताने पळ काढला. इमकर यास उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले.दरम्यान, संजयनगर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी संशयितास ताब्यात घेतल्याचे समजते. संजयनगरमधील वाढती गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी आता ठोस क्शन प्लॅन तयार करण्याची गरज आहे.

## जाहीर नोटीस

**तमाम लोकांना कळविणेत येते की,**

मिळकतीचे वर्णन :– मौजे कबनूर, ता. हातकणंगले येथील गट नं. ७२९/अ पैकी खाते नं.३०९९२ ने नमुद क्षेत्र ० हे. ०५.१६ आर यापैकी भुखंड क्र. ४ व ५ यांचे एकूण क्षेत्र २०६–१३ चौ.मी. याचे २२१८–० चौ. फुटची खुली जागा मिळकत यासी चतुः सिमा पुर्वेस– प्लॉट नं. ६, पश्चिमेस– प्लॉट नं.३, दक्षिणेस– मिरजे यांची मिळकत, उत्तरेस– ३० फुट रुंदीचा रस्ता.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही तोहीद अब्दुल नाईकवाडे, रा. तारदाळ यांचे मालकीची असून ती त्यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारुन संचकार पावती लिहून दिली आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असलेचा निर्वाळा व कायदेशीर पणन योग्य हक्क असलेचा भरवसा मिळकत मालक यांनी दिला आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, कर्ज, करार, खरेदि, बक्षीस, इजमेंट वगैरे कसलाही बोजा अगर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत त्याबद्दल लेखी माहिती कागदपत्रासह पटवून द्यावी. येणेप्रमाणे न केलेस असा कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध वा तक्रार नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून तक्रार चालणार नाही. म्हणून प्रसिध्द केली नोटीस. ता. १४/०५/२०२६

**ॲड.गिरीश एन.मुदगल**

**१२/१७८, कॉंग्रेस कमिटी मागे, इचलकरंजी**
**मो.नं. ९३२५४९३९४६**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे तारदाळ येथील क. ग. नं. ६४० यापैकी भूखंड नं. २६ याचे क्षेत्र १४३.४९ चौ. मी यासी चतुः सिमा पूर्व–रस्ता, पश्चिम– भूखंड नं. १६, दक्षिण बाजू– भूखंड नं. ४७, उत्तर बाजू– भूखंड नं.२५ हा जन्नतबी हजरत कलावंत रा.कसबे सांगाव ता.कागल यांनी मे. दू. नि. इचलकरंजी यांचे कार्यालयातील नोंद रजि.नं.६७०१ दि. १६.०९.२०१३ इ. रोजी खरेदी घेतली आहे. खरेदीपत्राच्या आधारे जन्नतबी कलावंत यांचे नाव सातबारा पत्रकी नोंद झाले आहे. जन्नतबी कलावंत यांनी वरील मिळकत हि त्यांनी त्यांची मुलगी रियाना महंमद विजापुरे रा. गौरीशंकर नगर तारदाळ यांना दि. ०८.०१.२०२६ इ. रोजी हिब्बानामाने दिलेली आहे. त्या हिब्बानामाच्या आधारे रियाना विजापुरे यांचे नाव सातबारा पत्रकी नोंद झाली आहे, त्या मिळकतीच्या कायदेशीर मालक झाल्या आहेत. रियाना विजापुरे यांनी आमचे अशील संस्थेस वरील मिळकत तारण देऊन कर्ज घेणार आहेत. तरी वरील मिळकतीवर कोणाचा काही कायदेशीर हक्क संबंध असलेस खाली सही करणार ॲडवोकेट यांचेकडे सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात दिवसात कळवावे. मुदतीत कोणाची तक्रार न आलेस शोध अहवाल घेऊन मिळकत तारण घेतली जाईल.म्हणून दिली जाहीर नोटीस सही ता. १३.०५.२०२६

**ॲड.दत्ताजीराव के.कंदले**

१८/५७७/१'कौस्तुभ', शाहूनगर गल्ली नं.१ इचलकरंजी
मो.नं. ९४२०३३९६९६, ९८९०५८२९९३

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) ता. शिरोळ पैकी मौजे यड्राव येथील पार्वती को ऑप इंडस्ट्रियल इस्टेट लि. यड्राव मधील सेक्टर सी, फेज फर्स्ट, गट नं. ४९–६५ मधील प्लॉट नं. १९ व २०, प्रत्येकी क्षेत्र ५४०.० चौ. मी. याप्रमाणे एकुण क्षेत्र ९००.० चौ.मी. व यामधील सुमारे ४५०० चौ. फुट बांधकामाचे इमारतीसह ची मिळकत यांसी चतुःसिमा पुर्वेस :– प्लॉट नं.१८ ची मिळकत, पश्चिमेस :– १५ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस :–प्लॉट नं. १३ व १४ ची मिळकत व उत्तरेस :– १५ मी. रूंदीचा रस्ता.

२) वरील मिळकत ही पार्वती को ऑप इंडस्ट्रियल इस्टेट लि. यड्राव या संस्थेने ''महावीर एंटरप्रायजेस तर्फे प्रोप्रायटर कल्पना दिनेश जैन'' यांना ॲलॉट केलेली आहे व त्यांचे नावे नोंद सबलीज करार करून दिला आहे. सदर मिळकतीमधील इमारतीची मालकी महावीर एंटरप्रायजेस तर्फे प्रोप्रायटर कल्पना दिनेश जैन यांची आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना भाडेपट्टा करून हस्तांतरण करणेचे व इमारतीचे खरेदीपत्र / डिड ऑफ असाईनमेंट करून देणेचे ठरविले आहे व आमचे अशिलांकडुन करारपत्र करून संचकार दाखल रक्कम स्विकारलेली आहे.

३) सबब, सदरील मिळकतीवर कोणाचाही, कोणताही हक्क, करार, तारणगहाण दस्त, बक्षिस, वारसा हक्क, कोर्ट केसेस वगैरे हक्कसंबंध असतील तर तो त्यांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावरती कागदपत्रासह लेखी कळवावे. म्हणुन दिली जाहीर नोटीस सही ता.१३.०५.२०२६

**ॲड.पंकज आ.पाटील**

**ऑफीस – ''श्री दत्त अपार्टमेंट'', गाळा नं.१, सांगली नाका, इचलकरंजी, मो. न. ९०२११२३७६८७**

## हातकणंगले नगरपंचायत, हातकणंगले
## जाहिर निविदा सुचना क्र. ०२ सन २०२५–२६

हातकणंगले नगरपंचायत बांधकाम विभागाकडील खालील नमूद काम करून देणेसाठी सा.बां. वि. नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडून जाहिर निविदा सूचना ऑफलाईन पध्दतीने मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा नमुदा | अंदाजपत्रकीय रक्कम रू. | बयाणा रक्कम रूपये १% | निविदा रक्कम रू. | कामाचा कलावधी | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | हा.न.पं. हद्दीतील प्र.क्र.०२ अण्णासो तवटे घर ते जयश्री पाटील घरापर्यंत रस्ता करणे. | ब–१ | ६,२७,०६७/– | ६,२७०/– | १०००/– | ३ महिने | सा.बां. वि. वर्ग–९ व त्यावरील |
| २ | हा.न.पं. हद्दीतील हर्ष बेकरी ते सिराज मुजावर घर गटर्स करणे. | ब–१ | ३,६१,०११/– | ३,६१०/– | ५००/– | ३ महिने | सा.बां. वि. वर्ग–९ व त्यावरील |
| ३ | हा.न.पं. हद्दीतील प्र.क्र. ०२ मधील शिवलिंग सुळकुडे घर ते मिणचेकर ऑफिस रस्ता करणे. | ब–१ | ६,००,७९०/– | ६,००७/– | १०००/– | ३ महिने | सा.बां. वि. वर्ग–९ व त्यावरील |
| ४ | हा.न.पं. हद्दीतील प्र.क्र. १५ अण्णाप्पा हंडे घर ते विकास कानडे घर रस्ता खडीकरण व गटर्स करणे. | ब–१ | ७,५७,३७२/– | ७,५७३/– | १०००/– | ३ महिने | सा.बां. वि. वर्ग–९ व त्यावरील |

निविदा भरणाऱ्यांनी खालील अटीस पात्र राहून निविदा सादर करणेचे आहे.
१) कोऱ्या निविदा बयाणा रक्कम रोखीने बांधकाम विभागाकडे भरलेनंतर स्टोअर विभागाकडे विकत मिळण्याची मुदत दि.१५–०५–२०२६ ते दि.२६–०५– २०२६ इ. रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत राहील.
२) इतर अटी व शर्ती न.प. कार्यालयातील बांधकाम विभागाकडे कार्यालयीन वेळेत पाहाणेस मिळतील.
३) कोणतीही एक निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नामंजूर करणेचा अधिकार नगरपंचायातीने राखून ठेवला आहे.
४) सदर कामांचे कार्यादेश प्रशासकीय मंजूरी मिळालेनंतरच दिले जातील याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/–**
**(वि.वि. पाटील)**
मुख्याधिकारी,
हातकणंगले नगरपंचायत, हातकणंगले

**हानपं/बां.वि./ जाहीर निविदा /७६७/२०२६**
**मुख्याधिकारी नगरपंचायत हातकणंगले यांचे कार्यालय**
**ता.हातकणंगले जि.कोल्हापूर दि.१४/०५/२०२६**

# एआयमुळे मानवी जीवनावर दूरगामी परिणाम होणे शक्य

## अतुल कहाते यांचे प्रतिपादन; मनोरंजन व प्रबोधन व्याख्यानमालेस सुरुवात

इचलकरंजी,ता. १४

......................

**आज आपल्या जीवनातील सर्वच क्षेत्रात एआय तंत्राचा खूप मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला आहे. त्यामुळे एकूणच मानवी जीवनावर परिणाम होणार आहे. एआयमुळे भविष्यात अनेक संधी निर्माण होणार आहेत तसेच अनेक आव्हानेही आपल्यासमोर उभी राहतील, अशा आशयाचे प्रतिपादन माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ आणि प्रसिद्ध लेखक अतुल कहाते यांनी केले.**

येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल आयोजित मनोरंजन व प्रबोधन व्याख्यानमालेत पहिल्या दिवशी एआयचे अदभूत विश्व या विषयावर त्यांचे प्रभावी व्याख्यान संपन्न झाले.

व्याख्यानमालेचे हे ४८वे वर्ष असून यावेळी प्रमुख पाहुणे ए. आर. तांबे आणि अतुल शहा तसेच कहाते यांच्या हस्ते शिवप्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. सुरुवातीला मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष समीर गोवंडे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले तर मर्दा फाउंडेशनचे कार्यकारी विश्वस्त शामसुंदर मर्दा यांच्या हस्ते पाहुण्यांना गुलाब पुष्प व भेटवस्तू प्रदान करण्यात आली. यावेळी रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष घनशाम सावलानी उपस्थित होते. उपक्रम समन्वयक



मनोरंजन व प्रबोधन व्याख्यानमालेत दीपप्रज्वलन करताना प्रसिद्ध लेखक अतुल कहाते व इतर प्रमुख मान्यवर.

संजय होगाडे यांनी प्रास्ताविक केले. संतोष आबाळे यांनी सूत्रसंचालन केले तर काशीनाथ जगदाळे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.आपल्या माहितीपूर्ण व्याख्यानात कहाते यांनी ए. आय. म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा जन्म, सुरुवातीचे संशोधन, संगणकाला विविध विषय शिकविण्यासाठी झालेले प्रयत्न तसेच हे तंत्र विकसित करण्यामागील वैज्ञानिकांचे योगदान याचा सविस्तर आढावा घेतला. या क्षेत्रातील महत्त्वाचे संशोधक जेफरी हिंटन तसेच इतरही अनेक शास्त्रज्ञांच्या संशोधनाची माहिती त्यांनी दिली.''भविष्यात शिक्षण, उद्योग, व्यवसाय, वैद्यकीय, इत्यादी सर्व क्षेत्रात आणि दैनंदिन जीवनामध्ये एआयमुळे मोठे बदल घडणार असून, या तंत्रज्ञानाचा योग्य वापर करणारेच भविष्यात सक्षमपणे पुढे जातील,' असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी एआय कडे भीती म्हणून नव्हे तर नवी संधी म्हणून पाहण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.तंत्रज्ञानाच्या चांगल्या बाजू मांडतानाच कहाते यांनी यामधील धोक्यांबाबतही उपस्थितांना सतर्क केले. ''एआय मुळे काही नवीन स्टार्टअप उद्योग सुरू होऊ शकतील पण अनेक क्षेत्रांतील नोकऱ्याही कमी होण्याची शक्यता आहे.माहितीची गोपनीयता राखणे हे भविष्यात मोठे आव्हान ठरणार आहे. चुकीच्या माहितीचा प्रसार आणि बनावट व्हिडिओ यांमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडू शकते.असे ते म्हणाले, व्याख्यानाच्या शेवटी उपस्थित श्रोत्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक व अभ्यासपूर्ण उत्तरे दिली. येथील श्रद्धा इन्स्टिटयूट हॉलमध्ये झालेल्या या व्याख्यानास शहर व परिसरातील तंत्रज्ञानप्रेमी विद्यार्थी, युवक, शिक्षक आणि रसिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# पंचगंगा स्मशानभूमीतील दानपेटीत ६ लाख ४९ हजार जमा

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)

......................

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या पंचगंगा, कसबा बावडा, कदमवाडी व बापट कॅम्प येथे स्मशानभुमी आहेत. याठिकाणी महापालिकेच्या वतीने मोफत अंत्यसंस्कार करण्यात येतात. पंचगंगा स्मशानभूमी व इतर ठिकाणी गुप्तदान पेट्या ठेवण्यात आल्या आहेत.**




स्मशानभूमीत अंत्यसंस्कार आणि रक्षाविसर्जनासाठी येणारे नागरीक या दानपेटीत सढळ हाताने दान करतात. या गुप्तदान पेट्या उघडण्यात येतात. पंचगंगा स्मशानभूमी येथील गुप्तदान पेटी बुधवारी सहा. आयुक्त स्वाती दुधाने, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, वरिष्ठ लेखापाल बाजीराव ढोणे, आरोग्य निरिक्षक शुभांगी पोवार, नंदकुमार पाटील, प्रकाश लोंढे, सुरज घुणकीकर, महेश भोसले व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत उघडण्यात आली.या दानपेटीमध्ये रु.४,१९,६७५/- व ऑनलाईन स्वरुपात २,३०,१०९/- अशी एकूण ६ लाख ४९ हजार ७८४ इतकी रक्कम जमा झालेली आहे.

यापूर्वी माहे मार्च २०२५ मध्ये स्मशानभूमीकडील दानपेटी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये पंचगंगा स्मशानभूमीकडे तब्बल रु.१ लाख ६१ हजार ५३७ इतकी रक्कम दान स्वरुपात दानपेटीत प्राप्त झालेली होती. स्मशानभूमीकरिता दानशूर व्यक्ती, तरुण मंडळे, नागरिक यांचेकडून शेणी, लाकूड दान करणेस मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो. त्याचबरोबर दानपेटीतही प्रचंड उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळालेला आहे. याबद्दल सर्व दानशूर व्यक्तींचे महानगरपालिकेकडून आभार मानण्यात येत आहे.



शिवानी सावंत



वेदांत गराडे



विशाल देवकुळे

# के.सी.सी हायस्कूल बोरपाडळेचा दहावीचा निकाल शंभर टक्के

बोरपाडळे,ता.१४ (प्रतिनिधी)–

..............................

**महाराष्ट्र राज्य मंडळाच्या वतीने फेब्रुवारी – मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परिक्षेत के. सी.सी हायस्कूल बोरपाडळे (ता. पन्हाळा ) चा निकाल शंभर टक्के लागला अनुक्रमे शिवानी भैरवनाथ सावंत ( ८३ टक्के ), वेदांत सागर गराडे ( ८०.६० टक्के), विशाल राजाराम देवकुळे (७४ टक्के ) यांनी गुण मिळवले.**

विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका शर्मिला आर.समुद्रे, एस. आर.वांद्रे, एस.बी.पोवार, ए.डी.धनवडे, एस.डी.चोपडे, व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

# आपटे वाचन मंदिरमध्ये बाल वाचन संस्कार शिबीर संपन्न

इचलकरंजी,ता.१४

......................

**आपटे वाचन मंदिरमध्ये इचलकरंजी नगरीतील इ. ७ वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी बाल वाचन संस्कार शिबिर ग्रंथालयाच्या बजाज हॉलमध्ये आयोजित केले होते. सध्या मोबाईलच्या विळख्यात अडकलेल्या विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करावी, वाचन संस्कृती जपावी आणि जोपासावी या हेतूने हे शिबिर आयोजित केले होते.**






आपटे वाचन शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना सौ.ज्योती जोशी व्यासपीठावर इतर प्रमुख मान्यवर.

यामध्ये वाचनाच्या आवाजाचा चढ-उतार, मराठी व्याकरण, कविता वाचन, कथा वाचन, नाट्य वाचन, विज्ञान कथा याबाबत ग्रंथालयाचे उपाध्यक्ष काशिनाथ जगदाळे, कार्यवाह प्रा. मोहन पुजारी, सहकार्यवाह डॉ. सुजित सौंदत्तीकर, संचालक संजय सातपुते, संचालिका सौ. मीनाक्षी तंगडी व माया कुलकर्णी यांनी आणि तज्ञ शिक्षक उमेश खराडे , श्री.तापकीरे, सौ.चित्कला कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबिराचा शुभारंभ तज्ञ शिक्षिका सौ. प्राची कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. शिबिराच्या समारोपास नामवंत लेखिका सौ.ज्योती जोशी या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात वाचनाचे महत्त्व कसे आहे हे उदाहरणासह विषद केले. सूत्रसंचालन सौ. प्राची कुलकर्णी यांनी केले. याकामी सौ. आरती मगदूम यांनी सहकार्य केले. स्वागत उपाध्यक्ष काशिनाथ जगदाळे यांनी तर प्रास्ताविक कार्यवाह प्रा. मोहन पुजारी यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय सहकार्यवाह डॉ. सुजित सौंदत्तीकर यांनी करून दिला. शिबिराच्या समारोप कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्यास ग्रंथालयाच्या वतीने एक पुस्तक भेट म्हणून देण्यात आले. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांमधून मयुरी सोमनाथ रुग्गे व आराध्या अतुल जाधव यांना मुख्याध्यापिका सौ. ए. एस. काझी यांच्या देणगीतून उत्कृष्ट बाल वाचक पुरस्कार देण्यात आले.

आजच शुक्रवार दि. १५ मे २०२६ रोजी रात्री ठीक ९ वाजता
श्रध्दा इन्स्टिट्यूट हॉल, मंगळवार पेठ, रिक्रिएशन हॉलजवळ, इचलकरंजी.

मनोरंजन मंडळ, इचलकरंजी
श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन
रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल

मनोरंजन व प्रबोधन (वर्ष ४८ वे)
व्याख्यानमाला २०२६



मा. रेखा मुंदडा, धुळे
(प्रसिद्ध कथा कथनकार)
कथा कथन

प्रायोजक
सोनेरी क्षणांसाठी
मे. तुळजाराम सुरचंद शहा

सहप्रायोजक
शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, यड्राव | शुभम डायनिंग, इचलकरंजी
कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, हुपरी
दि लक्ष्मी को-ऑप. प्रोसेसर्स लिमिटेड, इचलकरंजी
लक्ष्मीदत्त मंडप प्रा. लिमिटेड, इचलकरंजी (अभिजीत व अविनाश विनायक होगाडे)
गुरुकुल शिक्षण समुह, अ. लाट - इचलकरंजी | डी. एम. कस्तुरे चॅरिटेबल फौंडेशन
बालमुकुंद रामाकिसन तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्ट, इचलकरंजी
किरण गॅस एजन्सीज, इचलकरंजी - एच.पी.गॅस वितरक
चौगुले डेअरी प्रॉडक्टस्, इचलकरंजी - अभय दूध । स्वीटस् । बेकरी । नमकीन
कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सह. बँक लि.(शेड्यूल्ड बँक) इचलकरंजी
रसिकांनी मित्र परिवारासह जरूर यावे ही आग्रहाची विनंती !



# बाबुराव पाटील यांचा सत्कार

पन्हाळा,ता.१४(प्रतिनिधी)

..............................

**पन्हाळा तालुक्यातील माजगाव येथील विद्यामंदिर आकुर्डेचे मुख्याध्यापक बाबुराव आकाराम पाटील यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.**

या प्रसंगी प्राथमिक शिक्षणाधिकारी जि. प. कोल्हापूर डॉ. मीना शेंडकर , गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पन्हाळा शिवाजी मानकर, शिक्षण विस्तार अधिकारी मा. दबडे व के. एस. पाटील, तसेच शिक्षक समितीचे जिल्हा नेते कृष्णात कारंडे, महिला अध्यक्षा संगीता अस्वले, शिक्षक नेते रामदास झेंडे व दिलीप बच्चे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी माजगावच्या सरपंच पूजा सुतार, केंद्र समन्वयक शिवाजी पाटील व तानाजी घरपणकर यांच्यासह तालुक्यातील अनेक शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते.

# बाजारभोगावात आज समाधान शिबीर

बाजारभोगाव,ता.१४(प्रतिनिधी)–

..................................

**बाजारभोगाव येथे शुक्रवार ता. १५ मे २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान टप्पा क्र. १ समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर बाजारभोगाव येथील शिवतेज हॉल येथे पार पडणार असून नागरिकांच्या विविध महसुली व शासकीय अडचणी जागेवर सोडविण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.**

या शिबिराच्या पार्श्वभूमीवर नायब तहसीलदार विजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक उत्साहात संपन्न झाली. बैठकीस ग्रामविकास अधिकारी राजाराम चौगले, चंदू मसवकर, सुनंदा माने, शरद पाटील. श्री मुल्ला यांच्यासह आरोग्य विभाग, कृषी विभाग, वन विभाग, महावितरण, धान्य दुकानदार, पोलीस पाटील तसेच मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते.या समाधान शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा,असे आवाहन नायब तहसीलदार विजय जाधव व मंडळ अधिकारी नलिनी मोहीते यांनी केले.

# आरक्षणाच्या नावाखाली शासन खेळ करेल

## जयसिंगपुरात कृष्णात डोणे यांची भाकणूक

जयसिंगपुर,ता.१४(प्रतिनिधी)–

..............................

**राजकारणात मोठा गोंधळ होईल,कोरोना पेक्षा मोठा आजार येईल,१०० वर्षानंतर माणूस पृथ्वी सोडेल,जातीवाद, राजकारण, महाराष्ट्र, कर्नाटकसीमा प्रश्न चर्चेत येणार,राष्ट्राराष्ट्रामध्ये वाद चालतील, रेल्वे धडकाधडकी होतील, कोल्हापूरच्या देवीच्या डोळ्यातून पहाटेच पाणी येईल**



बहिण भावाच्या नात्याला कलंक लागेल,जगात सत्य फासावर जाणार बारा वर्षाची मुलगी आई होईल, उन्हाळ्याचा पावसाळा होणार,कर्नाटक राज्याच्या जलाशयाला मोठे भगदाड पडेल,वागा वागा सत्यानं वागा, आरक्षणाच्या नावाखाली शासन खेळ करेल. समाजा-समाजात भांडणं लावतील. सर्व जाती आरक्षणासाठी आंदोलन होतील, सांभाळून राहा. ज्याच्या अंगावर भंडारा पडेल त्याच्या सर्व व्याधी दूर होतील, अशी भाकणूक कृष्णात डोणे-वाघापूरकर महाराज यांनी केली.शहरातील नांदणी रोडवरील संभाजीनगरात कलावती मंदिर शेजारी संत सदगुरू बाळूमामा भंडारा उत्सव कमिटीच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात कृष्णात ढोणे महाराज यांनी भाकणूक केली. प्रथम जयसिंगपूर येथील डेबाँन्स कॉर्नर चौकापासून दिव्य स्वरूपात सुरू झालेल्या पालखी मिरवणुक काढण्यात आली.पालखी मिरवणुकीत लेझीम हलगी, धनगरी ढोल, चौकाचौकांमध्ये रांगोळी, फटाक्यांची आतषबाजीसह भंडाऱ्याच्या उधळणीने संपूर्ण वातावरण भक्तीमय बनले होते.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १५/०५/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
भिगा जिस्म
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र
दुपारी ७ वा.
A सौतन रात की प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १५ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
मचेल रोल ग्रीड
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
महिलांच्या वाढत्या गर्दीचा ३ रा आठवडा
नवीन प्रोजेक्टरसहीत फुल्ल एच.डी.
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
book my show
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसॲप ग्रुप
रोज ४ खेळ सकाळी ११.३०
दुपारी ३ सायं. ६.३० व रात्री १० वा.







५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
वाढत्या गर्दीचा ३ आठवडा
रोज ४ खेळ *११.३० *३ *६.१५*१.३० वा.





कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
शुक्रवार ता.१ पा.
दु.१२ वा., दु.३.३० वा., सायं.६.३० वा.,





गुरु
शुक्रवार ता.८ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ४ खेळ ११.३० * ३ * ६.३० व १० वा.
महिला व बच्चे कंपनीच्या
प्रचंड गर्दीचा ३ रा आठवडा





RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
book my show



" राजा शिवाजी "- मराठी
11:00 AM, 02:30 PM
06:00 PM, 09:30 PM
" कृष्णावतारम : भाग 1 द हार्ट " - हिंदी
12:15 PM, 07:00 PM
10:00 PM
" पति पत्नी और वो दो " ( हिंदी )
11:00 AM, 01:30 PM
04:00 PM, 07:30 PM
10:30 PM
" बाप्या "- मराठी
03:00 PM
" भूत बंगला "- हिंदी
09:00 AM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11





राजा शिवाजी (MAR) (U/A)
10.00am, 12.00, 01.30, 03.30, 07.00, 10.30pm
पती पत्नी और वो दो (HIN) (U/A)
10.30am, 03.00, 08.00 10.15pm
आखरी सवाल (HIN) (U/A)
12.45, 10.30pm
कृष्णावतारम पार्ट १ (HIN) (U/A)
05.15pm
बाप्या (MAR) (U/A)
05.00, 07.45pm
आता पहा कोणताही शो पहा फक्त 100 पासून पुढे

# सांगली-पेठ रस्ता करता आला नाही, त्यांनी शक्तिपीठवर बोलू नये

## ना.चंद्रकांत पाटील यांचा आ.जयंत पाटील यांना टोला

सांगली,ता.१४(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यातील एक बडे नेते वर्षानुवर्षे मंत्री राहिले, त्यांना त्यांच्या मंत्रिपदाच्या काळात सांगली-पेठ रस्ता करता आला नाही, ते शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात बोलत आहेत, त्यांनी शक्तिपीठावर बोलूच नये, असा टोला जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जयंत पाटील यांचे नाव न घेता लगावला. ते सांगलीतील पत्रकार परिषदेत बोलत होते.**



शक्तीपीठ महामार्गामध्ये एक-दोन दिवसात समजेल कोणत्या गावातून आणि किती जणांची जमीन जाणार आहे. मात्र सरकार शेतकऱ्यांवर अन्याय करणार नसल्याची ग्वाहीही मंत्री पाटील यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीच्या सभेनंतर पालकमंत्री पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, देशात स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर धरणे आणि विमानतळ बांधण्यात आली, त्यावेळी लोकांच्या जमिनी गेल्या आहेत. जमिनी दिल्याशिवाय काहीतरी नवीन निर्माण होत नाही.स्व.मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, विलासराव देशमुख यांच्या कालखंडात काही तरी निर्माण करण्यासाठी जमिनी द्याव्या लागल्या आहेत. समृद्धी महामार्ग असो अथवा पुरंदर विमानतळ त्यासाठी जमीन लागते.शेतकऱ्यांचा विरोध झाला, परंतु सरकारने मार्ग काढल्यानंतर प्रकल्प उभे राहिले.

पालकमंत्री पाटील पुढे म्हणाले, शक्तीपीठ महामार्ग जिल्ह्यातील कोणत्या गावातून जाणार आहे, कोणत्या शेतकऱ्याची किती जमीन जाईल, याबाबतचे चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर ज्याठिकाणी अडचणी निर्माण झाल्या आहेत, त्या दूर केल्या जातील. देशात आणि राज्यात धरणे,विमानतळे बांधली ती आकाशात बांधली का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. सरकार सामान्य लोकांना बरोबर घेतल्याशिवाय पुढे जाणार नाही. शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, याबाबतची दक्षता आम्ही घेवू, असेही त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, युद्ध सुरु होवून तीन महिने झाले, जागतिक युद्धजन्य परिस्थितीत पेट्रोल-डिझेलच्या दरात एक रुपयाही वाढ झालेली नाही. भविष्यात इंधनाचे संकट निर्माण होवू नये,यासाठी सर्वांनी इंधन बचत करावी, असे आवाहन पालकमंत्री पाटील यांनी केले.

ते पुढे म्हणाले, सांगली महानगरपालिकेत आमची सत्ता आहे, पदाधिकाऱ्यांत वाद असतील तर तो आमचा प्रश्न आहे, बाहेर कशाला सांगायचे, असा टोला पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधकांना लगावला. विरोधकांनी टीका करणे हे त्यांचे कामच आहे. त्याशिवाय विरोधक असल्याचे जाणले जात नाही.

**घरपट्टी वाढीबाबतचा निर्णय योग्य**

महापालिकेत घरपट्टी वाढीबाबत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना विचारले असता ते म्हणाले,घरपट्टी वाढीचा निर्णय आयुक्तांनी घेतला आहे. ज्या-त्या भागातील नागरिकांना भांडवली मूल्यावर कर आकारणी केली जाईल. घरपट्टीवाढीमुळे नुकसान होणार नसून निर्णय योग्य आहे, त्याचे स्वागत करु,असे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले.

**जितेंद्र आव्हाडांनी उंटावर बसायला हवे होते**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केल्यानंतर आ.जितेंद्र आव्हाड यांनी घोड्यावर बसून आंदोलन केले त्याबाबत विचारले असता, इंधन बचतीसाठी जितेंद्र आव्हाडांनी घोड्यावर नव्हे उंटावर बसायला हवे होते. घोड्यावर बसून चुकले, असा टोला मंत्री पाटील यांनी लगावला.राज्यातील दहा मंत्र्यांना केंद्र सरकारची सुरक्षा आहे,त्यामध्ये माझा समावेश आहे. मी राज्यात सर्वत्र फिरतो, त्यामुळे माझ्यावर टीका होते. पण अनावश्यक प्रवास टाळला असल्याचेही त्यांनी सांगितले.

# 'सह्याद्री'च्या कॉरिडॉर विस्ताराची माहिती नागरिकांना द्यावी

## विराज नाईक यांचे तहसीलदारांना निवेदन

शिराळा,ता.१४(प्रतिनिधी)-

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कॉरिडॉर विस्ताराबाबत सविस्तर माहिती व समाविष्ट गावांचे फायदे, तोटे याची माहिती वन्यजीव विभागाने नागरिकांना देणे गरजेचे आहे. त्यासाठी तहसीलदारांनी तातडीची बैठक बोलवावी, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य विराज नाईक यांनी निवेदनाद्वारे केली. यावेळी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कॉरिडॉरमधील संभाव्य गावातील प्रमुख नागरिक उपस्थित होते.**



शिराळा तहसीलदार यांना निवेदन देताना विराज नाईक व शेतकरी.

यावेळी झालेल्या चर्चेतून व दिलेल्या निवेदनात म्हटले की, सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या कॉरिडॉरच्या विस्ताराच्या बातम्या काही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांत भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कारण सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात असलेले चांदोली राष्ट्रीय उद्यानाचा यामध्ये समावेश आहे. वृत्तानुसार, सध्या अस्तित्वात असलेल्या ९३ गावांऐवजी आता ही संख्या ५५० गावांपर्यंत नेण्याचा प्रस्ताव आहे. यामध्ये शिराळा तालुक्यातील अनेक गावांचा समावेश असल्याचे समजते. ज्या गावांचा यामध्ये समावेश आहे तेथे दूरगामी परिणाम होणार आहेत.

तालुक्यातील नागरिकांना या प्रस्तावाबाबत अधिकृत माहिती नसल्यामुळे संभ्रमावस्था वाढली आहे. यामध्ये नेमक्या कोण कोणत्या गावांचा समावेश आहे? या प्रस्तावामुळे स्थानिक लोकांच्या उपजीविकेवर काय परिणाम होईल? विकासकामे खरंच थांबणार का? असे अनेक प्रश्न जनतेला सतावत आहेत. त्यामुळे या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी प्रमुख मंडळींची एक तातडीची बैठक आयोजित करावी.

यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बी.के.नायकवडी, विश्वासचे संचालक संभाजी पाटील, शिवाजी पाटील व सुहास घोडे-पाटील, तानाजी वनारे, कोंडीबा चौगुले, शंकर मोहिते, पै. शिवाजी लाड, सुरेश चिंचोलकर बाबासो गोळे, शिवाजी सखाराम पाटील, शंकर बोरगे, डॉ.तानाजी पाटील आदी उपस्थित होते.

# कोयना बँकेचे चेअरमन के.टी. पाटील यांचा पुरस्काराने गौरव

कराड,ता.१४(प्रतिनिधी)-



**कोयना सहकारी बँकेचे चेअरमन, प्रगतशील शेतकरी व नामवंत उद्योजक कृष्णत तथा के.टी.पाटील यांना 'आईसाहेब फाउंडेशन' तर्फे विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कृषी, सहकार आणि उद्योग अशा विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.**

नांदगाव (ता.कराड) येथे हा पुरस्कार सोहळा पार पडला. सहाय्यक पोलिस निरीक्षक चौधरी आणि जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.संजय कुंभार यांच्या हस्ते के.टी.पाटील यांना सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर फाउंडेशनचे विश्वस्त शेडगे, संजय होगले, ॲड.पंडित हरदास आदी मान्यवर उपस्थित होते. के.टी.पाटील यांनी शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आदर्श प्रगतशील शेतकरी म्हणून ओळख निर्माण केली आहे. तसेच कोयना सहकारी बँकेचे काम करताना आपल्या कौशल्याने बँकेला यशाच्या शिखरावर पोहोचवले आहे.

# आ.अतुल भोसलेंनी घेतली निशिकांत पाटील यांची भेट

## कृष्णा कारखाना निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा

ईश्वरपूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**कराड दक्षिणचे आम.डॉ.अतुल भोसले यांनी उरुण-ईश्वरपूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सांगली जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील यांची सदिच्छा भेट घेतली.**

कृष्णा सहकारी साखर कारखाना निवडणूक अनुषंगाने ही भेट झाली असुन एक तासाच्या बंद खोलीतील चर्चेमूळे होणाऱ्या कृष्णा सह. साखर कारखान्याच्या निवडणुकीतील वाळवा, तालुक्यातील राजकीय समीकरणांना गती मिळणार असल्याचे बोलले जात आहे. कृष्णा सह.साखर कारखान्याचे कार्यक्षेत्रात वाळवा शिराळा तालुका येत असल्याने अविनाश मोहिते व भोसले यांच्यातील सत्तासंघर्ष कारखान्याच्या निवडणुकीत पहायला मिळणार आहे.



सदिच्छा भेटीप्रसंगी चर्चा करताना आ.अतुल भोसले व निशिकांत पाटील.

**निशिकांतदादांच्या गटाला संधी हवीच...**

ईश्वरपूर विधानसभा निवडणुकीत आ.अतुल भोसले यांनी आपली गुप्त शक्ती आ.जयंत पाटील यांच्या पाठीशी लावल्याने व निशिकांतदादा यांचा निसटता पराभव झाल्याने आ.अतुल भोसले यांच्यावर निशिकांतदादा यांच्या कार्यकर्त्यांची मोठी चिड होती ती आज ही आहे. यामुळे भविष्यातील शब्द आणि आता संचालक पदाच्या दोन उमेदवारी यावर कार्यकर्ते ठाम आहेत. यावरच ही भेट झाली असल्याचे बोलले जात आहे. एक तासाच्या गुप्त बैठकीत झालेला संवाद कृष्णा कारखान्याच्या निवडणुकीत निर्णयात्मक ठरेल असे वाटते.

यावेळी उरूण-ईश्वरपूर नगरपालिका नगरसेवक अजित पाटील, शिवाजीराव पवार, भास्कर मोरे, प्रांजली अर्बन बँक चेअरमन अक्षय पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष धैर्यशील मोरे, निवास पाटील, दादासाहेब रसाळ, प्रवीण माने,बहेचे यदुराज थोरात,शिरटेचे दिलीप लाड आदिंसह अन्य प्रमुख पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# कराड बाजारपेठेत लिंबूच्या दरात मोठी वाढ

कराड,ता.१४(प्रतिनिधी)-

**कराड शहरासह परिसरात गेल्या दोन दिवसांपासून उष्णतेची तीव्रता वाढली असून तापमानाने तब्बल ४३ अंशांचा टप्पा गाठला आहे. वाढत्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. मागील दोन महिन्यांपासून सातत्याने वाढणाऱ्या तापमानामुळे थंड पेये, सरबत आणि विशेषत: लिंबूपाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.**

सध्या बाजारात मोठे व रसदार लिंबू तब्बल २० रूपयांना एक या दराने विकले जात आहेत. वाढलेल्या दराचा फायदा घेण्यासाठी काही व्यापारी आणि शेतकरी कच्ची व आकाराने लहान लिंबे मोठ्या प्रमाणात बाजारात विक्रीस आणत असल्याचे दिसून येत आहे. ही लिंबे बाहेरून आकर्षक दिसत असली तरी त्यामध्ये अपेक्षित प्रमाणात रस नसल्याने ग्राहकांची निराशा होत आहे.

विशेष म्हणजे काही ठिकाणी ही छोटी व कच्ची लिंबे दहा रूपयांना दोन या दराने विकली जात आहेत. मात्र या लिंबांमधून रस कमी निघत असल्याने ग्राहकांना आर्थिक फटका बसत आहे. अनेक नागरिकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली असून दर जास्त असूनही योग्य दर्जाचे लिंबू मिळत नाहीत, अशी तक्रार केली आहे. या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन कच्च्या लिंबांची विक्री वाढल्याने ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे स्पष्ट होत आहे.



जत : दहावी परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना तम्मणगौडा रवीपाटील व इतर प्रमुख मान्यवर.

# उमराणी जिल्हा परिषद शाळेचे यश अभिमानास्पद-पाटील

जत,ता.१४(प्रतिनिधी)-

**जत विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालात उमराणी येथील पीएमश्री जिल्हा परिषद कन्नड माध्यमिक शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. पहिल्याच वर्षात शाळेने मिळवलेले हे यश संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद असल्याचे गौरवोद्गार माजी सभापती तम्मणगौडा रवी पाटील यांनी काढले.**

या दैदिप्यमान यशाच्या पार्श्वभूमीवर सांगली जिल्हा परिषदेच्या कृषी, पशुसंवर्धन व दुधविकास समितीच्या सभापती सौ. सावित्रीताई तम्मणगौडा रवी पाटील यांच्या दालनात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व शुभेच्छा देऊन गौरव करण्यात आला.यावेळी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे, पालकांचे व ग्रामस्थांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ती मदत करण्याची ग्वाहीही रवी पाटील यांनी दिली.

# अण्णासाहेब डांगे महाविद्यालयातील २०५ विद्यार्थ्यांची कंपनीत निवड

आष्टा,ता.१४(प्रतिनिधी)-

**अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय येथील मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागांनी प्लेसमेंट क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत २०५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना नामांकित औद्योगिक कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना वार्षिक ३ ते ४ लाख इतक्या आकर्षक पॅकेजसह विविध अग्रगण्य कंपन्यांमध्ये निवड मिळाली आहे.**

या प्लेसमेंट मोहिमेमध्ये सेडमॅक कंपनीत ४२, बेलराईज इंडस्ट्रीजमध्ये २३, शेफ्लर टेक्नॉलॉजीमध्ये ७८, पाटील ऑटोमेशनमध्ये ४९ तसेच शू फिनिशिंग कंपनीमध्ये १३ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध औद्योगिक क्षेत्रांतील या संधींमुळे विद्यार्थ्यांना कोअर इंजिनिअरिंग क्षेत्रात उज्ज्वल करिअर घडवण्याची संधी प्राप्त झाली आहे.

विद्यार्थ्यांची निवड लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखती, ग्रुप डिस्कशन तसेच प्रत्यक्ष कौशल्य चाचणी अशा विविध टप्प्यांतून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, टीमवर्क आणि व्यावसायिक दृष्टिकोनाच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.

मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ.एम.एम. जाधव यांनी सांगितले की, 'विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण, प्रात्यक्षिक अनुभव आणि कौशल्यविकासावर सातत्याने भर दिला जातो. त्याचाच परिणाम म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेली प्लेसमेंट कामगिरी होय.'

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ.सुरज पवार व संदीप मगदूमनी सांगितले की, 'विद्यार्थ्यांची मेहनत, शिस्तबद्ध तयारी आणि प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले.महाविद्यालयाचे संचालक डॉ.एल.वाय.वाघमोडे म्हणाले,'एडीसीईटीमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. ही विक्रमी प्लेसमेंट कामगिरी संस्थेच्या गुणवत्तेचा ठोस पुरावा आहे. संस्थेचे सचिव ॲड. चिमण डांगे, सहसचिव विश्वनाथ डांगे यांनी अभिनंदन केले.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, आष्टा हे अभियांत्रिकी शिक्षणासाठी विश्वासार्ह आणि उद्योगस्नेही केंद्र म्हणून अधिक बळकट झाले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# सांगलीत ६५७ विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती

सांगली,ता.१४(प्रतिनिधी)-

**जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात सांगली जिल्ह्यातील ६५७ उमेदवारांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. यापैकी १०० नवनियुक्त विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि भाजप सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात नियुक्ती प्रमाणपत्र व शिक्क्यांचे वितरण करण्यात आले.**



सांगली येथे विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र वाटप करताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, आम. सुधीर गाडगीळ व अन्य मान्यवर.

## प्रातिनिधीक स्वरुपात १०० प्रमाणपत्रांचे वितरण

यावेळी नव्याने नियुक्त झालेल्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या, कामकाजाची पद्धत तसेच नागरिकाभिमुख प्रशासनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशासन अधिक प्रभावी व गतिमान करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हाधिकारी मैनाक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी स्नेहल कनिचे, विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, उपविभागीय अधिकारी रणजीत भोसले, श्रीनिवास अर्जुन, अजयकुमार नष्टे, समाधान शेंडगे, तहसीलदार लिना खरात यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिलांवर मधमाशांचा हल्ला

## पाळशी येथील घटना; जखमींची प्रकृती स्थिर

ढेबेवाडी,ता.१४(प्रतिनिधी)-

**पाटण तालुक्यातील पाळशी येथे गावातील पाणीटंचाईमुळे कपडे धुण्यासाठी नदीवर गेलेल्या तीन महिला आणि दोन मुलींवर आग्यामोहाच्या माशांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तीन महिला जागीच बेशुद्ध पडल्या असून, सध्या त्यांच्यावर ढेबेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

मिळालेल्या माहितीनुसार पाळशी परिसरात सध्या पाण्याचे भीषण संकट उभे ठाकले आहे. गावात पाणी नसल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. बुधवारी दुपारी दीडच्या सुमारास गावातील महिला कपडे धुण्यासाठी नदीकडे निघाल्या होत्या. धनगर गवन शिवारात पोहोचताच अचानक येथील आग्यामोहाच्या माशांनी या सर्वांवर हल्ला चढवला.

माशांचा दंश इतका तीव्र होता की, यात तीन महिलांना असह्य वेदना होऊन त्या जागीच बेशुद्ध पडल्या. यावेळी जवळच असलेल्या शुभम माने या तरुणाने प्रसंगावधान राखत आरडाओरडा केला. त्याच्या आवाजामुळे गावकरी तातडीने मदतीला धावून आले.



पळशी येथील मधमाशांच्या हल्ल्यातील जखमी महिलांवर ढेबेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

गावकऱ्यांनी तातडीने उपलब्ध वाहनांतून जखमींना ढेबेवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. जखमींमध्ये सुनीता संदीप माने (वय ४०), यशोदा आत्माराम सावंत (वय ६०), शांताबाई रघुनाथ माने (वय ६०),आरोही संदीप माने (वय १२), दुर्वा सचिन माने (वय ७) यांचा समावेश आहे. वैद्यकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या सर्वांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर पाळशी ग्रामस्थांनी प्रशासनाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. येथील ग्रामस्थ सिताबाई दत्तु पिसाळ यांनी आपली प्रतिक्रिया देताना सांगितले की, आमच्या गावाला अगोदरच भीषण पाणीटंचाईने ग्रासले आहे. पाण्यासाठी महिलांना उन्हातान्हात शिवारात फिरावे लागते. त्यातच आता वन्य प्राण्यांचा आणि अशा हल्ल्यांचा उपद्रव वाढला आहे. शासनाने केवळ आश्वासन न देता, पाण्यासाठी आणि आमच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा जगायचे कसे? असा आम्हाला प्रश्न पडला आहे.

# तारळी पंप स्टोरेज प्रकल्पाचे तीन दिवस काम बंद

## डॉ.भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखालील जनआंदोलनाला यश

मसूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**तारळी पंप स्टोरेज प्रकल्पाच्या विरोधात डॉ.भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या तीव्र आंदोलनाला अखेर यश मिळाले असून संबंधित प्रशासनाने प्रकल्पाचे काम तीन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यापाऱ्यांना देऊ देणार नाही, तसेच तारळी पंप स्टोरेज प्रकल्प होऊ देणार नाही,असा इशारा डॉ.भारत पाटणकर यांनी दिला.**

उंब्रज परिसरातील तारळी व कृष्णा नदीकाठावरील लाभधारक शेतकरी, उपसा सिंचन संस्था आणि प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या वतीने मसूर येथे हे आंदोलन करण्यात आले. प्रकल्पाचे काम पूर्णपणे बंद करण्याच्या मागणीसाठी आंदोलक थेट प्रकल्पस्थळी जमले होते. जोपर्यंत काम थांबत नाही, तोपर्यंत माघार घेणार नाही, अशी भूमिका डॉ.पाटणकर यांनी स्पष्ट केली.



मसूर : आंदोलन करताना डॉ.भारत पाटणकर व शेतकरी.

यावेळी कराड पंचायत समितीचे माजी सभापती देवराज पाटील, राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजितराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाच्या महिला सेलच्या प्रदेश सरचिटणीस सौ.संगीता साळुंखे यांच्यासह विविध संघटनेचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

डॉ.पाटणकर म्हणाले, तारळी धरणाचे पाणी मूळ प्रकल्पग्रस्त, बाधित आणि लाभक्षेत्रातील गावांपर्यंत पोहोचलेले नसताना हे पाणी खाजगी ठेकदारांना देणे अन्यायकारक आहे. प्रकल्पासंदर्भात ग्रामस्थांची योग्य सुनावणी झालेली नाही. उत्खनानातील माती, मुरूम आणि गाळ धरणात जाऊन साठवण क्षमता कमी होण्याचा धोका आहे. प्रकल्प परिसरात पर्यावरणीय नियमांचे उल्लघन होत असून ब्लास्टिंगमुळे वन्यजीवांचे स्थलांतर होत आहे. आंदोलनकर्त्यांनी प्रकल्पामुळे परिसरातील रस्त्यांचे नुकसान, बोअरवेलच्या पाण्याचा प्रश्न, परप्रांतीय कामगारांकडून मुलींची छेडछाड, शौचालय व घनकचरा व्यवस्थेचा अभाव, वनतोड, प्रकल्पग्रस्तांना नोकरी वा पर्यायी जमीन न देणे यासारखे गंभीर आरोप केले.

यावेळी देवराव पाटील, राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अजितराव पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.

# राधानगरी धरणात २.८४ टीएमसी पाणीसाठा

## गतवर्षीच्या तुलनेत एक टीएमसी पाणीसाठा कमी

शिरगाव,ता.१४(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्ह्याला शेती व पिण्याच्या पाण्यासाठी वरदान असलेल्या राधानगरी येथील लक्ष्मी धरणात २.८४ टीएमसी म्हणजे ३६.५० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.गतवर्षीच्या तुलनेत यंदा राधानगरी धरणात सुमारे १ टीएमसी पाणीसाठा कमी असल्याने पाण्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे आहे.**


राधानगरी धरणाचे (लक्ष्मी तलाव) छायाचित्र.

कोल्हापूर जिल्ह्यासाठी जीवनदायी असलेल्या राधानगरी धरणाची साठवण क्षमता८.३६ टीएमसी इतकी आहे. सध्या धरणात २.८४ टीएमसी म्हणजे ९७.११ दलघमी इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. गतवर्षी धरणात ३.१७ टिएमसी पाणीसाठा शिल्लक होता. दरम्यान गतवर्षी मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात अवकाळी पावसाने सुरुवात केली होती.त्यामुळे पाण्याची मागणी कमी झाल्याने पाणीसाठा शिल्लक राहिला होता.यावर्षी तालुक्यात एप्रिल महिन्यात चार ते पाचवेळा वळीव पाऊस झाला आहे. त्यामुळे शेती पिकांसाठी हा पाऊस पोषक ठरला. त्यामुळे या काळात शेती पंप बंद राहिल्याने पाण्याची बचत झाली आहे.

मात्र यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा तसेच पाऊस लांबणीवर पडण्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे अशी परिस्थिती उद्‌भवल्यास पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याचा योग्य व जपून वापर करण्याचे आवाहन राधानगरी पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रविण पारकर यांनी केले आहे.

# पिक कर्जाची मुदतीत परतफेड करा

## नियमित कर्जफेड प्रोत्साहन योजनेच्या लाभासाठी मंत्री हसन मुश्रीफ यांचे शेतकऱ्यांना आवाहन

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**शासनाच्या निर्णयानुसार यावर्षीची कर्जे ही कर्जमाफी योजनेसाठी पात्र नसल्यामुळे नियमित कर्जफेड प्रोत्साहन योजनेच्या लाभासाठी चालू वर्षातील वसूलपात्र रक्कम मुदतीत भरा,असे आवाहन केडीसीसी बँकेचे अध्यक्ष व वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी शेतकऱ्यांना केले आहे. या माध्यमातून कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची उच्चांकी कर्ज वसुलीची उज्वल परंपरा अखंड ठेवूया,असे आवाहनही त्यांनी केले आहे.**

पत्रकात श्री.मुश्रीफ यांनी पुढे म्हटले आहे, महाराष्ट्र राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना २०२६' ही योजना आणलेली आहे. शासनाच्या निकषानुसार ता.३०जून २०२५ अखेर थकीत असलेले तसेच; ता. ३० सप्टेंबर २०२५ अखेर दोन लाख रुपयांपर्यंत शिल्लक पीक कर्जाची थकबाकी असलेले शेतकरी कर्जमाफीस पात्र ठरणार आहेत. तसेच; सन २०२२–२३, २०२३–२४ व २०२४–२५ या आर्थिक वर्षांत नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे, असेही श्री.मुश्रीफ यांनी पत्रकात म्हटले आहे.



या पत्रकात पुढे म्हटले आहे, राज्य शासनाच्या या योजनेंतर्गत जिल्ह्यातील थकीत तसेच, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. शासनाच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील बँकांकडून पात्र शेतकऱ्यांची माहिती संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली आहे.

शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी शासनाने अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेतला असून, त्यानुसार मुख्यमंत्री यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे. राज्यातील सर्व बँकांकडून पीक कर्ज, मध्यम मुदत कर्ज तसेच दीर्घ मुदत कर्जाची माहिती मागविण्यात आली आहे. लवकरच योजनेचे निकष शासनाकडून जाहीर करण्यात येणार आहेत. दरम्यान रब्बी म्हणजेच ऊस हंगामाचा कर्जपुरवठा एक जुलै २०२४ ते ३० जून २०२५ असा होता. या कर्जाची परतफेडीची मुदत ता. ३० जून २०२६ अखेर आहे. त्यामुळे हे वर्ष कर्जमाफी योजनेमध्ये पात्र धरलेले नाही. त्यामुळे प्रोत्साहनपर योजनेचा लाभ घेण्यासाठी चालू वर्षातील वसूलपात्र कर्जाची मुदतीत परतफेड करणे अत्यावश्यक आहे.जर शेतकऱ्यांनी चालू वर्षाचे कर्ज मुदतीत भरले नाही, तर असे शेतकरी शासनाच्या प्रोत्साहनपर लाभापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे सर्व शेतकरी सभासदांनी तात्काळ चालू वर्षातील वसूलपात्र कर्जाची परतफेड करून शासनाच्या महत्त्वपूर्ण योजनेचा लाभ घ्यावा.गतवर्षी म्हणजेच जून २०२५ अखेरची थकबाकी कर्जमाफीसाठी पात्र होणार आहे, हे सरकारने याआधीच जाहीर केलेले आहे. त्यामुळेच ३० जून २०२६ अखेर थकबाकी राहिल्यास असा शेतकरी शासनाच्या कर्जमाफी व प्रोत्साहन योजनेतून वगळला जाणार आसल्याची माहिती त्यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.


आळते ओढ्यातील अतिक्रमित बंधाऱ्याचा पंचनामा करताना महसूल विभागाचे कर्मचारी.

## आळते येथील ओढ्यातील अतिक्रमित बंधाऱ्याचा महसूल विभागाकडून पंचनामा

हातकणंगले,ता.१४(प्रतिनिधी)–

**आळते येथील ओढ्यात बांध घालून प्रवाह बदलणाऱ्या इसमास चांगलाच झटका बसला आहे. दै.महासत्ता मधील बातमीची दखल घेऊन सर्कल तलाठ्यांच्या पथकाने या अतिक्रमणाचा पंचनामा करून तहसिलदारांना अहवाल सादर केल्याने शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त केले जात असून आता कारवाईची प्रतिक्षा आहे.**

महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी अशोक बसवणे, आळतेचे तलाठी अभिषेक पतंगे, हातकणंगलेचे तलाठी मिलिंद चव्हाण,नेज – मजलेचे तलाठी राजू शिंदे,महसूल सेवक दिपक कोळी यंचेसह परिसरातील शेतकरी यांच्या उपस्थितीत अतिक्रमित बंधाऱ्याचा पंचनामा करून तहसिलदार सुशिल कुमार बेल्हेकर यांना अहवाल सादर केला आहे. यामुळे शेतकऱ्यातून समाधान व्यक्त केले जात असून त्यांना कारवाईची प्रतिक्षा आहे.

## एकटी संस्था व महापालिकेच्यावतीने आजपासून सेंद्रिय खत महोत्सव

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**एकटी संस्था आणि कोल्हापूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ते १७ मे २०२६ या कालावधीत सेंद्रिय खत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जरगनगर रोडवरील निर्माण चौक, मैल खड्डा येथे हा महोत्सव होणार असल्याची माहिती एकटी संस्थेचे उपाध्यक्ष संजय पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

पर्यावरण संवर्धन, स्वच्छता अभियान आणि सेंद्रिय शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविला जात आहे. या महोत्सवामध्ये ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मिती कशी करावी,याबद्दल नागरिकांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच महोत्सवात सेंद्रिय खत विक्रीसाठीही उपलब्ध करून दिले असून, ते एक किलोच्या कागदी पिशव्यांमध्ये मिळणार आहे.महोत्सवाचे उद्‌घाटन आज शुक्रवार ता.१५ मे रोजी सायंकाळी पाच वाजता महापौर रुपाराणी निकम यांच्या हस्ते होणार असून विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# गोकुळ निवडणूक प्रक्रियेबाबत गंभीर आक्षेप

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील शब्द गाळल्याचा आरोप

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**श्री स्वामी समर्थ दूध संस्था यांच्या वतीने गोकुळ दूध संघ निवडणूक प्रक्रियेबाबत गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले असून,राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पत्रव्यवहारावरून नवा वाद निर्माण झाला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी गोकुळ दूध संघ निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने ९० दिवसांत निवडणुका घेण्याबाबत दिलेल्या आदेशाबाबत संभ्रम असल्याचे नमूद करत प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांच्याकडे मार्गदर्शन मागवले आहे. मात्र, या पत्रातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील परिच्छेद क्रमांक ८ मधील from today हे महत्त्वाचे शब्द जाणीवपूर्वक वगळण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

श्री स्वामी समर्थ दूध संस्था यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अपूर्ण संदर्भ देऊन विधी व न्याय विभागाची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप केला आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या मते, from today या शब्दांमुळे निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याची मुदत स्पष्ट होत असताना ते शब्द गाळल्याने आदेशाचा अर्थ बदलण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय निर्माण होत आहे.

संस्थेने हा प्रकार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असल्याचा दावा केला असून, संबंधित अधिकाऱ्यांवर न्यायालयीन अवमान याचिका दाखल करण्यासह फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तयारी सुरू असल्याचे सांगितले आहे. यासंदर्भात लवकरच अधिकृत तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहितीही संस्थेकडून देण्यात आली.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, न्यायालयीन आदेशातील महत्त्वाचे शब्द वगळून शासनाच्या विधी व न्याय विभागासमोर अपूर्ण माहिती ठेवणे हा अत्यंत गंभीर प्रकार असून,यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान,गोकुळ दूध संघ निवडणूक प्रक्रियेभोवती आधीच राजकीय आणि प्रशासकीय वातावरण तापलेले असताना या नव्या आरोपांमुळे प्रकरणाला आणखी गंभीर वळण मिळाले आहे.आता या तक्रारीनंतर शासन,विधी विभाग आणि निवडणूक प्राधिकरण यांची भूमिका काय राहणार याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## राधानगरीत आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक संपन्न

शिरगाव,ता.१४(प्रतिनिधी)–

**मान्सूनपूर्व काळात उद्‌भवणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी राधानगरी तहसिल कार्यालयाच्या सभागृहात तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक पार पडली.**


आढावा बैठकीप्रसंगी बोलताना तहसिलदार अनिता देशमुख

बैठकीत अतिवृष्टी, पूरस्थिती, वादळी वारे,भूस्खलन तसेच आपत्कालीन परिस्थितीत विविध विभागांनी करावयाच्या उपाय योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी तहसिलदार अनिता देशमुख होत्या. बैठकीत ग्रामपंचायत स्तरावर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम ठेवणे, गावनिहाय आपत्कालीन संपर्क यादी अद्ययावत ठेवणे, पूरप्रवण भागांतील नागरिकांना वेळेवर सूचना देणे,तसेच स्थलांतरासाठी आवश्यक व्यवस्था तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी संबंधित विभागांचे अधिकारी,ग्रामसेवक,सरपंच, कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. तालुक्यातील सर्व विभागांनी सतर्क राहून नागरिकांना तातडीची मदत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

# नव्वद पटांखालील मुख्याध्यापक पदाला संरक्षण

## आमदार जयंत आसगावकर यांच्या पाठपुराव्याला यश

कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)–

**विद्यार्थी संख्या ९० पेक्षा कमी असलेल्या शाळांतील मुख्याध्यापक पदे कायम ठेवण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, या पदांना संरक्षण देण्यास शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे. आमदार जयंत आसगावकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय झाला आहे.**



शिक्षण विभागाच्या पूर्वीच्या आदेशानुसार ९० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील मुख्याध्यापक पदे कमी करण्याची प्रक्रिया सुरू होती. यामुळे शाळांच्या प्रशासकीय कामकाजावर तसेच शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. आमदार आसगावकर यांनी पुणे शिक्षण आयुक्त तसेच शिक्षण संचालक स्तरावर पाठपुरावा केला.

यासंदर्भात २० एप्रिल रोजी आयुक्त कार्यालयात पहिली बैठक झाली होती. त्यानंतर ११ मे रोजी शिक्षण संचालकांच्या दालनात दुसरी बैठक घेण्यात आली. या बैठकीत आमदार आसगावकर यांनी मुख्याध्यापक पद संरक्षणाचा मुद्दा ठामपणे मांडला.

**प्रशासन होणार सक्षम**

बैठकीतील चर्चेनंतर पुणे शिक्षण संचालक महेश पालकर यांनी ९० पटाखालील शाळांतील मुख्याध्यापक पदे संरक्षित ठेवण्यास मान्यता दिली. या निर्णयामुळे ग्रामीण व लहान शाळांमधील प्रशासन अधिक सक्षम होणार असून, गुणवत्ता टिकवण्यास मदत होणार आहे.

# मिलिंद सोसायटीच्या जागेवरील अतिक्रमणे हटवा

## सोसायटीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

हुपरी,ता.१४(वार्ताहर)–

**येथील मिलिंद को–ऑप हौसिंग सोसायटी लि. हुपरी यांच्या मालकीच्या जागेवर करण्यात आलेली सर्व अनधिकृत अतिक्रमणे तात्काळ काढण्यात यावीत,या मागणीसाठी सोसायटीच्या वतीने हातकणंगले तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.**

निवेदनात नमूद केल्यानुसार, हुपरी येथील ग. नं. ८४४/अ ही २हेक्टर २ आर इतकी जागा शासनाने १९६८ साली मागासवर्गीय वसाहतीसाठी मिलिंद को–ऑप हौसिंग सोसायटीला मंजूर केली होती. या जागेवर शासनाच्या आदेशानुसार रहिवासी वापरासाठी प्लॉटचे वाटपही करण्यात आले आहे. मात्र, सध्या हुपरी–रेंदाळ रोड लगत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या सभोवताली मोकळ्या भूखंडात मोठ्या प्रमाणात अनधिकृत दुकान–खोकी उभारण्यात आली आहेत. यामध्ये भाजी विक्रेते,हारवाले, मावा–पानटपरी , चायनीज आणि चिकन सेंटरच्या खोक्यांचा समावेश असून, या अतिक्रमणामुळे बुधवार बाजाराच्या दिवशी लोकांच्या गाड्या लावण्यासाठी जागा उरत नाही,ज्यामुळे रहदारीची मोठी कोंडी होते.

या अतिक्रमणा विषयी लोकप्रतिनिधी,विश्व हिंदू परिषद, बजरंग दल,खोकी धारक,व नगरपरिषद प्रशासन यांची तहसीलदार कार्यालयात ५ मे रोजी संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, या बैठकीत सोसायटीला आपले म्हणणे मांडण्याची संधीच दिली गेली नाही, असा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला आहे. 'आमच्या सोसायटीच्या जागेवर कोणताही निर्णय घेताना आम्हाला विश्वासात घेणे आवश्यक आहे, तरीही आमचे म्हणणे न ऐकता निर्णय घेतले जात आहेत,' अशी व्यथा सोसायटीने मांडली आहे.यावेळी सोसायटीचे चेअरमन किरण हुपरीकर, व्हा. चेअरमन भरत माणकापुरे,सेक्रेटरी संजय शेंडे यांनी या निवेदना द्वारे प्रशासनाला कारवाई करण्याची विनंती केली आहे.

# मंत्रीपद मिळाल्यापासूनच पोलिस ताफा नाकारणाऱ्या शिवेंद्रराजेंची चर्चा

## सव्वा वर्षापूर्वीच शिवेंद्रराजेंचा निर्णय; इंधन बचतीबरोबरच पोलिसांनाही दिलासा

सातारा,ता.१४(शरद काटकर)–



**वागण्यात बदल नाही, बोलण्यात बदल नाही, दैनंदिन कामाचा व्याप वाढलाय तरीही चेहऱ्यावर आळस नाही, मिळालेल्या खुर्चीचा गर्व नाही, डामडौल नाही, पोलीसांचा ताफा नाही,कानठळ्या बसेल असा भोंग्याचा आवाज नाही या सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर पहिल्या दिवसापासून अंमलात आणलेल्या नव्या पायंड्याची चर्चा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पेट्रोल बचतीच्या आवाहनानंतर नुसती सातारा जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात आदराने केली जात आहे.**

ना पोलीस विभागाला त्रास,ना जिल्हा प्रशासनाला टेन्शन शिवेंद्रसिंह राजेंच्या धाडसी निर्णयाने कोट्यवधी रूपयांची इंधन बचत झाली आहे. विशेष म्हणजे लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यातही विना प्रोटोकॉल फिरत असल्याने पालक मंत्र्यांचा कौतुकाचा विषय झाला आहे.सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या 'डोक्यात' मंत्रीपदाची कोणतीच हवा न गेल्याने असं पहिल्यांदाच घडलं असावं, राजकारणात असही घडू शकतं ? असं म्हणत अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेसह पाच मंत्री, दोन महामंडळाचे उपाध्यक्ष जिल्ह्याला लाभल्याने जिल्ह्यात जल्लोष झाला.जिल्ह्याच्या मंत्रीपदाच्या आकड्यानं जिल्हा प्रशासनाला विशेषतःपोलिस दलाला धडकी भरली. जिल्ह्याच्या ठिकाणी विविध पक्ष,संघटना यांच्या माध्यमातून होणारी आंदोलन, मोठा महामार्ग असल्याने होणारे अपघात, दिवसेंदिवस वाढणारी गुन्हेगारी या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनावर ताण वाढणार हे कटूसत्य होत. अशा परिस्थितीत अपुरे कर्मचारी, अधिकारी असताना जिल्ह्यातील मंत्री महोदयांचा प्रोटोकॉल, कार्यक्रमाचा बंदोबस्त ही तारेवरची कसरत होणं सहाजिकच होतं. ही बाब प्रशासन उघड–उघडं बोलू शकत नसली तरी घालमेल जाणवत होती.

ना. शिवेंद्रसिंहराजे मंत्री झाले आणि शिरवळ पासूनच मिरवणुकीचं नियोजन झाले.याठिकाणी पोहोचताच ना.शिवेंद्रसिंहराजेंनी सोबत असलेले कमांडो, पोलीस गाड्यांचा ताफा माघारी पाठवला. कार्यकर्तेच माझे अंगरक्षक, तुमची गरज नाही हा पवित्रा घेतल्याने पोलिस दलाला हा पहिलाच अनुभव होता.हा पवित्रा बघून पोलिस अवाक झाले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी केलेली विनंती देखील धुडकावून लावली. राजेंचा आदेश मानून अधिकारी, कर्मचारी परत गेले. शिवेंद्रसिंहराजे फक्त त्याच दिवसासाठी पोलिस संरक्षण नाकारतील असं वाटतं होतं. जिल्ह्याच्या कार्यक्रमात,सातारा वास्तव्यात, मतदार संघात मला पोलीस फौजफाटा नको,एवढेच नव्हे तर मला अंगरक्षकाची सुध्दा गरज नाही असे ठणकावून सांगणारे शिवरायांचे वंशज, ना. शिवेंद्रसिंहराजे हे राज्यातील पहिले मंत्री असावेत.

शिवेंद्रसिंहराजेंच्या हि धाडसी भूमिका राज्यातील अनेक नेत्यांना अचंबित करणारी ठरली. ताफ्याच्या पुढे पोलीस गाडी दिसली नाही या झालेल्या तक्रारी वरून पोलिस अधिकारी,कर्मचारी निलंबित केल्याची अनेक उदाहरणे राज्यात आहेत. शिवेंद्रसिंहराजे मात्र आपल्या भूमिकेवर आजही ठाम आहेत.

भाजपा नेतृत्वाने शिवेंद्रसिंह राजेंवर सार्वजनिक बांधकाम मंत्री पदाची मोठी जबाबदारी दिली आहे.पदभार स्वीकारल्यानंतर मंत्रालयात अधिकारी नियुक्ती करताना निकषाची लावलेली 'चाळण' अफलातून होती. यापूर्वी ज्या ठिकाणी काम केली त्या–त्या ठिकाणी 'सातबारा' च नव्हे तर 'फेरफार' काढून कुंडली काढली. कोण सोम्या–गोम्या सांगतोय म्हणुन खुर्ची दिली असं केले नसल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

मंत्रालयात बदल्या आणि पदोन्नती या फायलींची हालचाल 'अर्थ'पूर्ण होत असल्याच्या अनेक गमतीजमती चर्चेत असतात. याकाळात अनेकजण संधीचा फायदा घेतात.विरोधक बऱ्याचदा घोटाळ्यांचे आरोप करतात आमदारकी कोळून प्यायलेल्या राजेंनी कार्यभार स्वीकारताच बदल्या, पदोन्नतीच्या फायली पुढे आल्या.नवनियुक्त अधिकाऱ्यांच्या बैठकीत या फायलींच्या कामांसाठी एक रूपया कुणी घेतल्याची तक्रार आली तर हाकलून देणार असा 'सज्जड' ढोसच दिल्याचीही जोरदार चर्चा रंगू लागल्या आहेत.शिवेंद्रसिंह राजेंच्या या साधेपणाने प्रशासन सुखावले हे खरं असलं तरी काहींचा मात्र 'हिरमोड' झाल्याची जनभावना आहे.

ना. शिवेंद्रसिंहराजेंच्या डोळ्याच्या इशाऱ्यावर कार्यकर्ते एका 'दोरीत' सरळ होतात. कार्यकर्त्यांना ताकद देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्यात शिवेंद्रसिंहराजेंचा हातखंडा आहे. असे कार्यकर्ते लाईन–दोरी सोडून वागायला लागला तर त्यांना न बोलता 'वठणीवर'आणण्याचं 'बिनाबोभाट' काम राजेंकडून केले जाते. अनेकांना यांचे 'फटके'अन्?'चटके' बसल्याची उदाहरणे चर्चेत आहेत.राजे आपल्यावर राज्याची जबाबदारी आहे. पहिल्या दिवसापासून आपण वातावरण 'टाईट'केलय. ''लाभार्थी'' वाढल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसे मेसेज फिरत असल्याची चर्चा आहे.राजे, विनाकारण बदनामी नको 'टोलनाके, लाभार्थी' वाढल्याची चर्चा सुरू आहे. आपण शिवरायांचे वंशज आहात थोडी सावधानता बाळगावी अशी प्रामाणिक निष्ठावंतांमध्ये दबक्या आवाजात चर्चा आहे.

पालकमंत्र्यांचा दौरा म्हटलं की,प्रशासनाला घाम फुटतो. शिवेंद्रसिंहराजेंनी पहिल्या दौऱ्यापासून डामडौल, पुढं–मागे फौजफाट्यावर 'फुली'मारली.हा लातूर जिल्ह्यातील चर्चेचा विषय ठरला आहे. महाराष्ट्रात कोणत्याही जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले तरी हाच पायंडा पाडला आहे. राजेंच्या या भूमिकेवर प्रशासन टेन्शन मुक्तआहे.युद्धजन्य परिस्थितीत पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल बचतीबरोबर सोनं खरेदी, परदेश दौरे यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवाहन केले.शिवेंद्रसिंहराजे कॅबिनेट मंत्री झाले अन् या सर्व खर्चाला 'फाटा' देऊन शासनाची कोट्यवधींची बचत केली. मोदींच्या आवाहनानंतर शिवेंद्रसिंहराजेंच्या बचतीच्या चर्चेला उधाण आले आहे.

# मोरणा धरणात केवळ २८ टक्के पाणीसाठा

## शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर



**शिराळा,ता.१४(प्रतिनिधी)**

**शिराळा तालुक्यातील मध्यम प्रकल्प असलेल्या मोरणा धरणात सध्या केवळ २८ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिल्याने शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे वाकूर्डे बुद्रुक उपसा जलसिंचन योजनेचे पाणी मोरणा धरणात सोडण्याची मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.**

वाकूर्डे बुद्रुक उपसा जलसिंचन योजना शिराळा तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने राबविण्यात आली होती. मात्र या योजनेचा लाभ शिराळा तालुक्यापेक्षा कराड तालुक्यातील शेतकऱ्यांना अधिक होत असल्याची भावना तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

वाकूर्डे योजनेचे पाणी करमजाई धरणात सोडले जात असून त्याचा लाभ कराड तालुक्यातील दक्षिण मांड नदी परिसरातील शेतीला होत आहे.

तसेच येणपे व उंडाळे तलावातही पाणी सोडण्यात येत आहे. या पाण्याचा फायदा कराड तालुक्यातील सुमारे २७७२ हेक्टर क्षेत्राला होत असल्याचे सांगितले जाते. गेल्या वर्षी याच कालावधीत मोरणा धरणातील पाणीसाठा ३५ टक्के होता.

मोरणा धरणातून सात दिवस पाणी सोडले जाते, तर आठ दिवस पाणीपुरवठा बंद ठेवला जातो. या धरणाच्या पाण्यावर सुमारे ४५५ हेक्टर ऊस क्षेत्र अवलंबून आहे. तसेच उपवळे, पाडळी, बिऊर, तडवळे, अंत्री, भाटशिरगाव व मांगले गावांतील शेतीलाही या पाण्याचा मोठा फायदा होतो.

शिराळा शहर व एमआयडीसी परिसराचा पाणीपुरवठा मोरणा धरणावरच अवलंबून आहे. एप्रिल-मे महिन्यात शहरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून पाणीपुरवठ्याची वेळ वाढवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. तालुक्यात शेतीसाठी पाण्याची मागणी वाढत असल्याने वाकूर्डे योजनेचे पाणी तातडीने मोरणा धरणात सोडावे, अशी मागणी शेतकरी व नागरिकांतून होत आहे.

# बोअरींगसाठी महानगरपालिकेने वीज कनेक्शन व सबमर्शिबल पंप द्यावे

## नगरसेवक परवेज गैबान यांची मागणी

**इचलकरंजी,ता.१४**



**एखादा नगरसेवक महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेऊन आपल्या प्रभागात नागरिकांच्या पाणी समस्येसाठी स्वखर्चाने बोअरवेल घेत असेल, तर त्या बोअरवेलला महानगरपालिकेकडून वीज कनेक्शन व मोटर देण्यात यावी. अशी मागणी स्थायी समितीचे सदस्य तथा नगरसेवक परवेज गैबान यांनी महापौर उदय धातुंडे यांच्याकडे केली आहे.**

शहराच्या पाणी प्रश्नाबाबत २०२० साली कौन्सिल सभा क्रमांक ११, तत्कालीन नगरपालिकेने मंजूर केलेल्या ठराव नंबर २५८ नुसार मुद्दा उपस्थित केला.

त्या ठरावानुसार, लोकवर्गणीतून नवीन बोअरवेल मारल्यास नगरपालिकेकडून त्या बोअरवेलला वीज कनेक्शन व मोटर देण्यात येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला होता. यावर बोलताना नगरसेवक परवेज गैबान यांनी २०२० साली केलेला ठराव रद्द करावे.

इचलकरंजी नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले आहे आणि लोकप्रतिनिधी म्हणून नगरसेवकांना आपल्या प्रभागातील पाणी समस्येची पूर्ण जाणीव आहे.

त्यामुळे त्यांनी मागणी केली की, जर एखादा नगरसेवक महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेऊन आपल्या प्रभागात नागरिकांच्या पाणी समस्येसाठी स्वखर्चाने बोअरवेल घेत असेल, तर त्या बोअरवेलला महानगरपालिकेकडून लाईट कनेक्शन व मोटर देण्यात यावी.

हा ठराव मंजूर झाल्यास शहरातील अनेक भागांतील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो.

यावेळी सभागृहात गटनेते विठ्ठल चोपडे यांनी महापौर उदय धातुंडे यांच्या परवानगीने पुढील महासभेत हा विषय अजेंड्यावर घेऊन ठराव मंजूर करण्याचे आश्वासन दिले.

# ऑनलाईन नोंदणीस तीन महिन्यांची मुदतवाढ

## आ.राहुल आवाडे यांच्या प्रयत्नांना यश

**इचलकरंजी,ता.१४**

**यंत्रमाग उद्योगाची वीज सवलत सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यासाठीची मुदत वाढवावी, अशी मागणी आम.डॉ.राहुल आवाडे यांनी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली होती. यास यश येऊन वस्त्रोद्योग मंत्रालयाने तीन महिने मुदत वाढीचा शासन निर्णय जारी केला आहे.**

वस्त्रोद्योग धोरण २०२३ - २८ अंतर्गत वीज सवलतीचा लाभ मिळण्यासाठी यंत्रमाग घटकांना शासन निर्णय झालेपासून सहा महिन्यांची मुदत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यासाठी देण्यात आली होती. परंतू सदर ऑनलाईन अर्ज भरण्यामध्ये यंत्रमागधारकांना अडचणी येत होत्या व त्यातील जाचक अटी पूर्ण करणे अशक्य होते. त्यामुळे सदरचा फॉर्म सोपा करावा यासाठी वस्त्रोद्योग मंत्री, वस्त्रोद्योग आयुक्त व आम.राहुल आवाडे यांच्याकडे पॉवरलुम असोसिएशनने पाठपुरावा केला होता. यानंतर आम.आवाडे यांनी, वस्त्रोद्योग मंत्री यांच्यासोबत तीन बैठका घेऊन अर्ज सोपा व सुटसुटीत करण्याची मागणी केली. यानुसार वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून ७ एप्रिल २०२६ रोजी ऑनलाईन सोपा व सुटसुटीत अर्ज करून देण्यात आला. शासन निर्णयानुसार ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत २६ एप्रिल पर्यंत होती. सदर वेळेत यंत्रमागधारकांना अर्ज करणे शक्य नसल्याने यास मुदतवाढ मिळावी अशी मागणी दि इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशनने वस्त्रोद्योग मंत्री, वस्त्रोद्योग आयुक्त व आम. आवाडे यांच्याकडे केली होती. यास अनुसरून आम. आवाडे यांनी वस्त्रोद्योग मंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेऊन ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळण्याविषयी विनंती केली होती. त्यास यश येऊन वस्त्रोद्योग मंत्रालयाने तीन महिन्यांची मुदतवाढ दिल्याचा शासन आदेश जारी केला आहे, असे परिपत्रक दि इचलकरंजी पॉवलुम असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

# साडेदहा तोळे दागिने,रोकडवर डल्ला

**कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-**

**पाडळी खुर्द येथील घरातून चोरट्याने साडेदहा तोळे सोन्याचे दागिने आणि ५२ हजार रुपयांची रोकड लंपास केली. याप्रकरणी रूपा शंकर पाटील (वय ४०) यांनी करवीर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रूपा पाटील या त्यांचे पती, मुलगा आणि मुलीसह ६ मे रोजी कोकण पर्यटनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांचा मोठा मुलगा केदारनाथ हा घरीच थांबला होता. ७ मे रोजी सायंकाळी हे कुटुंब सहलीवरून परतले. घरात आल्यानंतर कपाटाची तपासणी केली असता, त्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम दिसून आली नाही. परिसरात सर्वत्र शोध घेऊनही दागिने सापडले नसल्याने त्यांनी पोलिसांत धाव घेतली. या चोरीमध्ये साडेसात तोळ्यांचे सोन्याचे गंठण, दीड तोळ्याची चेन आणि लॉकेट, सहा ग्रॅमचे कानातील टॉप्स, चार ग्रॅमची बोरमाळ, पाच ग्रॅमची सोन्याची पट्टी आणि ५२ हजारांची रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास झाला. घरफोडी झाली त्या काळात कुटुंबातील एक सदस्य घरीच असताना हा प्रकार घडला.

# पोलिस उपनिरीक्षकपदी सुरज भबिरे यांची निवड

**इचलकरंजी,ता.१४-**

**मुंबई पोलिस दलातील सुरज नेमिनाथ भबिरे याची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत पोलिस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली आहे.**



जलद प्रतिसाद पथक पश्चिम प्रादेशिक विभाग (क्यू आर टी) बांद्रा वेस्ट येथे सुरज भबिरे कार्यरत आहे.नुकत्याच झालेल्या परीक्षेत पोलीस उपनिरीक्षक म्हणून त्यांची निवड झाली.

सुरज भबिरे हे इचलकरंजीचे असून निवडीनंतर त्यांची शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली.









# मनपाच्या सर्व कार्यालयांमध्ये सोलर यंत्रणा बसविणार : डॉ. भारुड

**कोल्हापूर ता.१४ (प्रतिनिधी) -**

**महानगरपालिकेच्या सर्व कार्यालये, पंपिंग स्टेशनमध्ये सौर ऊर्जा यंत्रणा बसविण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून विद्युत बिलामध्ये कपात होऊन महापालिकेचा मोठा खर्च वाचेल, अशा सूचना आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांनी दिल्या. महापालिकेच्या विद्युत विभागाच्या कामकाजासंदर्भात आढावा बैठक आयुक्त कार्यालयात आयोजिली होती.**

बैठकीत आयुक्त डॉ. भारुड यांनी, कंपनीकडून मागील एक वर्षापासून एलईडी पथदिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

शहरात वाढत्या पथदिव्यांच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर संबंधित कंपनीसोबतचा महापालिकेचा करार रद्द करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून शासनामार्फत नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या संस्थेमार्फत पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे महासभेच्या मान्यतेनंतर करण्यात यावीत. संबंधित संस्थेने नियुक्तीपूर्वी आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवावी, बंद पडलेले दिवे तातडीने सुरू करण्यासाठी साहित्याचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा आणि वर्कऑर्डर मिळताच शहरातील सर्व दिवे पूर्ववत सुरू करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

विद्युत विभागातील तांत्रिक कामकाजासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची यादी तयार करावी. गरजेनुसार एजन्सीमार्फत पदभरती करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.बैठकीस अतिरिक्त आयुक्त रविकांत आडसूळ, शहर अभियंता रमेश मस्कर, सहायक अभियंता नारायण पुजारी, कनिष्ठ अभियंता अमित दळवी तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# महानगरपालिकेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन


**इचलकरंजी,ता.१४ -**

**महानगरपालिकेच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त प्रकाश आवाडे ,माजी आम. सुरेश हाळवणकर, उपमहापौर अनिल डाळ्या आणि अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन करणेत आले.**



**श्री शंभुतीर्थ येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास महापौर उदय धातुंडे यांच्या हस्ते आणि माजी आम.**

याप्रसंगी उपायुक्त विद्या कदम, सभागृह नेते विठ्ठल चोपडे, स्थायी समिती सभापती सतीश मुळीक, परिवहन समिती सभापती अरुणा बचाटे, प्रभाग समिती सभापती सुशांत कलागते, अभिषेक वाळवेकर, नगरसेवक रवि रजपुते, संजय तेलनाडे, सुनील तेलनाडे, राजु बोंद्रे, संतोष शेळके, ओंकार सुर्वे, प्रकाश दत्तवाडे,मारुती पाथरवट , नगरसेविका रूपाताई बुगड, सपना भिसे, मनिषा नवनाळे, माजी नगरसेवक श्रीरंग खवरे, भाऊसाहेब आवळे, जहांगीर पटेकरी, प्रमोद बचाटे,नागेश पाटील, दीपक रावळ, प्रशांत नवनाळे, अहमद मुजावर, राजू रजपुते यांच्यासह सहा.आयुक्त रामचंद्र कांबळे, नितिन बनगे, क्रीडा अधिकारी संजय शेटे, संदीप जोशी, संजय कांबळे, युवराज भोसले आदी उपस्थित होते.






# रयतच्या शाहू कॉलेजच्या तीन विद्यार्थ्यांना पीएच.डी

**कोल्हापूर,ता.१४ (प्रतिनिधी)-**

**रयत शिक्षण संस्थेच्या कदमवाडी रोड(कोल्हापूर) येथील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमधील रसायनशास्त्र विभागात पदव्युत्तर शिक्षण घेतलेले स्नेहा कोपार्डे, दिलीप अनुसे व पंकज हसबे या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी पदवी बहाल केली आहे.**

स्नेहा कोपार्डे यांनी सिंथेसिस ऑफ मॉडिफाइड कार्बन मटेरियल्स फॉर सेंसिंग अँड एनवोर्मेंटल रेमेडिएशन एप्लीकेशन्स या विषयावर शिवाजी विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केला होता. डॉ. स्नेहा यांनी, पदव्युत्तर पदवी राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर येथे पूर्ण केली आहे. त्यांनी पीएचडी संशोधनासाठी महाराष्ट्र शासनाची महाज्योती फेलोशिप मिळवली होती. सर्व विद्यार्थ्यांना डॉ. समाधान पवार यांचे संशोधनासाठी मार्गदर्शन मिळाले.संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज पाटील, महाविद्यालय विकास समितीच्या चेअरमन संगीता पाटील, प्रशांत पाटील,प्र. प्राचार्य, प्रो. डॉ. डी. आर. भोसले व उपप्राचार्या, प्रा. डॉ. पी. बी. पिस्टे यांचे सहकार्य मिळाले.









## जसप्रीत बुमराह कसोटीतून बाहेर?

**नवी दिल्ली,ता.१४–**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) अफगाणिस्तानविरुद्धच्या या कसोटी सामन्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. हा सामना मुल्लानपूर येथील महाराजा यादवेंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या गेल्या कसोटी मालिकेत स्वीकाराव्या लागलेल्या पराभवानंतर भारतीय संघ या सामन्यात विजयाचे लक्ष्य ठेवून मैदानात उतरेल.दरम्यान,संघाचा प्रमुख वेगवान गोलंदाज आणि 'मॅच विनर' जसप्रीत बुमराह या कसोटी सामन्यातून बाहेर जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

मात्र, वृत्तानुसार, कामाचा ताण लक्षात घेता निवड समिती जसप्रीत बुमराहला या सामन्यासाठी विश्रांती देऊ शकते. बुमराहच्या अनुपस्थितीत भारतीय वेगवान गोलंदाजीची धुरा मोहम्मद सिराजच्या खांद्यावर असण्याची शक्यता आहे. आयपीएल दरम्यान निवडकर्त्यांचे सिराजच्या कामगिरीवर बारीक लक्ष आहे.

अफगाणिस्तानविरुद्धच्या या सामन्यात शुभमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाची कसोटीतील कामगिरी आतापर्यंत संमिश्र राहिली आहे. त्यामुळे कर्णधार म्हणून या सामन्यात विजय मिळवून दमदार पुनरागमन करण्याचे मोठे आव्हान त्याच्यासमोर असेल. फलंदाजीमध्ये ऋषभ पंत, यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल यांचा संघात समावेश होण्याची दाट शक्यता आहे.

# वैभव सूर्यवंशीची भारतीय संघात एन्ट्री

## 'इंडिया–ए'चे तिलक वर्माकडे नेतृत्व

**नवी दिल्ली,ता.१४ –**

**आगामी श्रीलंका दौऱ्यावरील एकदिवसीय तिरंगी मालिकेसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने इंडिया–ए संघाची घोषणा केली आहे. या संघात अनेक युवा खेळाडूंना संधी देण्यात आली असून, १५ वर्षीय डावखुरा सलामीवीर फलंदाज वैभव सूर्यवंशीचीही एन्ट्री झाली आहे.भारतीय संघात स्थान मिळवून वैभवने क्रिकेट वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. या महत्त्वाच्या मालिकेसाठी अष्टपैलू खेळाडू तिलक वर्माकडे नेतृत्व सोपवण्यात आले असून, रियान पराग उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे.**



९ जूनपासून श्रीलंकेत या तिरंगी मालिकेचा थरार रंगणार आहे. यामध्ये यजमान श्रीलंका–ए, इंडिया–ए आणि अफगाणिस्तान–ए असे तीन संघ आमनेसामने असतील. ही स्पर्धा साखळी पद्धतीने खेळवली जाणार असून, गुणतालिकेत अव्वल स्थानी राहणाऱ्या दोन संघांमध्ये २१ जून रोजी अंतिम सामना रंगेल. स्पर्धेतील सर्व सामने डंबुला येथील आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत.

आयपीएल २०२६ च्या हंगामात आपल्या फलंदाजीने छाप पाडणाऱ्या युवा खेळाडूंना बीसीसीआयने झुकते माप दिले आहे. पंजाब किंग्जकडून खेळणाऱ्या प्रियांश आर्या आणि प्रभसिमरन सिंह या सलामीवीरांना संघात स्थान मिळाले आहे. यासोबतच अंशुल कंबोज, यश ठाकूर, विपराज निगम, आयुष बडोनी आणि हर्ष दुबे यांसारख्या खेळाडूंचा समावेश करून संघ संतुलित राखण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे.९ जूनला भारत–ए विरुद्ध श्रीलंका–ए, ११ जूनला भारत–ए विरुद्ध अफगाणिस्तान–ए,१५ जून रोजी भारत–ए विरुद्ध श्रीलंका–ए, १७ जूनला भारत–ए विरुद्ध अफगाणिस्तान–ए,२१ जून रोजी अंतिम सामना (दोन अव्वल संघांत) होणार आहे.

दरम्यान,एकदिवसीय तिरंगी मालिका संपल्यानंतर भारतीय संघाला यजमान श्रीलंकेविरुद्ध दोन बहुदिवसीय (रेडबॉल) सामनेदेखील खेळायचे आहेत. हे सामने गाले येथील मैदानावर होतील. या कसोटी मालिकेसाठी बीसीसीआय लवकरच भारतीय संघाची घोषणा स्वतंत्रपणे करणार आहे.

**'इंडिया–ए'संघ : तिलक वर्मा (कर्णधार), प्रियांश आर्य, वैभव सूर्यवंशी, रियान पराग (उपकर्णधार), आयुष बडोनी, निशांत सिंधू, हर्ष दुबे, सूर्यांश शेडगे, प्रभसिमरन सिंह (यष्टीरक्षक), कुमार कुशाग्र (यष्टीरक्षक), विपराज निगम, यश ठाकूर, युद्धवीर सिंह, अंशुल कंबोज, अर्शद खान.**

# फ्री आयपीएल तिकीटसाठी फेक वेबसाइट्सचे जाळे

**नवी दिल्ली,ता.१४ –**

**आयपीएल २०२६ चा थरार शिगेला पोहोचला असतानाच फ्री आयपीएल तिकीट, स्वस्त पास आणि मोफत लाईव्ह मॅच पाहण्याच्या नावाखाली ऑनलाइन फसवणूक सुरू असल्याचे उघड झाले आहे.**

सायबर गुन्हेगारांनी आयपीएल चाहत्यांना लक्ष्य करत फेक वेबसाइट्स आणि मालवेअर लिंक्सचे जाळे तयार केले आहे. एका चुकीच्या क्लिकमुळे बँक खाते, वैयक्तिक माहिती आणि मोबाईलचा डेटा धोक्यात येऊ शकतो,असे एका अहवालात म्हटले आहे.



अहवालानुसार, आयपीएल २०२६ दरम्यान ६०० हून अधिक बनावट तिकीट वेबसाइट्स आणि ४०० पेक्षा जास्त मालवेअर लिंक चालू आहेत. या लिंकद्वारे चाहत्यांना स्वस्त तिकीट किंवा मोफत मॅच स्ट्रीमिंगचे आमिष दाखवले जात आहे.भारतामध्ये आयपीएल ही क्रिकेट स्पर्धा नसून तो एक मोठा उत्सव बनला आहे. तिकीट मिळवण्यासाठीची धावपळ, टीम जर्सी खरेदीची क्रेझ आणि शेवटच्या क्षणी सीट मिळवण्याची धडपड याचाच फायदा सायबर गुन्हेगार घेत असल्याचे सांगण्यात येत आहे.सायबर गुन्हेगारांनी बुकमायशो आणि डिस्ट्रीक्ट सारख्या प्रसिद्ध तिकीट प्लॅटफॉर्मची हुबेहूब नक्कल करणाऱ्या वेबसाइट्स तयार केल्या आहेत.

# छ. संभाजी महाराज जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात

**इचलकरंजी,ता.१४–**

**येथील भोने माळ सेवाभावी संस्था, भोनेमाळ युवा मंच गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यानिमित्ताने आयोजित रक्तदान शिबीरात १३५ दात्यांनी रक्तदान केले.**



**रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना प्रमाणपत्र देताना माजी आम. सुरेश हाळवणकर शेजारी शशिकांत मोहिते,नगरसेविका सौ.विद्या साळुंखे व इतर.**

भोनेमाळ युवा मंचचे संस्थापक माजी शिक्षण समिती सभापती मनोज साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली ९ वर्षांपासून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. त्याचबरोबर विविध सामाजिक उपक्रमही राबविले जातात. यंदाही या शिबिरास महिलांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मनोज साळुंखे जनसंपर्क कार्यालय याठिकाणी शिबिराचे उद्घाटन माजी आमदार सुरेश हाळवणकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका सौ. विद्या साळुंखे, सौ. नुतन मुथा, नगरसेवक तानाजी पोवार, रवी रजपुते आदींसह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.याप्रसंगी शशिकांत मोहिते, अनिल ठाणेकर, गोपी ठाणेकर, राजू सातपुते, संभाजी शिंगारे, बाळासो माळी, भागवत जावीर, सतीश पाटील, सुजित कांबळे, सुनील कांबळे,विद्या सुतार, नागुबाई लोंढे, दत्ता चव्हाण आदी उपस्थित होते.

शिबिर यशस्वीतेसाठी चांद जमादार, इम्रान पाथरवट, रवींद्र भांडे, आकाश वासुदेव, दीपक पाटील, अनिकेत सुतार यांनी परिश्रम घेतले.

# वेताळमाळचा सडनडेथवर विजय

**कोल्हापूर ता.१४ (प्रतिनिधी)–**

**महापौर चषक फुटबॉल स्पर्धेत गुरुवारी झालेल्या सामन्यात वेताळमाळ तालीम मंडळने पाटाकडील तालीम मंडळवर सडनडेथमध्ये मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. पूर्णवेळेत सामना गोलशून्य बरोबरीत तसेच टायब्रेकरमध्ये ४–४ असा बरोबरीत राहिला होता. उपांत्य फेरीतील दुसरा सामना शिवाजी तरुण मंडळ आणि दिलबहार तालीम मंडळ यांच्यात शुक्रवारी १५ रोजी दुपारी चार वाजता होईल.**

या सामन्यात प्रारंभापासूनच दोन्ही संघांनी आक्रमक खेळ करत एकमेकांच्या गोलक्षेत्रावर सातत्याने चढाया केल्या. मात्र दोन्ही संघांचे गोलचे प्रयत्न अयशस्वी ठरले. त्यामुळे निर्धारित वेळेत एकाही संघाला गोल करता आला नाही. सामना गोलशून्य बरोबरीत राहिला. अखेरच्या क्षणी प्रणव कणसेने गोलची अत्यंत सोपी संधी दवडली. पूर्णवेळेत सामना गोलशून्य बरोबरीत राहिल्याने टायब्रेकरचा अवलंब करण्यात आला. टायब्रेकरमध्ये वेताळमाळकडून शोएब बागवान, जय कामत, प्रणव कणसे आणि रेहान मुजावर यांनी अचूक गोल नोंदवले. मात्र योक्षिम अवुंगशी याचा फटका पाटाकडीलचा गोलरक्षक अमर गवळीने रोखून धरला. पाटाकडील संघाकडून प्रथमेश हेरेकर, अरबाज पेंढारी, रोहित पवार आणि प्रतिक बदामे यांनी अचूक गोल केले. मात्र अमीन खझीरचा फटका वेताळमाळचा गोलरक्षक विशाल कुरणेने रोखत सामना ४–४ असा बरोबरीत ठेवला. त्यामुळे सामन्याचा निर्णय सडनडेथमध्ये घेण्यात आला.सडनडेथमध्ये वेताळमाळच्या सर्वेश वाडकरचा पहिलाच फटका पाटाकडीलचा बदली गोलरक्षक राहुल पोवारने रोखत आपल्या संघाच्या आशा उंचावल्या. त्यानंतर पाटाकडीलच्या ऋषिकेश मेथे–पाटीलचा फटका वेताळमाळचा गोलरक्षक विशाल कुरणेने अडवून पुन्हा सामना बरोबरीत आणला. यानंतर वेताळमाळकडून विशाल कुरणे, आकाश मोरे, मणिकंदन मुरूगन आणि ऋतुराज सूर्यवंशी यांनी अचूक गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. पाटाकडीलकडून यशराज कांबळे, रोमारिओ आणि मोहम्मदशाहिद पटेल यांनी गोल करत जोरदार प्रतिकार केला. मात्र ओमकार मोरे याचा निर्णायक फटका वेताळमाळचा गोलरक्षक विशाल कुरणेने रोखत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयासह वेताळमाळने स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली.

# 'महाराष्ट्राचा शाहिरी बाणा' कार्यक्रमाने वस्त्रनगरी शिवमय

## छ.संभाजी महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**इचलकरंजी,ता.१४–**

**धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त येथील श्री शंभूतीर्थ परिसरात बुधवारी सायंकाळी रंगलेल्या महाराष्ट्राचा शाहिरी बाणा या शाहिरी कार्यक्रमाने उपस्थित शिवप्रेमींमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला. प्रसिद्ध शाहिर चंद्रकांत माने आणि शाहीर ऋतुजा माने यांच्या दमदार सादरीकरणाने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज स्मारक समितीच्यावतीने आयोजित या कार्यक्रमास नागरिक, शिवभक्त आणि युवकांची मोठी उपस्थिती लाभली. श्री शंभूतीर्थ उभारणीनंतर प्रथमच संभाजी महाराजांची जयंती इतक्या उत्साहात साजरी होत असल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

शाहिर चंद्रकांत माने आणि शाहीर ऋतुजा माने यांनी सादर केलेल्या पोवाड्यांनी उपस्थितांच्या अंगात स्फूर्ती निर्माण केली. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या शौर्यगाथा, स्वराज्याची परंपरा आणि हिंदवी स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाचे प्रभावी वर्णन शाहिरी शैलीत करण्यात आले. स्वराज्याचं तोरण बांधलं... शिवबा राजं... या गीताला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात दाद दिली.



**छ.संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राचा शाहिरी बाणा कार्यक्रम सादर करण्यात आला.यावेळी शहर परिसरातील नागरिक, युवक, युवतींनी प्रचंड हजेरी लावली होती.(छाया – अनंतसिंग)**

कार्यक्रमाची सुरुवात प्रेरणा मंत्राने झाली. संपूर्ण वातावरण ढोल–ताशांच्या गजरात आणि जयघोषांनी भारावून गेले होते. शाहिरी सादरीकरणातील जोश, शब्दांतील धार आणि इतिहासाची जिवंत मांडणी यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. प्रारंभी अॅड. समीर मुदगल यांनी स्वागत केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मंगेश मस्कर यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता ध्येयमंत्राने करण्यात आली.

दरम्यान, जयंतीनिमित्त ९ मे रोजी श्री शिवछत्रपती आणि संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता चौथी ते नववी आणि दहावी ते बारावी अशा दोन गटांत ही परीक्षा घेण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

यावेळी आमदार राहुल आवाडे, महापौर उदय धातुंडे, उपमहापौर अनिल डाळ्या, स्थायी समिती सभापती सतीश मुळीक, अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे, शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र माने, जवाहर छाबडा, गजानन महाजन गुरुजी, विरोधी पक्षनेते उदयसिंग पाटील, नगरसेवक राजू बोंद्रे, कार्यवाह प्रसाद जाधव आदींसह मान्यवर, धारकरी, शिवशंभू भक्त, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गुरुवारी सकाळी ६ वाजता श्री शंभूतीर्थ येथे अभिषेक व मानवंदना कार्यक्रम उत्साहात आणि भक्तिभावात पार पडला. यानंतर ऐतिहासिक व शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन आम. राहुल आवाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती सतीश मुळीक, गजानन महाजन गुरुजी, नगरसेविका मनिषा नवनाळे व धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुक्रवारी सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत लक्ष्मी मार्केट परिसरात हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे.**

# डॉ. संजय डी. पाटील 'द कॅप्टन्स व्हिजन अवॉर्ड' ने सन्मानित

## सिम्युलेशन शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल गौरव

**कोल्हापूर, ता.१४ (प्रतिनिधी)–**

**सिम्युलेशन आधारित वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण आणि जागतिक स्तरावर प्रभाव निर्माण करणाऱ्या कार्याबद्दल डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना द कॅप्टन्स व्हिजन अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले.**

एलिव्हेट हेल्थकेअरचे आंतरराष्ट्रीय संचालक रिचर्ड लिवसी यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी 'अ पार्टनरशिप बिल्ट ऑन व्हिजन' हा पुरस्कारही त्यांना देण्यात आला. रिचर्ड लिवसी म्हणाले, डी. वाय. पाटील विद्यापीठात उभारण्यात आलेले सिम्युलेशन अँड स्कील सेंटर हे दूरदृष्टी, गुणवत्ता आणि नवोपक्रम यांचे उत्कृष्ट उदाहरण आहे. डॉ. संजय पाटील यांनी भारतात सिम्युलेशन आधारित शिक्षणाला नवे आयाम दिले असून वैद्यकीय क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या केंद्रामार्फत आतापर्यंत ३४ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना व प्रशिक्षणार्थींना लाभ झाला आहे.



**डॉ. संजय डी. पाटील यांना 'द कॅप्टन्स व्हिजन अवॉर्ड'ने सन्मानित करताना रिचर्ड लिवसी सोबत ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ.राकेश कुमार शर्मा, कुलगुरू डॉ. ए. के. गुप्ता आदी.**

मागील पाच वर्षापासून एलिव्हेट हेल्थकेअर व डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ यांच्यात सिम्युलेशन शिक्षण भागीदारी आहे. डॉ. संजय डी. पाटील म्हणाले, सिम्युलेशन आधारित शिक्षणामुळे आरोग्य क्षेत्रात काम करणारे विद्यार्थी, डॉक्टर्स यांना अधिक आत्मविश्वासाने उपचार करता येतात. भविष्यातही जागतिक दर्जाच्या सुविधा आणि आधुनिक शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील.

लवकरच मेडिकल कॉलेजच्या नव्या २३ मजली इमारतीमध्ये एका पूर्ण मजल्यावर या सिम्युलेशन सेंटरचा विस्तार केला जाणार आहे.

यावेळी विद्यापीठाचे प्र– कुलपती तथा विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलगुरू डॉ. ए. के. गुप्ता, प्रवीण मित्तल, वृंदन जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, कुलसचिव डॉ. नितीन सिप्पी, डॉ. शिंपा शर्मा,डॉ. संकेत पाटील, अभय जोशी, श्रीलेखा साटम,डॉ. पद्मजा देसाई यांच्यासह विद्यापीठाचे सर्व अधिकारी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे प्रमुख, विभाग प्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सुरुची पवार, डॉ. रश्मी बावडेकर, डॉ.अमृता पवार यांनी केले. आभार डॉ. राजेश ख्यालप्पा यानी मानले.

# आय.ए.एस प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांची गोकुळ दूध संघाला भेट



**कोल्हापूर, ता.१४ (प्रतिनिधी) –**

**केंद्रीय लोकसेवा आयोग २०२५ बॅचमधील प्रशिक्षणार्थी आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने गोकुळ शिरगाव येथील गोकुळ दूध संघाच्या मुख्य प्रकल्पास भेट दिली. या भेटीदरम्यान संघाच्या विविध विभागांच्या कामकाजाची माहिती अधिकाऱ्यांना देण्यात आली.**

प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी दूध संकलन, प्रक्रिया, गुणवत्ता तपासणी, पॅकिंग व वितरण व्यवस्थेची पाहणी केली. तसेच आधुनिक यंत्रसामग्रीच्या माध्यमातून होणारे कामकाज आणि गुणवत्ता राखण्यासाठी घेतली जाणारी काळजी याबाबत माहिती जाणून घेतली. प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांनी प्रकल्पातील कामकाज, स्वच्छता व नियोजनाची पाहणी करत समाधान व्यक्त केले.या अभ्यास दौऱ्यामुळे अधिकाऱ्यांना जिल्ह्यातील सहकार व दुग्ध व्यवसायाची प्रत्यक्ष माहिती मिळाली. तसेच सहकार, प्रशासन आणि विकासात्मक योजनांच्या अमलबजावणी संदर्भात सकारात्मक चर्चा झाली. यावेळी यावेळी प्राधिकृत अधिकारी मंडळाचे सदस्य प्रदीप मालगावे, सागर बलकवडे, चंद्रकांत परूळेकर,डेअरी व्यवस्थापक सुधाकर पाटील, जिल्हा महिला बाल कल्याण विकास अधिकारी सुहास वाईगडे, लक्ष्मण माने व संघाचे अधिकारी अशोक मेहेरे, सचिन जाधव, बाजीराव राणे उपस्थित होते.

# अरिहंत चषक व्हॉलीबॉल स्पर्धेत नितीन शिंदे फायटर्सची आगेकूच

**निपाणी,ता.१४ (प्रतिनिधी)–**

**येथील बालवीर स्पोर्ट्स क्लब आयोजित अरिहंत चषक व्हॉलीबॉल स्पर्धेत नितीन शिंदे फायटर्स संघाने राजमाने ट्रॅव्हल्स तसेच नटराज वॉरियर्स या संघांचा पराभव करून बाद फेरीकडे वाटचाल केली आहे.**

सायंकाळच्या सत्रात विद्युत झोतामध्ये या स्पर्धा सुरू आहेत. अत्यंत चुरशीने झालेल्या स्पर्धेमध्ये शशांक चॅलेंजर्स संघाने विजय राठोड संघाचा २५/२० , २१ /२५ आणि १६/१४ अशा गुण संख्येने पराभव केला. एन. एस. फायटर संघाने राजमाने ट्रॅव्हल्स संघाचा २५/१२ आणि २५ /२० अशा सरळ दोन सेटने पराभव केला.

दुसऱ्या सामन्यांमध्ये एन. एस. फायटर्सने नटराज संघाचा २८/ २६, २५ /२० अशा दोन सेटने पराभव केला. या स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने खेळवल्या जात आहे.पंच म्हणून राष्ट्रीय पंच दीपक चव्हाण, भालचंद्र आजरेकर, अनिल देवडकर, मारिया सुतार हे काम पाहत आहे.अजय जाधव, भालचंद्र आजरेकर, नदीम इनामदार, दीपक बगाडे हे स्पर्धा संयोजनाचे काम करीत आहेत. उद्या सायंकाळी पाच वाजता पुढील सामने खेळवले जाणार आहेत.